
अश्रुतपूर्व
बंध नात्यांचे
सुप्रिया जोशी

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# अश्रुतपुर्व

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अश्रुतपुर्व

(कादंबरी)

लेखिका

सुप्रिया जोशी

# अश्रुतपुर्व


## लेखिका: सुप्रिया जोशी,

व्हाट्सएप नंबर +254738475843

पत्ता- नैरोबी, केनिया

wagmayik@gmail.com

## मुखपृष्ठ: श्रेयस मकरंद शाळीग्राम

पत्ता - 56, "मकरंद", पावनगर, चिंचवडगाव, पुणे, ४११०३३

फोन नंबर +९१ ८८०६७ ७९३२८



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**Whatsapp: 9987737237**

प्रकाशन : ५ फ़ेब्रुवारी २०२२

माघ शुक्ल पंचमी (वसंतपंचमी) शके १९४३



©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे.

# मनोगत



नमस्कार,

मी सुप्रिया जोशी खरेतर लग्नानंतरची प्राची जोशी पण बाबांनी खूप प्रेमाने नाव ठेवलेले असल्याने आणि आईबाबांकडून हा वारसा मिळाला असल्याने सुप्रिया ह्या नावाने आपण लिहावे असे सुचले.

माझे पहिले पुस्तक हे प्रवासादरम्यान घडलेल्या मनोरंजक कथेवर आधारित असलेले रंगीन दुनियेचे रोमांचक अनुभव (RDRA) हे इसाहित्य ह्या वेबसाईटवर प्रकाशित झाले आणि त्या पुस्तकाला खुप छान प्रतिसाद मिळाला, खूप जणांचे व्हाट्स ऍप्प मेसेजेस, तीन-चार जणांनी ई-मेल करून पुस्तकाचे कौतुक केले, तेव्हा मग हुरूप आला आणि अजून लिहावे असे वाटू लागले.

नवीन कथा लिहायला सुरुवात केली. जसे सुचेल तसे लिहायला सुरुवात केली. थोडे लिहून झाले की ते बहिणीला वाचायला द्यायचे. वाचल्यानंतर तिची प्रतिक्रिया असायची,"तू नंतर लिहली पण पुढे काय होणार आहे ते मला सांग". पण पुढे काय होणार ते मलाच माहित नसायचे. जेव्हा वेळ होईल तेव्हा मात्र मग पूर्ण वाचायचे आणि मग परत लिहित जायचे असे करता करता पुस्तक पूर्ण लिहायला १ वर्ष लागले. पण ज्यादिवशी लिहून झाले त्याच दिवशी सुनीळ सामंत ह्यांना लगेच पाठवून दिले. घरातील सगळयांनाच हे पुस्तक आवडल्याने आणि सुनीळ सरांनी

प्रोत्साहन दिल्याने पुस्तक प्रकाशीत करायचे नक्की केले. आणि आज हे पुस्तक तुम्हा सर्वांना वाचायला मिळाले.

आपल्या सर्वांना हे पुस्तक नक्कीच आवडेल हीच अपेक्षा!!

सुप्रिया

सुप्रिया जोशी यांचे
पहिले गाजलेले पुस्तक,
क्लिक करताच
उघडेल.



माझे लिखाण मी

आईबाबा, आनंद, जान्हवी, आर्या, संगीता व सागर

ह्यांचे प्रोत्साहन नसते तर लिहूच शकले नसते.

# प्रस्तावना

मुली जन्माला आल्यानंतर काही दिवसांनीच त्या भातुकली खेळू लागतात. तेव्हापासूनच त्या आईबाबा, नवराबायको ह्या भूमिका खेळात का होईना पण पार पडत असतात. अजून थोड्या मोठ्या झाल्या की मग नवरा, लग्न ह्याबद्दलची स्वप्न पाहू लागतात. आजकालची पिढी थोडीशी वेगळी आहे. लग्नाअगोदर शिक्षण, करियर ह्या गोष्टीला महत्व देतात पण तरीही लग्न ह्याबद्दल काहीतरी मनात रंगवतच असणार.

मानसी दिसायला सुंदर, हुशार! घरामध्ये सगळ्यांची लाडकी असणाऱ्या मानसीचे दूरदेशी राहणाऱ्या हेमंतशी तिचे लग्न होते. घरात शेवटचे लग्न असल्याने धुमधडाक्यात लग्न होऊन ती सासरी येते. थोडेसे कडक सासर आणि अजून आईच्या पदराला धरून चालणारा नवरा असला तरीही बाकी सगळे ठीक चालले असते. काही महिन्यांनी व्हिसा मिळाल्यानंतर तर हेमंतबरोबर राहायला गेल्याने दिवस छान जात असतात.

बाकीच्यांसारखे सर्वसाधारण जीवन जगत असतानाच आयुष्यात एक वेगळेच वळण येते आणि पूर्ण जीवन ढवळून निघते, एक धक्का बसतो तोपर्यंत दुसरा धक्का बसतो. तरुणपणीच सगळ्यांची लाडकी असणाऱ्या, अतिलाडावलेल्या मानसीच्या आयुष्यात एका मागून एक धक्के बसत तिचे आयुष्य बदलवून टाकणारी ही तिची कथा.....

सुप्रिया

## प्रस्तावना

एक सुंदर भावस्पर्शी कथानक अत्यंत साध्या सरळभाषेत मांडण्याचे कौशल्य सराईत लेखकासारखे लेखिका सुप्रियाताई जोशीनी साधले आहे.उत्कट भावनांचा उत्कृष्ट मनोविचार म्हणून या कथानकाकडे पाहता येईल.प्रयत्न चांगला आहे.आणि छान जमलायही .......

तत्कालीन कुटुंब व्यवस्था,रुढी,परंपरा,चालीरीतींचा सुरेख मेळ या कथेत साधला आहे.घरातलं घरपण सोबत नात्यांची गुंफण नकळत मानसी चे बदलणे हे सारे सत्य कथन वाटते.ही व्यक्तीरेखा सतत बदलतेय तेव्हा कंटाळा येत नाही.शाळा,महाविद्यालय, ते मंतरलेले दिवस पुढे नोकरी मग लग्न प्रत्येक पायरीवरील वर्णन मनोमन पटते.जवळचे वाटते.परदेशी गमनासाठी तयारी ती जमवाजमव मग नात्याच्या्या गोतावळयात येणारा स्तब्धपणा ही वर्णने समोर आल्यावाचून रहात नाहीत.लग्नाची तयारी त्यासाठी धावपळ वाचताना मजा येते.

ही प्रेमकथा आहे.मनोभंगाचे दुःख आहे. एका मध्यमवर्गीय स्त्रीची कहाणी आहे.छान रचना आहे.सारे प्रसंग जिवंत वाटतात.सहजसाध्या भाषेतली ही कलाकृती मनाला आनंद देते.याबद्दल लेखिका सुप्रियाताईंचे कौतुक करायलाच हवे.साहित्य साधनेच्या त्यांच्या या प्रयत्नांना खूप यश मिळो ! ही प्रार्थना मी श्री गणेशांच्या चरणी करतो.

मी लेखन प्रांतातील आहे.पण साहित्यिक नाही.तरीही सुप्रियाताईंसाठी प्रस्तावना लिहिण्याचं धाडस केलयं.......

प्रकाश द्वा.तथा बाबा ढोल्ये

संपादक, साप्ताहिक ब्रह्मतेज, रत्नागिरी ४१५६१२, मो.९५५२ ३४० ३४०

# अश्रुतपुर्व

## बंध नात्यांचे

**बाबा माझ्यासाठी जेवणाचे ताट घेऊन आले, पाणी विसरले म्हणून ताट तिथेच ठेवून पाणी आणायला गेले आणि नेमका हेमंत आत आला. त्याला बघितले ....**

**ताट हातात घेऊन त्याला जोरात फेकून मारले. हेमंतचा जोरात ओरडण्याचा आणि ताट पडल्याचा आवाज ऐकून सगळेच आत धावत आले. हेमंतला कपाळाला खोच आलेली बघून काकू एकदम पिसाळल्या,"एकतर काही बोलत नाहीये. घुम्यासारखी बसून राहिली आहे, वर हेमंतला ताट फेकून मारते..." त्यांना जास्त बोलू न देता काकूंच्या हाताला धरून आज्जी त्यांना बाहेर घेऊन गेल्या. इतकावेळ स्तब्ध होऊन उभा राहिलेला हेमंतपण लगेच बाहेर पळाला. आईबाबा माझ्या जवळ येऊन बसले नि माझा सगळा बांध सुटला. मी जोरजोरात रडायला लागले. रडताना नेहमी शांत करणारे बाबा ह्यावेळी मात्र थोडे आनंदी झाले होते. खूपवेळ रडून मी हळूहळू शांत झाले. हळूहळू गोळीचा असर होऊन मी झोपी गेले. थोड्यावेळाने जाग आली आणि मला माझा भूतकाळ डोळ्यासमोर आला....**

पणजोबांनी विचार करून पुढच्या पिढीला वेगळे राहूनपण एकत्र राहता येईल ह्याप्रमाणे खूप मोठे घरं बांधले होते. त्यामुळे एकत्र कुटुंबात असूनही आम्ही वेगळे राहत होतो. सगळ्या सणासुदीला मात्र एकत्र जमून खूप धमाल करायचो, जेवणपण एकत्र व्हायची. साधे हळदीकुंकू असले तरीही घरातलेच ४० जण असायचे. खूप मज्जा यायची. थोडेफार वाद, मानापमानपण व्हायचे पण तरीही मज्जा जास्त यायची. त्यामुळे तशी तडजोड करायची व सगळयांच्यात सामावून राहायची सवय होती.

तन्मयनंतर ४ वर्षांनी माझा जन्म झाला. घरी अगोदर भरपूर भावंडं असल्यामुळे सगळयांना मुलगा किंवा मुलगी काहीही चालले असते. बाबांनामात्र मुलीची खूप आवड. तन्मय झाला तेव्हा बाबा थोडे नाराजच झाले होते. ह्यावेळेस मुलगीच होणार ही बाबांना खात्री होती आणि देवाने त्यांची इच्छापण पूर्ण केली होती. मी झाल्यानंतर घरी आनंदीआनंद झाला होता. बाबांनी स्वतःहून सगळयांना बर्फी वाटली होती.

तिसऱ्या महिन्यात बारसे होणार असताना सगळ्यांनी भरपूर नावे सुचवली, आईतर एवढी नावे ऐकून गोंधळूनच गेली. सगळ्यांनी स्वतःला आवडणारी नावे एका चिट्ठीत लिहून द्यायची व तन्मय जी चिट्ठी उचलेल ते नाव ठेवायचे असे ठरले. पणजीपणजोबांच्या घरी हा कार्यक्रम पार पडणार होता त्यामुळे सगळेजण तिथेच जमले होते. पूर्ण घर भरल्यामुळे मी थोडी घाबरेन म्हणून मला घेऊन न जाता बाबांना घरी माझ्याबरोबर थांबायचे होते पण आईने त्यांचे काहीही न ऐकून घेता बाळाला आत्तापासून ह्या सगळ्याची सवय हवी म्हणून मला घेऊन जायचे हे ठरवले. एकच घर असल्याने २ मिनिटात तिथे पोहचलो तर सगळे आमची वाटच बघत होते. सगळ्यांनी आपापल्या चिठ्ठ्या काढून खाली ठेवल्या, जवळपास पन्नास एक चिठ्ठ्या झाल्या होत्या. हे बघून सगळेच हसू लागले. घरात मी सगळ्यात लहान होते त्यामुळे मोठ्या भावंडानी पण नावं लिहून आणली होती. अगदी तन्मयनेपण आईच्या मदतीने २-३ नावं लिहून त्याच्या चिठ्ठ्या केल्या होत्या. सगळेजण खूपच आनंदी होते. आज्जीने अगोदर चहापाणी करून मग चिट्ठी उचलूयात असे सुचवले पण सगळ्यांनी त्याला नकार देऊन अगोदर नाव ठरवायचे नंतर सगळे, असे सांगून तिला तिथे बसायला भाग पाडले. मीपण त्यादिवशी खूप खुश होते. प्रत्येकाला मला घ्यायचे होते त्यामुळे मी सगळ्यांकडे फिरत होते पण अजिबात रडले नाही की कुरकुर केली नाही उलट छान हसून मीपण सगळ्यांशी खेळत होते. आईने बाबांकडे पाहून मला दाखवले तेव्हा बाबांनीपण लेक कोणाची आहे म्हणून कॉलर

ताठ करून घेतली. प्रत्येकाला चिट्ठी काढायची घाई असल्याने तन्मयला बोलवून एक चिट्ठी काढायला सांगितली आणि प्रत्येकजण ती घेऊ लागल्यावर पणजोबांनी तन्मयला चिट्ठी त्यांच्याकडे आणून द्यायला सांगितले व नाव वाचले तर त्यावर 'सई' म्हणून नाव आले. तन्मय, श्रीराम काका, मीना मावशी, अर्पिता ताई आणि पणजोबा ह्यांनी त्याच नावाची चिट्ठी लिहिल्याने ते एकदम खुश झाले. बाकीच्यांनी मात्र तन्मय आता तुला आज चक्कर नाही मारणार गाडीवरून म्हणून त्याला अगदी रडू येईपर्यंत खूप चिडवले. शेवटी पणजोबांनी सगळ्यांना ओरडून तन्मयला मांडीवर घेऊन त्याला आवडणारे साखरफुटाणे देऊन शांत केले.

घरीच खूप मोठा दिवाणखाना असल्याने तिथेच सगळ्यांचे साखरपुडा व बारसे झाले होते अर्थात माझे बारसेपण तिथेच होणार होते. आता बारशाच्या दिवशी काय नाव ठेवायचे हे ठरवल्यानंतर जेवणाचा बेत, अजून कुठली तयारी करायची, कोण काय काम करणार हे सगळे ठरवणे सुरु झाले होते. आपापल्या कामाची प्रत्येकाने यादी करून जेवण करून सगळे घरी परतले.

घरी माझ्या पिढीत शेवटचेच बारसे असल्याने जोरदार तयारी केली होती. जवळपास २००-२५० जण बारश्यासाठी आले होते. सगळीकडे उत्साह पसरला होता. मला काकू व मावशीने खूप छान तयार केले होते.

नीलूआत्या माझे नाव ठेवणार होती. एक नाव ठरलेले असल्याने बाकीची ४ नावे आईने सुचवली होती तेव्हा तिने आईला,''तू तीन नावं सांग ग. एक नावं मी माझ्या आवडीचे ठेवणार'' म्हणून सांगितल्यावर मग आईने स्वरा आणि प्रणाली ही दोन नावं मला आवडली आहेत आणि पत्रिकेप्रमाणे हिचे 'हे' अक्षर आले आहे तेव्हा कुठले नावं ठेवायचे ह्याचा अजून मी विचार केला नाहीये. तेव्हा आत्याने लगेच सांगितले अग मी हिचे नावं हेमालीच ठेवणार होते. आज्जी लगेच म्हणाली मग पत्रिकेत हेमाली ठेवू. तेव्हा आईला तिसरे नावं सुचवायला सांगितले. आईने मग तिसरे नावं मृण्मयी म्हणून सांगितले.

बाकीची सगळी सोपस्कर होऊन आत्या नाव ठेवायला म्हणून माझ्या कानाजवळ झुकली तेव्हा बाबांनी सांगितले माझ्या परीचे तुम्ही काहीही नाव ठेवा पण मी तिला 'मानसी' म्हणूनच हाक मारणार. आत्याने परत एक एक नाव सांग म्हणून सांगितले तेव्हा आईने हेमाली, स्वरा, प्रणाली, सई आणि मानसी अशी नावे सांगितली. सगळ्यांनी आत्याला इतक्या गुद्द्या मारल्या की तिला सरळ होतानापण खूप त्रास झाला. सगळ्या काकू व आत्याने एक. सगळ्या मावश्यांनी व मामींनी एक, दोन आज्जींनी मिळून एक असे तीन पाळणे गायले. आणि उरलेली २ तिथे जमलेल्या बाकीच्या नातेवाईक व मैत्रिणींनी गायले. बाबांनी 'मानसी' हे नाव लिहून सगळ्यांना द्यायला छोटे छोटे बॉक्स तयार करून त्यात बर्फी घातली होती.

त्यावेळी बाबांनी मागे लागून ही जबाबदारी स्वतःवर का घेतली हे सगळ्यांना आत्ता समजले. जेवणाचा बेत पण छान केला होता. मुलगी झाली म्हणून जिलेबी आणि बाकीचा सगळा महाराष्ट्रीयन स्वयंपाक केला होता. सगळेचजण आम्ही केलेले आदरातिथ्य आणि आमच्यातली एकी बघून खुश होऊन आशीर्वाद देऊन घरी परत गेले.

थोडे दिवस सगळेजण मला ‘सई’ व बाबा ‘मानसी’ म्हणून हाक मारायचे पण सगळ्यांना मानसी हेच नाव जास्त आवडू लागल्याने सगळ्यांनी मला मानसी म्हणून हाक मारायला कधी सुरुवात केली हे त्यांनापण कळले नाही. आणि माझे एकच नाव झाले.

सगळ्यांचे शेंडेफळ असल्याने मी भरपूर लाडावले होते. आईबाबा रोज सकाळी मला आज्जीकडे सोडून तन्मयला शाळेत सोडून ऑफिसला जायचे. मला व तन्मयला सांभाळण्यासाठी आणि घरातली थोडीफार कामे करण्यासाठी लताताई रोज यायची पण ती थोडी उशिरा येत असल्याने तोपर्यंत माझा मुक्काम आज्जीकडे असायचा. बऱ्याचदा लताताई आली तरीही आज्जी तिला बाकीची कामे उरकून मग घेऊन जा म्हणून सांगून तोपर्यंत आज्जीआजोबा आणि पणजोबा माझी काळजी घ्यायचे. नंतरसुद्धा बरेचदा काकू, ताई किंवा दादा ह्यापैकी कोणीतरी एक मला घेऊनच जायचे. मी सगळ्या घरभर हिंडायचे. अगदी जेवायलासुद्धा मी रोज कुठल्यातरी

काकूबरोबर असायची. सगळ्यांची मुलं मोठी झाल्याने मी अगदी ७-८ वर्षाची होईपर्यंत सगळेजण अगदी लाडाने भरवायचे. मला जे आवडायचे नाही तेपण अजिबात वाढायचे नाहीत मग रात्रीपण मी स्वतःच्या हाताने जेवायची नाही, नावडता पदार्थ केला की खायला रडायची तेव्हा मग आई ओरडायची आणि सगळे खाल्लेच पाहिजे म्हणून अजून वाढायची. तेव्हा आईचा खूप राग यायचा, बाकी सगळेजण चांगले आहेत आणि आपली आईच खूप वाईट आहे असा समज करून घेतला होता मी. हळूहळू आजीच्या हे लक्षात आल्यावर मात्र तिने सगळ्यांना दटावलेच आणि निक्षून सांगितले की मानसीला कोणीही झाडावर चढवायचे नाहीये. जे तुम्ही घरी केले आहे ते तिने खाल्लेच पाहिजे. अतिलाडावून ठेवून तुम्ही सगळे तिचे नुकसान करत आहात. त्याचा सगळ्यात जास्त त्रास तिच्या आईला होत आहे. सईला तिच्या मनाप्रमाणे वाढवता येत नाहीये. हे ऐकून मात्र सगळ्यांनी माझ्यावर खूप प्रेम असल्याने त्यांचे वागणे सुधारले. मी चुकले की मला सांगायला आणि ओरडायला सुरुवात केली पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. सगळ्यांचे डोळे उघडल्याने आणि मी बिघडू नये म्हणून सगळ्यांना आता माझ्या चुका दिसून त्यांनी ओरडायला आणि चुका दाखवायला सुरुवात केल्यामुळे तर मी खूपच बिथरले. त्यामुळे मी सुधारण्याच्या ऐवजी उद्धट झाले होते.

मी स्वभावाने एकदम स्पष्टवक्ती, फटकळ झाले होते. कोणी 'का' म्हंटले की लगेच 'वा' म्हणायची सवय लागली. नातेवाईक आणि सोसायटीमधले सगळेजण मला नावं ठेवायला लागले, उद्धट म्हणायला लागले पण 'कोणाला त्यांची पर्वा आहे' असे म्हणून मी आणखीनच उध्दटासारखी वागायला लागले. दिसायला तशी छान असूनही अश्या स्वभावामुळे सगळ्यांनी माझे कौतुक करणेच बंद केले. त्यामुळे मी दिसायला इतकी छान असेल हे मला ठाऊकच नव्हते.

तसे माझ्यात खूप सारे चांगले गुणपण होते. अभ्यासाबरोबरच मी गाणेपण छान गायची आणि नाचपण बऱ्यापैकी करायची शिवाय स्पोर्ट्स, योगासनमध्ये पण चांगली होते. मी कोणालाही कधीही कुठलीही मदत पाहिजे असल्यास त्यांनी न विचारतासुद्धा मदत करायला स्वतःहून जायची आणि पूर्णपणे झोकून त्यांना मदत करायची. स्वभावाने खूप मोकळीपण होते. त्यामुळे खूप हसायची आणि हसवायचीसुद्धा. पण फटकळ स्वभावापुढे बाकीचे सगळे चांगले गुण झाकून गेले.

थोडी फटकळ, उद्धट आणि सडेतोड हा स्वभाव असल्यामुळे शाळेतपण सगळे घाबरून राहायला लागले. मी कोणालाही आणि कशालाही घाबरत नसे. साधारण आठवीत असताना एक दिवशी दातार आज्जींनी सून,लेक व नातवंडे बाहेरगावी गेले असताना माझ्या ह्या निडर

स्वभावामुळे मला त्यांच्याकडे सोबत म्हणून झोपायला बोलावले. आईने आज्जी एकट्या असल्याने त्यांना जेवायला घरी बोलावले. जेवण झाल्यावर घरातले सगळेजण बाहेर गप्पा मारत बसलेलो असताना शेजारपाजारचेपण गप्पा मारायला आले आणि रात्रीचे १२.३० कधी वाजले कळालेच नाही. सगळेजण झोपायला म्हणून उठले आणि आईने मला, "तुझी चादर घेऊन मग त्यांच्याकडे जा", असे सांगून मला चादर आणायला आत पिटाळले. मी यायच्या आतच आज्जी आदित्यला त्यांना घरी सोडायला सांगून निघून गेल्या आणि अर्ध्यावर गेल्यावर तिथूनच आईला सांगितले,"मानसी कोणाला आणि कशालाही घाबरत नाही ना मग आज तिला एकटीला येऊ दे घरी". साधारण ३-४ घरं सोडून त्यांचे घर होते. मी बाहेर येतायेता त्यांचे बोलणे ऐकले आणि जाम चिडले. "आज्जींना आज झोपू दे एकट्यांना. मी नाही जाणार झोपायला त्यांच्याबरोबर. एकटीला झोपायला भीती वाटते म्हणूनच बोलावले आहे ना त्यांनी मला आणि मलाच उलट तोरा दाखवतात". पण आईने माझे काहीही ऐकून न घेता मला जायला सांगितले आणि "दारातून हाक मारून सांग पोहचलीस की, मी इथेच उभी आहे", असेपण सांगितले. आईला नाही म्हणू न शकल्याने गुपचूप जायला निघाले तोपर्यंत आईने परत हाक मारून बोलावले आणि म्हणाली,"उगाचच रात्री काही खोडी काढू नकोस, गुपचूप झोप आणि सकाळी उठून लगेच ये". आईला आपल्या मनातले कसे काय कळले असेल ह्याचा विचार करत मी दारापर्यंत पोहचले तोपर्यंत आईनेच

"पोहचलीस का?" म्हणून विचारल्यावर होकार देऊन गुपचूप आत गेले आणि काहीही न बोलता लगेच झोपले. सकाळीपण जाग आल्याआल्या लगेच घरी परत आले.

शाळेमध्येपण मला सगळेजण घाबरत. शेजारीपाजारी खूपजणांना मी आवडत नसले तरीही शाळेतमात्र मी खूपजणांची लाडकी! तीन शिक्षकांची तर खूपच लाडकी. अभ्यास नीट करते की नाही शिवाय इतरवेळी पण माझ्याकडे त्यांचे बारीक लक्ष असायचे. तशी मी बाकीच्या गोष्टींमध्येपण चांगली असल्याने शाळेत बाकीच्या कार्यक्रमातपण सगळीकडे असायची. नशिबाने खूप छान मित्रमैत्रिणी लाभल्या. सगळेमिळून खूप धमाल करायचो. तिथेपण माझी दादागिरी चालायची. माझा स्वभाव सगळ्यांना माहीत असल्याने सगळे मला सांभाळून घ्यायचे. सगळेजण नेहमी मला सांगत की तुझ्यात १० पैकी ८ गुण चांगले आहेत पण ह्या फटकळ स्वभावाने आणि दादागिरी करण्यामुळे कोणाला ते दिसत नाहीत त्यामुळे दादागिरी करणे थोडे कमी कर" पण मी कोणाचे कधी ऐकेल तर शपथ!

कॉलेजमध्ये असताना पण मला ग्रुपबरोबरच दोन जीवाभावाच्या मैत्रिणी लाभल्या. तिकडेपण अशीच एकदम बेधडक वागल्यामुळे कोणी तसा काही त्रास दिला नाही. तसे एकचजण मागे लागला पण त्याला मी उलट प्रश्न विचारून इतके हैराण केले की घाबरून तो तिथून निघूनच गेला.

नंतर बरेच दिवस मी जायच्यायायच्या वाटेवर माझ्याकडे एकटक बघत उभा असायचा पण मी त्याला काहीच किंमत न दिल्याने जवळपास ६ महिन्यांनी तो अदृश्यच झाला अगदी कॉलेजमध्ये पण कधी दिसला नाही. अजून कोणी माझ्या मागे नाही लागले. हो! एकाला बहुतेक मी आवडायची पण त्याची विचारायची कधी हिम्मतच झाली नाही. पण बाकी खूप मज्जा केली कॉलेजमध्ये. हिंडणे, फिरणे, रोज वडापाव/सामोसा व चहा पिणे, कॉलेज बंक करून झाडाखाली बसून सगळ्या जोडप्यांना चिडवणे, उगाचच तिकडून येणाऱ्याजाणाऱ्यांच्यावर काहीतरी ताशेरे ओढणे असे करून मस्त टाईमपास करायचो आणि वेळ झाली की घरी जायचो. परीक्षा १५ दिवसांवर आली की मात्र उठताबसता, खातापिता फक्त आणि फक्त अभ्यास करायचो. तशी हुशार असल्यामुळे दरवेळी जरा बरे मार्क पडायचे त्यामुळे घरीपण कोणाला काही तक्रार नसायची.

कॉलेज संपल्यावर चांगली नोकरी लागली. तिथे मात्र मला मी दिसायला खूप छान आहे ह्याचा साक्षात्कार झाला! पण तरीही कोणाशी सूर काही जुळले नाहीत. त्यामुळे आईवडिलांच्या पसंतीनेच लग्न होणार हे नक्की झाले. माझ्यापेक्षा मोठ्या मावसबहीणीचे गेले २-३ वर्षे लग्नच ठरत नव्हते त्यामुळे खरेतर थोडे टेन्शन आले पण तरीही मी दिसायला चांगली असल्याने आईवडील तसे निश्चिन्त होते.

बाहेरच्या देशात जायचे खूप कौतुक होते त्यामुळे तशीच स्थळे जास्त बघायला सुरुवात केली. बरीच स्थळे बघितली. खरेतर बाबांनाच कुठली स्थळ पसंत पडत नव्हती. फक्त दोन ठिकाणाहून नकार आले होते, बाकी बाबाच नको म्हणत होते. त्यातच एकदा ओळखींच्याकडून एक स्थळ आले. देशमुखांचा एकुलता एक मुलगा MS करायला US ला गेला होता आणि आता US च्या जवळच ड्रिमलँड नावाचा छोटा देश आहे तिथे नोकरी करत होता. त्याचे वडील खूप मोठ्या पोस्टवर कामाला होते, आई गृहिणी होती. मुलगा दिसायला ठीक होता, चष्मा होता, प्रकृती थोडीशी स्थूल होती. अगोदर दिसायला असा मुलगा, हो कसे म्हणायचे हे मनात आले पण कुठेही स्थळ जमत नव्हते त्यामुळे मी काहीच बोलले नाही. आईवडील भरपूर श्रीमंत, मुलाला जरी आत्ता चांगली नोकरी नसली तरीही नंतर चांगले होईलच. आई थोडीशी खडूस वाटत असली तरी वडील खूप चांगले वाटत आहेत. एकुलता एक असल्यामुळे त्यांचा कायम पाठिंबा असेलच असा सगळा विचार करून आई बाबांना हे स्थळ एकदम योग्य वाटले. ६ महिने ऑनलाईन बोलल्यानंतर आमचे लग्न ठरले. लग्नाचे मुहूर्त ६ महिन्यांनी असल्याने हेमंत तेव्हाच काही दिवस अगोदर येणार होता.

मी आणि तन्मय असे आम्ही दोनच भावंडं. तन्मयचे लग्न झाले होते, तो मुंबईला नोकरी करत असल्याने दोघेजण तिकडे राहायचे. जरी कुटुंब मोठे असले आणि खूपदा सगळे एकमेकांच्या घरी यायचो जायचो

तरीही घरी आईबाबा व मी असे तिघेच होतो. त्यामुळे आम्ही एकमेकांच्या खूपच जवळ आलो होतो. माझे लग्न झाल्यावर आता दोघेच कसे राहतील हा प्रश्न मला नेहमी पडायचा पण नवीन संसाराची स्वप्न पण पडत होती. लग्न ठरल्यानंतर आईबाबा खूपच हळवे झाले होते. आपली लेक आपल्याला सोडून सातासमुद्रापार जाणार, मन होईल तेव्हा भेटता नाही येणार, ह्यामुळे सारखे डोळ्यात पाणी येत होते. तसेही तिघेच असल्याने भरपूर लाड होत होते पण आतातर दोघेजण मला अगदी तळहाताच्या फोडासारखे जपत होते.

ह्या पिढीतले हे शेवटचे लग्न असल्याने, शिवाय आता भरपूर वाहिनीपण आल्याने घरीतर खूपच उत्साहाचे वातावरण होते. सहा महिन्यांनी लग्न असूनही सगळ्यांनी मिळून आत्तापासून तयारी सुरु केली होती. हेमंत एकुलता एक असल्याने त्यांनीपण जोरदार तयारी सुरु केली होती. दोन्हीकडचे खूप हौशी आणि कलाकारमंडळी असल्यामुळे तर प्रत्येक गोष्ट कल्पकतेने करत होते. प्रत्येकाने आपली कल्पना समोर ठेवून सगळ्यांनी मिळून जोरदार लग्न करायचे ठरवले होते. खुपजण नोकरी, धंद्यानिमित्त बाहेरगावी राहत होते पण लग्न ठरल्यानंतर सगळेजण ठरवून ४-५ दिवस सुट्टी घेऊन लग्नाचे सगळे ठरवायला म्हणून आले होते. अगदी सगळ्या मामी, काकू,मावशी,आत्या,मामा,काका शिवाय मामे, मावस, आत्ये, चुलत भाऊ, भावजय, बहिणी, जीजू शिवाय सगळे भाच्चेमंडळी

जमा झाले होते. खुपजण असल्यामुळे प्रत्येक गोष्टीत एकमत व्हायला खुपवेळ लागत होता. त्यात बऱ्याचदा खूप वादपण होत होते, शेवटी आज्जीआजोबा मध्ये पडून सगळ्यांचे ऐकून आईबाबा, तन्मय व मधुराचे (वहिनी) मत ऐकून निर्णय द्यायचे. सगळे ठरवायला जवळपास २-३ दिवस लागले. पूर्ण कार्यक्रमाची रूपरेखा व ते काम कोण कोण करणार हे लिहून काढले. हे सगळे ठरवताना जे नवीनच लग्न होऊन घरी आले होते त्यांना खूप आश्चर्य वाटत होते की मानसीच्या लग्नाचे सगळे तिचे आईवडील, तन्मय न ठरवता सगळे मिळून ठरवत आहेत आणि कोणालाच वाईट कसे वाटत नाही पण हे सगळे बघून तेपण आमच्यातले एक होऊन सगळे ठरवायला मदत आणि धमाल करत होते. निघायच्या दिवशी मात्र सगळेजण खूप भावुक झाले होते. मी लग्न होऊन लगेच सासरी चालले आहे का असे वाटावे इतके सगळेजण हळवे होऊन रडत होते. मी प्रत्येकाची किती लाडकी आहे हे मला त्यावेळी खूप जाणवले.

लग्नाच्या अगोदर १० दिवस सगळेजण सुट्टी काढून आले होते. इतके मोठे घर असूनही कमी पडत होते. चिल्लीपिल्लीपण खूप असल्याने गोकुळच झाले होते. सगळेजण जोरदार तयारीने आले होते. प्रत्येक गोष्ट कलात्मक पद्धतीने केली होती.

सासरकडच्यांना देण्यात येणाऱ्या साड्या मनमोहक पद्धतीने काठवर येतील असे घडी करून ते साडीबॅग मध्ये घालून त्याला लेस लावली होती त्यावर आम्ही एरवीपण वापरता येतील असे बटवे करून त्यात ओटीच्या पुड्या करून घातल्या होत्या. पुरुषांना देण्यात येणाऱ्या कपड्यांना वेलवेट कापडात घालून त्याला वर लेसने पॅक केले, हुंडा द्यायला म्हणून हत्ती तयार करून त्याला खालून वेल्क्रो लावून त्यात १०१ रुपये घातले, हेमंतच्या हातात असणारा नारळ आम्ही मोर करून त्यात घातला, शिवाय प्रत्येक प्रसंगी देणारे दागिने जसे हेमंतला सोन्याची साखळी, अंगठी व कडे केले होते, ते वेगवेगळ्या प्रसंगी देणार असल्याने प्रत्येकाला वेगळे पॅकिंग केले. साखळीसाठी आम्ही रंगीत कागदावर पेंटिंग व लेस च्या साहाय्याने त्याला हुबेहूब झब्ब्याचा आकार देऊन कॉलरला ती साखळी अडकवली. अंगठीसाठी गुलाबाचा गुछ तयार करून फांद्या सगळ्या लेसने बांधून तिथे चमकणाऱ्या कागदाने अंगठी गुंडाळून त्याला बांधली. कडेमात्र हातातच घालू म्हणून सगळ्या भावंडानी सांगितले. काकूंना ३ साड्या द्यायच्या होत्या. त्यातली एक पैठणी होती त्याला मोराचे काठ होते म्हणून मग आम्ही मोर तयार करून त्यात साडी ठेवली. दुसरी कोल्हापुरी सिल्क होती त्याला महालक्ष्मीचा फोटो आणून त्याची फ्रेम करून आतल्या बाजूला साडी ठेवून पारदर्शक कागदाने त्याचे पॅकिंग केले. तिसरी हिरवी साडी - त्याला आम्ही मॅचिंग पर्स आणून त्यात घातली. सासऱ्यांना शेरवानीबरोबर येणाऱ्या कव्हरमध्येच घालून त्यात त्यांना आवडणारे पुस्तक लावले. आणि

पॅन्टशर्टबरोबर सगळ्या ऍक्सेसरीज एकाबाजूला ठेवून पारदर्शक कागदाने पॅकिंग केले. आजेसासूबाईंसाठी नऊवारी पैठणी घेऊन ती अगदी पारंपरिक पद्धतीने त्यांना हातात देऊन त्यावर खणानारळाने ओटी भरायची असे ठरवले. शिवाय सख्खी नणंद नसल्याने हेमंतच्या मावसबहिणीला सुंदर ड्रेस घेऊन त्यावर जाणारे कडा, गळ्यातल्याचा सेट, टिकली पाकीट असे सगळे घालून ते सगळे एका सुंदर सॅक मध्ये घालून त्याला सगळीकडे गुलाबाची फुलं तयार करून त्यावर लावली.

आम्ही डेकोरेशनचे कॉन्ट्रॅक्ट न देता स्टेज डेकोरेशनसाठी सगळे डेकोरेशन घरीच केले. स्टेजला मागे लाल वेलवेटचा कपडा अगोदरच लावला होता. त्यावर आम्ही ठराविक अंतराने लावायला म्हणून हिरव्या, पांढऱ्या रंगाच्या फुलांच्या माळा आणल्या. त्यावर आमच्या दोघांचा फोटो मधोमध लावण्यासाठी एक कार्डबोर्ड कापून (हेमंत आल्यावर आम्हा दोघांचा फोटो काढून त्यावर लावला होता) त्याला बाजूने लाल गुलाबाची फुलं तयार करून आकर्षक पद्धतीने लावली. व दोन्ही बाजूला लावण्यासाठी पिवळ्या गुलाबाची फुले तयार करून त्याने आम्हा दोघांची नावे लिहिली. शिवाय वरून फुलांची भरपूर झुंबरं लावली होती. आम्हाला दोघांना बसायला पांढरा सोफा व बाजूला पण २ सोफा ठेवले होते. दोन बाजूला कोपऱ्यात मोठे मोठे फ्लॉवरपॉट ठेवून त्यात वेगवेगळी फुले घातली होती. शिवाय स्टेजच्या पायऱ्यांवर नवरात्रीत कसे घट बसवतो तसे

प्लास्टिकच्या बाटल्यांना वरवधूचे पेंटिंग करून त्यात वेगवेगळ्या प्रकारची छान दिसणारे धान्य घालून ते वाढवून प्रत्येक पायरीवर दोन्ही बाजुंनी ठेवले होते. खूपच छान दिसत होते सगळे. अगदी त्यानंतर बाबांना खूपजणांनी स्टेज डेकोरेशन करून देणार का म्हणून विचारले.

"घरी खूप भांडी आहेत आणि बरेचसे सामान आहे तेव्हा रुखवतात फार भांडी देऊ नका", असे काकूंनी(सासूबाई) अगोदरच सांगितल्यामुळे आम्ही अमेरिकेत नेता येईल असे सामान घेतले आणि खूप कल्पकतेने रुखवत तयार केला. खूप साऱ्या खायच्या गोष्टी जसे फराळ, बर्फी, फळे असे घेऊन त्याने कल्पकतेने नवीन आकार देऊन त्या मांडल्या. रुखवत बघून आम्हीच आमच्यावर जाम खुश झालो होतो इतका छान झाला होता. शिवाय अक्षता, मुंडावळ्या, सप्तपदी, हार, खूपच वेगळ्या पद्धतीने केले होते. सगळ्यांना अक्षता देण्यासाठी खूप छान मनमोहक बटवे तयार केले. प्रत्येक येणाऱ्या सुवासिनीला द्यायला ताट/ ब्लाउजपीस ऐवजी मी, आई आणि बाबांनी घरीच छान शोपीस तयार केले, पोटली करून त्यात ओटी भरली व आकर्षक गिफ्ट पॅकिंग केले. परत लवकर काही इतके मोठे कार्य होणार नसल्याने आम्ही प्रत्येक गोष्ट सढळ हाताने आणि खूप उत्साहाने करत होतो.

सासरकडच्यांनीपण कुठेही काहीही कमी केले नाही. प्रत्येकाला द्यायचा आहेर त्यांनी खूपच आकर्षक पद्धतीने पॅक केला होता. अगदी शेरास सव्वाशेर ह्याप्रमाणे खूपच छान आणि खूप कलात्मक पद्धतीने पॅकिंग केले होते. त्यांनी दिलेली पेशवाई नऊवारी घरी जाताना नेसायची हे काकूंनी अगोदरच सांगून ठेवले होते. हेमंतने पण पेशवाई पोशाख परिधान केला होता. घरी जाताना आमची रथातून वरात काढली होती. रथपण पूर्ण फुलांनी सजवला होता. अगदी प्रवेशद्वारापासून, लिफ्ट व तिसऱ्या मजल्यावर लिफ्टमधून बाहेर पडून ते देवघरापर्यंत फुलांचा सुंदर गालिचा तयार केला होता. रथातून उतरून आम्ही गुलाबाच्या फुलांनी सजवलेल्या गालीचावरच पाय ठेवला होता. शिवाय माप ओलांडायला म्हणून भांडे पूर्ण सोनेरी रंगाने रंगवून त्याला खड्यांनी सजवले होते. पूर्ण घराला लाइटिंग, फुलांच्या माळा, आमच्या दोघांचे वेगवेगळया पोज मध्ये काढलेले खूप सारे फोटो, ठिकठिकाणी खूप सारे फुलांचे मोठमोठे फ्लॉवरपॉट ठेवून घर अगदी सुसज्ज केले होते. इतके सगळे भव्यदिव्य बघून डोळे हरपून गेले होते.

फ्रेश होऊन लक्ष्मी पूजनासाठी काकूंनी दिलेली पांढरी व लाल काठाची पैठणी, त्यावर सुंदर ट्रॅडिशनल मोत्यांचे दागिने घालून तयार झाले. हेमंतने पांढरा लखनवी झब्बा, मरून सलवार त्यावर मोत्यांची माळ घातली होती. खूप छान दिसत होता. आज्जीसासूबाईंना नमस्कार केला तेव्हा त्यांनी अगदी बोटं मोडली. आई, बाबा, काका, काकू, मावश्या, काका, भावंडं

सगळयांनी जेव्हा हा सगळा थाटमाट बघितला तेव्हा त्यांचे डोळे दिपून गेले होते, माझे इतके झालेले कौतुक बघून सगळयांच्या डोळयात पाणी आले. लक्ष्मीपूजन पण एकदम थाटामाटात खूप सारे डेकोरेशन केलेले असतानासुद्धा पूर्ण पारंपरिक पद्धतीने झाले आणि हेमंतने जेव्हा नाव बदलायला म्हणून तांदूळ घालून खूप छान सजावट केलेले ताट हातात घेतले तेव्हा नाव बदलणार नाही हे माहित असल्यामुळे काही वाटले नाही. पण तेव्हाच आज्जेसासूबाई म्हणाल्या,"हेमंत मी सुचवलेले की आईने सुचवलेले नाव ठेवणार आहेस?" आणि हेमंत पण "आज्जी तू सुचवलेले नाव छान आहे ग!" त्यावर काकू,"काय रे किती नावं शोधून काढून त्यातले मला आवडलेले नाव सांगितले, त्याचे काहीच नाही का तुला, जाऊ दे." म्हणून थोड्याश्या रागावल्या. हे सगळे ऐकून तर मला धडकीच भरली. 'अरे नाव बदलायचे नाही असे ठरले होते ना!' असे मी त्याला मनातल्या मनात सांगितले आणि एक रागाचा कटाक्ष त्याच्याकडे टाकला पण त्याने सरळ सरळ दुर्लक्ष केले आणि खाली वाकून मला दिसणार नाही असा ताटावर हात ठेवून नाव लिहायला लागला. मी अगदी वाकून वाकून काय नाव लिहीत आहे हे बघत असतानाच शेजारी बसलेल्या मावस बहिणीला म्हणाले,"बाबांनी एवढ्या प्रेमाने ठेवलेले नाव बदलायचे नाही असे ठरले होत ग आमचे". तीपण काहीही न बोलता फक्त 'हं' म्हणाली. नाव बदलणार म्हणून आलेली उदासीनता आणि आता आपले काय नाव होणार ह्याची उत्सुकता अश्या संमिश्र भावनेने मी अगदी थोडीशी वर होऊन ताटाकडे

बघत होते तर साहेबांनी सगळ्यांसमोर सांगितले,"सरळ बस की. अशी काय वाकून वाकून बघत आहेस". रागाने चेहरा पार लालबुंद झाला होता पण काहीच न बोलता मी गळ्याशी आलेला आवंढा गिळून खाली मान घालून शांत बसले. हेमंतने नाव लिहून सगळ्यांना दाखवले. सगळ्यांनी अगदी जोराने टाळ्या वाजवल्या पण मी अजिबात बघितले नाही, खूप मोठा अपमान झाला होता माझा. सासूबाई माझ्याशेजारी बसल्या. मला त्यांच्याकडे बघायला सांगून त्यांच्या हातात असलेल्या चेनवरचे शब्द मला मोठ्याने वाचायला सांगितले. "मनमंत " असे मी वाचले आणि एकदम गोंधळून गेले. सगळेजण जोरजोरात हसायला लागले. आईला पण हसताना बघूनतर मला अजूनच राग आला. एवढे सगळे होऊनही मी ना ताटाकडे बघितले ना हेमंतकडे. शेवटी तोच म्हणाला, "आमच्या बाईसाहेबांच्या इच्छेविरुद्ध त्यांचे नाव बदलायची आमची हिंमत तरी आहे का? पण तरीही माझा अपमान केला ह्या भावनेने मी काही शांत झाले नव्हते उलट डोळ्यातून येणारे अश्रू कितीही दाबायचा प्रयत्न केले तरी बाहेर पडले. आईबाबांनी काहीतरी बोलून सगळ्यांचे लक्ष त्यांच्याकडे ओढून घेतले आणि मी लगेच स्वतःला सावरले. एक काकूंच्या आणि एक काकांच्या हातात अश्या दोन सारख्या चेन त्या दोघांनी आमच्या गळ्यात घालून "नेहमी असेच एकत्र होऊन एकमुखाने संसार करा" असा आशीर्वाद दिला. मी अजूनही रागात होते पण हेमंत, आईबाबा आणि काकांनी मी शांत

होईपर्यंत परिस्थिती छान हाताळली आणि माझा सगळ्यांसमोर तमाशा होण्यापासून मला वाचवले.

नंतर सगळ्या भावंडानी हेमंतला तयार केलेला मोठा बॉक्स देऊन तो सगळ्यांसमोर उघडायला सांगितला. सगळ्या भावंडानी एकदम मिश्किल भाव चेहऱ्यावर आणल्यामुळे त्यात काहीतरी वेगळेच असणार असे हेमंतला वाटून त्याने आपण नंतर उघडूयात असे सांगूनही कोणी न ऐकल्यामुळे अगदी अस्वस्थतेने बॉक्स उघडला तर त्यात टाय बघून थोडे हुश्श झाले पण अजून एक बॉक्स बघून त्याने, "आत अजून १० बॉक्स आहेत का? आणि सगळ्या छोट्या बॉक्स मध्ये काय आहे सांगा?" असे विचारल्यावर सगळे हसायला लागले. मलापण आता बरोबर वचपा काढू ह्या विचाराने हसू आले. त्याला मी लगेच म्हणाले,"एवढे काय घाबरतोस आम्ही तुझे नावतर नाही बदलणार आहोत ना मग उघड की बिनधास्त." आईने लगेच माझ्याकडे डोळे मोठे करून बघितले आणि भावंडानी त्यावर जोक करून परिस्थिती निवळायला मदत केली. शिवाय हेमंतला माझा स्वभाव माहित असल्यामुळे त्यानेही मनावर घेतले नाही आणि दुसरा बॉक्स उघडला तर वरती टायपिन ठेवली होती. त्यातल्या आतल्या बॉक्सवर अत्तर, नंतर पेन, बेल्ट अश्या एकेक वस्तू बाहेर काढल्यानंतर छोटा बॉक्स हातात घेऊन त्याने तो खिशात ठेवला. सगळ्या भावंडानी परत आग्रह करून तो बॉक्स उघडायला त्याला भाग पाडले. खूपच टेन्शन आले होते

बिचाऱ्याला पण मलामात्र त्याची फजिती पाहून आनंद होत होता. हळूहळू त्याने बॉक्स उघडला आणि त्याने 'हुश्श' म्हणून एक निःश्वास सोडला तेव्हा सगळयांनी 'अरे त्यात काय आहे ते दाखव' म्हणून त्याची अजून खिल्ली उडवली तेव्हा त्याने लगेच हसत त्यात ठेवलेले ब्रेसलेट काढून सगळयांना दाखवले आणि माझ्याकडे देत मला घालायला सांगितले. मीपण एकदम खुश होऊन ते ब्रेसलेट त्याच्या हातात घातले. बाबा शेजारी येऊन हळूच कानात "गेला ना राग तुझा आता, सगळे सोडून देऊन नव्याने आज संसाराची सुरुवात कर" असे म्हणाले. बाबांना आलेले टेन्शन बघून मी त्यांचा हात दाबून त्यांना त्याची ग्वाही दिली तेव्हा कुठे ते थोडे रिलॅक्स वाटले पण तरीही आईबाबांना थोडे टेन्शन आल्याचे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

सगळा कार्यक्रम संपून जेवणे व्हायला खूपच उशीर झाला होता. दुसऱ्यादिवशी सकाळी सत्यनारायण असल्यामुळे फ्रेश होऊन आम्ही सगळे एका बेडरूममध्ये लगेच झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी मी उठेपर्यंत लहान मुलं सोडून सगळे उठले होते. जाग आल्यावर आजूबाजूला फक्त लहान मुलं बघून खूप कसेतरी झाले. लगेच उठून पटकन फ्रेश व्हायला म्हणून बेडरूममध्ये गेले तर तिथे हेमंत अंघोळ करून टॉवेलमध्येच आरश्यासमोर उभा होता. त्याला बघून अंगावर सर्रकन काटा उभा राहिला. एकदम कोण आले म्हणून त्याने टॉवेल सरळ करत मागे बघितले तर एकदम

चमकला आणि पटकन पुढे येऊन मला जवळ घेतले. मला एकदम काही सुचेचना. मीपण त्याच्या मिठीत घुसले, त्याने माझी हनुवटी उचलली. एवढी निडर असलेली मी त्याच्याकडे बघायची हिंमतच झाली नाही, डोळे मिटून घेतले होते. तोपर्यंत काकूंनी "हेमंत आवरले का?" असे म्हणून दार उघडले. दोघांचाही पुतळा झाला होता. पटकन काय करावे ते सुचलेच नाही. त्यांनी आम्हाला असे बघितल्यावर त्यांना पण काय बोलावे ते सुचले नाही पण पटकन स्वतःला सावरून "मानसी गुरुजी अर्ध्या तासात येतील, पटकन आवरून घे",असे सांगून निघून गेल्या. मी लगेच हेमंतचा हात काढून वॉशरूम मध्ये घुसले. २ मिनिट नुसतीच उभी राहून नंतर पटकन आवरून बाहेर आले तेव्हा हेमंत खोलीत नसलेला बघून निःश्वास सोडला आणि रुम लॉक करून साडी नेसून आवरून बाहेर आले.

कालचे पूर्ण डेकोरेशन जाऊन एकदम साधी पण मनमोहक सजावट केली होती. हे सगळे घरातल्यांनी केले होते. इतक्या लवकर कसे सगळे बदलले असेल ह्याचाच विचार मनात आला. सगळीकडे ठराविक अंतरावर घरी केलेल्या फुलांच्या माळा लावल्या होत्या. सत्यनारायणपूजापण एकदम साधी पण आकर्षक - चौरंगाला चार बाजुंनी चार केळीचे खुंट, चौरंगावर लाल सिल्कचा कपडा, त्यावर मधोमध तांदूळ, त्यावर चांदीचा तांब्या त्याला सोन्याची चेन, हळदीकुंकवाचे स्वस्तिक, ओम, त्यावर परत तांदूळ आणि सुपाऱ्या ठेवलेले ताम्हण. समोर ५ विड्याची पानं, त्यावर नाणं,

हळकुंड, खारीक, बदाम, खोबऱ्याचा काप असे खूप छान मांडले होते. त्यासमोर खूप छान छोटी रांगोळी काढली होती. बाजूला एकदम मोठी सत्यनारायणाची हुबेहूब रांगोळी काढली होती. समोर ताटामध्ये मांडलेली तयारीसुद्धा मनमोहक होती. पूजा सुरु व्हायला अजून १० मिनिटं असल्याने आज्जींनी मला स्वयंपाकघरात बोलावून साबुदाणा खिचडी, चटणी खायला दिली. माझे खाऊन होईपर्यंत ३-४ कप चहा तयार असूनसुद्धा माझ्यासाठी मस्त वेलदोडा, आले घालून ताजा चहा केला. चहा पिऊन एकदम ताजेतवाने झाले होते. माझी कृतज्ञता मी डोळयातून त्यांना दाखवली आणि त्यांनी पण मला डोळयातूनच 'तू फ्रेश व्हावीस म्हणूनच ताजा चहा केला' असे सांगून आशीर्वाद दिला, मग मी त्यांना नमस्कार केला तेव्हा अगदी प्रेमाने जवळ घेऊन "नेहमी हसतखेळत खुश रहा" म्हणून आशीर्वाद दिला.

लग्न झाल्यानंतर हेमंत ८ दिवसातच जाणार असल्यामुळे आम्ही हनिमूनला जाण्याऐवजी काही खरेदी राहिली असेल तर ती करून घरातल्यांबरोबर वेळ घालवायचा हे ठरवले. माझा व्हिसा आल्यानंतर मी ड्रिमलँडला त्याच्याबरोबर राहायला जाणार होते. तोपर्यंत काकाकाकू व आज्जींबरोबर राहता येईल, दोघे एकमेकांना समजून घ्याल. त्यांनापण सुनेबरोबर राहिल्याचे सुख मिळेल म्हणून मी इथेच त्यांच्याबरोबर वेळ

घालवावा असे हेमंतने लग्नाअगोदरच सांगितल्याने त्याप्रमाणे मी माझी मानसिक तयारी केली होती. ८ दिवस कसे आणि कुठे गेले ते कळलेच नाही. लग्न झाल्यावर हेमंत असताना एक दिवशी सकाळी आईकडे सगळ्यांना जेवायला बोलावले होते तेव्हाच आईबाबांना भेटले होते त्यानंतर मात्र वेळच मिळाला नव्हता.

हेमंतची फ्लाईट पहाटे ६ ची असल्याने आणि आम्ही सगळेजण त्याला सोडायला घरून रात्री ११ वाजता निघणार होतो. तो जायच्या दिवशी आईबाबाच त्याला भेटायला घरी आले होते. हेमंतने त्यांना सकाळीच बोलावल्याने आणि आम्ही आदल्यादिवशीच सगळे पॅकिंग करून ठेवल्याने तो दिवस सगळ्यांनी मिळून खूप छान घालवला. मला स्वयंपाकघरात येऊ न देता काकू व आईनी मिळून सगळा स्वयंपाक केला. जेवणं झाल्यावर आम्ही सगळेजण खुपवेळ पत्ते खेळलो. नंतर सगळ्यांनी मिळून चहा पीतपीत खूप साऱ्या गप्पा मारल्या. रात्री एकदम साधा स्वयंपाक करून जेवलो व नंतर सगळ्यांनी हेमंतला थोडी विश्रांती घ्यायला सांगितल्यामुळे आम्ही दोघे बेडरूममध्ये गेलो. आता उद्यापासून आपण इथे एकटे झोपणार हे जाणवल्यावर खूप कसेतरी झाले. त्याला सोडून ३-४ महिनेतरी इथे एकटीला राहावे लागणार होते ही कल्पनाच सहन होत नव्हती. आत आल्याआल्या त्याच्या मिठीत शिरले. खूप रडत होते मी आणि तो समजावत होता. "तीनच महिने लागतील सगळे व्हायला. तोपर्यंत

मस्त आई, बाबा आणि आज्जी बरोबर रहा. मज्जा कर. सगळे एकमेकांबरोबर रहाल त्यामुळे एकमेकांना समजूनपण घ्याल. सगळ्या पद्धती, रीतिरिवाजपण माहित होतील. तेपण सुनेबरोबर थोड्यादिवस का होईना अजून वेळ घालवता येईल म्हणून खुश आहेत. तुलापण छान वाटेल बघ". असे म्हणून समजूत काढत होता. मीमात्र त्यातले काहीही ऐकले नव्हते. ५ मिनिट तसेच मिठीत घेऊन नंतर त्याने मला आरश्यासमोर नेले आणि आरशाला म्हणाला,"बघ हं जवळपास तीन महिने माझ्या सुंदर, सालस बायकोला तुझ्यावर सोपवून जात आहे. मी जेव्हा तीन महिन्यांनी हिला बघेन तेव्हा मला ही अशीच सुंदर आणि फ्रेश दिसायला हवी आहे", असे म्हणून मला हसवण्याचा प्रयत्न करत होता. माझ्या हातावरून त्याचा हात हळुवारपणे फिरायला सुरुवात केल्यावर मात्र माझ्या चेहऱ्यावरचे भाव बदलले तेव्हा लगेच," बघा आरसेराव! मला माझी मानसी अशीच दिसायला हवी आहे". असे म्हणून मला दोन हातात हळुवारपणे उचलून घेतले!

१० वाजले तसे काकूंनी दार वाजवून ’’एकच तास राहिला आहे निघायला तेव्हा आवरून घ्या’’, म्हणून सांगितले. आम्ही आवरून लगेच बाहेर आलो तर सगळे आवरून बसले होते, अगदी आज्जीसुद्धा आवरून बसल्या होत्या. मला खूप आश्चर्य वाटले. त्यापण हेमंतला सोडायला येणार होत्या! हेमंतने त्यांना आवरलेले बघून,"अग आज्जी तू कशाला सोडायला

येतेस? इथूनच सीऑफ कर ना!" त्यावर काकू,"अरे मीपण सांगितले पण त्यांना यायचेच आहे" त्यावर आज्जी म्हणाल्या,"अरे तू एकतर जवळपास दोन-अडीच वर्षांनी आला आहेस. परत कधी येणे होईल माहित नाही. कधी भेट होईल की...... तेव्हा मला तुला एअरपोर्टवर सोडायला येऊ दे". आज्जींचा कंठ दाटून आला होता, प्रत्येकजणच भावुक झाला होता, कोणी काहीच बोलले नाही.

आईने सगळ्यांसाठी केलेला चहा पिऊन आम्ही सगळे निघालो. काकू खूप रडत होत्या. ‘लवकर परत ये’ असे सारखे म्हणत होत्या. त्यांचे रडणे आणि हेमंतवरील प्रेम बघून मला वाटणारे दुःख ह्यांच्यापुढे खूप कमी आहे असे वाटले. एवढे आपले सगळे आयुष्य मुलांसाठी द्यायचे, लहानपणी चिऊकाऊच्या गोष्टी सांगून एकेक घास भरवण्यापासून ते अगदी शाळा संपेपर्यंत त्यांना शिस्त लावणे, आवडणारे पदार्थ करून खाऊ घालणे, कपडे, कपाटं आवरणे, अभ्यास घेणे, नंतर अभ्यास नीट करतो की नाही हे बघणे, प्रत्येक गोष्टीत त्यांना मदत करणे, अगदी त्यांचे आयुष्य म्हणजे आपले आयुष्य असे होऊन आई जगत असते पण मुलं जसजशी मोठी होऊ लागतात तसतसे आईची मदत घेणे हळूहळू कमी होत जाते आणि ते स्वतंत्र आयुष्य जगू लागतात. त्या मातेलामात्र ज्या मुलांचे आयुष्य ती स्वतः जगत असते ती त्यांच्याही नकळत एकदम स्वतःच्या आयुष्यात रममाण होतात तेव्हा तिला किती एकाकी वाटत असेल ना! आपल्या

आईलापण असेच झाले असेल असे एकदम वाटून मी आईला घट्ट मिठी मारली. हेमंत चाललाय म्हणून वाईट वाटून मी आईला मिठी मारली असे वाटून आईने एकदम प्रेमाने जवळ घेतले. पण त्यावेळेस हाच विचार केला की आपण इथे आहे तोपर्यंत आई, काकू व आज्जींना भरपूर सुख द्यायचे.

गाडीत बसल्यावर वातावरण हलके करण्यासाठी बाबांनी सगळ्यांची मस्करी करायला सुरुवात केली. नंतरमात्र आम्ही सगळ्यांनी खूप साऱ्या हलक्याफुलक्या गप्पा मारून खूप मज्जा केली आणि ३ तास कसे गेले कळलेच नाही. एअरपोर्टवर पोहचल्यावर सगळ्या बॅग्ज ट्रॉलीत ठेवून हेमंत आत जायला निघाला तेव्हा सगळ्यांनाच रडू आवरत नव्हते. अगदी काकापण रडत होते, बाबांच्यापण डोळ्यातले पाणी थांबत नव्हते. काकू आणि आज्जीतर खूप म्हणजे खूपच रडत होत्या. सगळ्यांना असे बघून हेमंतला काय करावे कळतच नव्हते- कोणाला जवळ घेऊ, कोणाला शांत करू आणि त्यात त्यालापण सगळ्यांना सोडून जायला नको वाटत होते.शेवटी असह्य होऊन,"तुम्हाला सगळ्यांना असे वाटत आहे का की जेव्हापण माझ्या मनात तुमचे विचार येतील तेव्हा माझ्या डोळ्यासमोर तुमचे असे रडवेले चेहरे समोर यावेत". हे ऐकून प्रत्येकाने रडू दाबायचा निष्फळ प्रयत्न केला. मी आपली सगळ्यांच्या मागे उभी राहिले होते. उशीर होतो म्हणून त्याने प्रत्येकाला नमस्कार करून जवळ घेतले. शेवटी माझ्याकडे आला आणि इतकावेळ दाबून ठेवलेले अश्रू नकळत डोळ्यांतून

ओघळायला लागले. सासूबाईंनी एकदम आश्चर्याने बघितले. लगेच तो तिथून निघून गेला. आत गेल्यानंतर सगळ्यांना काचेतून हात हलवून ‘बाय’ केले. आम्ही त्याचे चेकइन होईपर्यंत तिथेच थांबलो होतो. चेकइन करून तो परत आम्ही उभे होतो तिथे येऊन आतूनच सगळ्यांना बाय केले आणि आता घरी जावा असे सांगितले. जड अंतःकरणाने आम्ही सगळेजण परत यायला निघालो. गाडीत बसल्यावर एकदम रिकामे वाटू लागले. सगळ्यांनी काहीही न बोलता शांत बसून प्रवास केला. आईबाबांचे घर जवळ आल्यावर त्यांनी त्यांना तिकडेच सोडायला सांगितले आणि हळूच,"मानसीला येऊ दे का एका दिवसासाठी. उद्या सकाळी हे येतील सोडायला," म्हणून आईने विचारले. काकूंना बहुतेक कसलातरी राग आला होता वाटते, त्यांनी लगेच,"हेमंत जाऊन ३ तास नाही झाले तर लगेच माहेरी जायचे आहे का हिला? असे विचारले. आज्जींनी लगेच,"हेमंत आत्ताच गेलाय ना मानसीपण नसेलतर आम्हाला घर खायला उठेल. थोड्यादिवसांनी येईल ती. हो ना मानसी", असे म्हणून वातावरणात आलेला ताण निवळायचा प्रयत्न केला. आईबाबा काहीही न बोलता गाडीतून उतरून निघून गेले. मला खूप राग आला होता पण आलेला आवंढा गिळून शांत बसले.

घरी गेल्यावर तडक खोलीत जाऊन दार बंद करून स्वतःला मोकळे केले. कितीही प्रयत्न केला तरीही झोप काही येत नव्हती, तशीच पडून होते.

काही वेळाने बाहेर हालचाल जाणवली पण मनातला राग काही केल्या शांत होत नव्हता त्यामुळे तशीच पडून राहिले होते. दुपारी १ वाजता आज्जींनी दार वाजवले,"मानसी जेवायला येतेस ना!' म्हणून विचारल्यावर मी,"तुम्ही जेवून घ्या, मला भूक नाहीये", म्हणून सांगितले. तर त्यांनी मला दार उघडायला सांगितले. मी नाइच्छेनेच दार उघडले. माझ्याजवळ बेडवर येऊन बसल्या, माझा हात हातात घेऊन,"नलिनीने तुझ्या आईबाबांना असे बोलायला नको होते. तिचे चुकलेच आहे. पण अग तिचा मुलगा तिला आत्ताच सोडून इतक्या दूर गेला आहे. त्याचे तिला अगोदरच वाईट वाटत आहे. त्यात त्यांनी असे विचारल्यावर तिने असे लगेच उत्तर दिले". मी एकदम आश्चर्याने त्यांच्याकडे बघितले पण त्या माझ्या हाताकडे बघत बोलत होत्या," मी म्हणतच नाहीये की तुझ्या आईबाबांचे काही चुकले आहे. जसे नलिनीला वाईट वाटत आहे तसे त्यांनापण वाटतच असेल ना! तुला राग आला आहे मान्य आहे मला. पण मलातरी असे वाटत आहे की तू हे सगळे सोडून द्यावेस. थोडे दिवसच इथे आमच्याबरोबर राहणार आहेस तेव्हा दुर्लक्ष करून छान दिवस घालवं", असे म्हणून त्यांनी प्रेमाने मला जवळ घेतले. त्यांच्या कुशीत शिरून मला खूप छान आणि हलके वाटले. मी फ्रेश होऊन येते जेवायला", असे सांगितल्यावर,"ये लवकर! आम्ही थांबलो आहोत", असे सांगून त्या गेल्या. मीपण १० मिनिटात फ्रेश होऊन लगेच गेले. सगळे माझी वाटच बघत होते. मी आल्यावर काकूंनी गरम गरम भाकऱ्या थापायला घेतल्या. मग मी लगेच जाऊन त्या भाजायला घेतल्या.

आज्जी व काकांच्या भाकऱ्या झाल्यावर गरम झालेली भाकरी घेऊन काकूंनी मला जेवायला बसायला सांगितले तर सगळया करून दोघी बसू म्हंटल्यावर हं म्हणून आम्ही उरलेल्या भाकऱ्या करून जेवायला बसलो. थोड्याफार गप्पा मारून सगळे जेवण करून परत आपापल्या रूममध्ये गेलो. ह्यावेळेस मात्र मी दार लॉक नाही केले. ४ वाजता बाहेर आवाज झाल्यावर उठून सगळयांसाठी चहा केला आणि हॉलमध्ये सगळे शांतपणे चहा प्यायलो. सगळयांनाच घर खायला उठत होते. चहा झाल्यावर काकांनी सगळयांना आवरायला सांगितले पण कुठे जायचे ते सांगितले नाही. तयार होऊन आम्ही सगळे गाडीत बसलो काकांनी गाडी सारसबागेत आणून थांबवली. आत जाऊन गणपतीचे दर्शन घेऊन तिथेच खुपवेळ बसलो. मरगळ जाऊन थोडे ताजेतवाने झालो होतो. बाहेर येऊन सगळयांनी भेळ खाऊनच घरी आलो. काहीकेल्या झोपच येत नव्हती. नुसती तळमळतच पडले होते. रात्री खूप उशिरा झोप लागली. त्यामुळे सकाळी ७ वाजताच जाग आली.

बाहेर आले तर सगळेजण तिथेच बसले होते. काकूंनी लगेच टोमणा मारला,"इतकी वर्षे सकाळी उठले की मलाच चहा करावा लागत होता. असे वाटत होते की चला थोडेदिवस तरी आता सकाळी उठून हातात चहा मिळेल पण आमचे नशीब इतके थोर नाही". मी काहीच न बोलता फ्रेश होऊन कोणी चहा पिणार का विचारल्यावर,"अगोदर नाश्ता कर मग एकत्रच

सगळ्यांना चहा कर" म्हणून सासर्यांनी सांगितले. आता मला उठल्या उठल्या चहा लागतो पण काय बोलणार म्हणून मी पटकन कांदे, बटाटे घालून मस्त खमंग फोडणीचे पोहे केले व एकीकडे चहा ठेवून सगळ्यांना डिश देऊन मी अगोदर चहा घेतला. चहा पिऊन सासरे लगेच ऑफिसला निघून गेले. आमचा खऱ्या अर्थाने सासरी दिवस सुरु झाला!

लग्न झाल्यावर थोडी खाष्ट वाटणारी सासू जास्तच खाष्ट आहे हे जाणवले आणि साधेसरळ असणारे सासरे तसे शांत आहेत पण त्यांच्या मनाविरुद्ध काही झाले तर भयंकर चिडतात पण एकदम बोलून न दाखवता एकदमच शांत बसतात. हेमंत बरोबर होता तेव्हा इतके जाणवले नाही पण तो गेल्यानंतर मात्र तडका जाणवायला लागला. थोडेच दिवस आमच्याबरोबर आहेस तर हेमंतला काय आवडते, काय नाही हे सगळे जाणवून घेण्यासाठी आणि शिकण्यासाठी म्हणून माहेरीपण एका आठवड्यानंतर एकाच दिवसासाठी पाठवले.

सासूसासऱ्यांबरोबर नवरा नसताना राहणे खूप अवघड जात होते पण काहीच इलाज नसल्याने कधी एकदा व्हिसा येतोय ह्याची वाट बघत हेमंतला आवडणाऱ्या रेसिपी सासूकडून शिकत तिकडे कामाला बाई नसते मग कामाची सवय हवी म्हणून इथे फक्त केरफरशी आणि भांड्याला बाई ठेवून बाकीची कामे घरी करून त्याचीपण सवय करून घेत होते. व्हिसा

यायला ३ महिने लागले पण ते ३ महिने मात्र ३० वर्षांसारखे वाटत होते. काकांनी काकूंना विचारून १५ दिवसानंतरचे तिकीट काढले. सगळी खरेदी अगोदरच करून ठेवल्यामुळे फार काही तयारी करावी लागली नाही. व्हिसा आलेल्या दिवशीच संध्याकाळी आईबाबा घरी आले. सगळ्यांना मानसीला भेटायचे आहे व घरी बोलवायचे आहे म्हणून जायच्या अगोदर एक आठवडातरी घरी राहायला पाठवा म्हणून विनंती केली. त्यावेळी काकूंनी आईला,"फक्त मानसीलाच सगळे भेटायला आणि जेवायला बोलावणार का?" असे विचारले. "नाही हो, सगळे मिळून मानसीला पार्टी देणार आहेत, तेव्हा तुम्हालापण बोलावणार आहेत" आईने हे सांगितल्यावर खुश झाल्या आणि त्यादिवशीच मला आईबाबांबरोबर पाठवले. आम्ही तिघेही खूप आनंदीत झालो. मी लगेच त्यांच्याबरोबर निघाले तर."अग काही कपडेतरी घेशील की नाही" म्हणून विचारल्यावर,"माझे काही कपडे आहेत तिकडे" असे म्हणून आम्ही लगेच तिथून निघालो. आता निदान एक आठवडातरी आराम मिळेल ह्या कल्पनेने तर आईबाबा आता लेकीबरोबर एक आठवडा छान घालवायला मिळेल ह्या कल्पनेने एकदम आनंदी झाले.

घरी आल्यावर मी लगेच खोलीत जाऊन भरपूर लोळले आणि मस्त ताणून दिली. आईबाबांनीपण अजिबात उठवले नाही. फोनमुळे वाजल्यामुळे जाग आली. फोनवर हेमंतचे नाव बघून एकदम छान वाटले.

मी इथे आल्यापासून कशी झोपून आहे, एकदम भारी वाटत आहे, असे मी त्याला कॉल उचलल्याबरोबर लगेच सांगितले. मला वाटले खूप काहीतरी छान बोलेल पण उलटेच झाले. म्हणाला,"तुझे आईबाबा आले होते म्हणून आईने तुला माहेरी जायला लगेच समंती दिली पण तू येण्याआधी एकदातरी विचार करायचास ना! आईबाबा गेले कित्येक वर्ष माझ्याशिवाय एकटेच राहत आहेत. तू थोडे दिवसतरी त्यांच्याबरोबर राहशील म्हणून किती खुश होते ते. पण तू त्यांचा विचार केल्याशिवाय लगेच तुझ्या आईवडिलांकडे राहायला आलीस". जाम सटकली माझी.

लग्न झाल्यापासून हेमंतशी माझे खूप कमी बोलणे होत होते. दरवेळी तो काकांच्या मोबाईलवर फोन करत असे आणि बोलताना काकाकाकू समोरच बसलेले असल्याने त्याच्याशी मनमोकळेपणे बोलताच येत नव्हते. लग्नाअगोदर चॅटिंग करताना तासनतास बोलणारे आम्ही अगदी १०-१५ मिनिटेच बोलत असू. त्याचा फोन आला की मी इतकी दमलेली असायचे की बोलायचे पण त्राण नसायचे. आज एकदम खुशीत येऊन त्याच्याशी बोलायचे ठरवले आणि ...............

इतक्या दिवस आतली घुसमट एकदमच बाहेर आली. जाम चिडले मी त्याच्यावर. "माझ्याशी लग्न केले आहेस ना हेमंत तू. मग माझी काळजी नाहीये का तुला? माझ्याबद्दल काहीच वाटत नाही का? काकाकाकूंची काळजी केलीच पाहिजे. पण माझे काय? माझेपण आत्ताच लग्न झाले आहे, मी इतके दिवस माझ्या आईबाबांबरोबर राहत होते. लग्न झाल्यावर हे घर सोडून तुझ्या घरी राहायला आले. मान्य आहे ही रीतच आहे. पण मला वाटत नसेल का आईबाबांबरोबर थोडे क्षण घालवावे. एकदा मी तिकडे राहायला आल्यावर मलापण माझ्या आईबाबांना भेटता येणार नाही. त्यांना नसेल का वाटत आपल्या मुलीचे लाड करावेत, परत निदान वर्षभर तरी भेटता येणार नाही त्यामुळे थोडे क्षण त्यांच्याबरोबर आनंदाने घालवावेत. लग्न झाल्याझाल्यासुद्धा सगळयाजणी माहेरी कमीतकमी ५ दिवस राहतात पण तू होतास तोपर्यंत माहेरी यायचा विचार सुद्धा मनात आला नाही. तू तिकडे गेल्यावर मी फक्त १ दिवस इकडे राहायला आले. मला तुझे घर नवीन होते. काकाकाकूंना लग्नाअगोदर खूपदा भेटले, घरी गेले पण मलापण अचानक त्यांच्याबरोबर तू नसताना राहायला संकोच वाटत होता पण काहीच न बोलता हळूहळू सवय होईल म्हणून हसतखेळत ते जे सांगतील ते मुकाट्याने मान्य करून तसे वागत होते, घर प्रसन्न ठेवायचा प्रयत्न करत होते. आज्जी होत्या तोपर्यंत त्यातरी समजून घेत होत्या पण त्या गेल्यावर

तर मी एकटीच पडले होते तरीही तुझ्याकडे एका शब्दाने तक्रार केली नाही. तुला तुझ्या आईचा स्वभाव माहित असणारच ना! तू एकदातरी विचारलेस का की मनु तुला माझ्याशिवाय करमत आहे का तिकडे? काम करून दमतीयेस का? हे सगळे जाऊ दे, तू एकदाजरी म्हणाला असतास ना की मी तुला मिस करतो, तुझी आठवण येते तरी मला बरे वाटले असते. तुझ्या नुसत्या माझ्याकडून अपेक्षा! माझ्या तुझ्याकडून काहीच अपेक्षा नसाव्यात का? तिकडे गेल्यापासून तू आईबाबांना फक्त एकदाच फोन केलास. त्यानंतर काय हरकत होती रे अधूनमधून फोन करायला. तुझ्या आईवडिलांशी रोज बोलतोस ना मग माझ्या आईवडिलांशी आठवड्यातून एकदातरी बोलायला हवे होते ना......... जवळपास १० मिनिटं मी मनामध्ये साठलेली सगळी गरळ त्याच्याशी बोलून ओकून टाकली होती.

त्यानंतर हेमंतने एकदाही फोन केला नाही की मेसेज केला नाही. मला खूप अस्वस्थ होत होते, काय करावे, कोणापुढे मन मोकळे करावे काहीच कळत नव्हते. आतल्या आत खूप घुसमट होत होती. पण काकाकाकू, आज्जीआजोबा, तीन चुलतभाऊ व त्यांचे कुटुंब तिथेच असल्याने शिवाय आता मी लवकर कोणाला भेटणार नसल्याने सगळेजण दिवसभर एकत्रच असायचो. रोज कोणीनाकोणी भेटायला येत होते शिवाय रोज बाहेर जेवणंपण होत होती. त्यामुळे रोज काकाकाकुंशी भेट होत होती. ते दोघेही एकदम छान, नॉर्मल वागत, बोलत होते. त्यांना बघून असे

वाटतपण नव्हते की हेमंत माझ्याशी बोलत नाहीये हे त्यांना माहित आहे. त्यांनी अजिबातच त्याच्याबद्दल काहीच विचारले नाही किंवा सांगितलेपण नाही त्यावेळीच त्या दोघांनाही हेमंत माझ्याशी बोलत नाहीये हे माहित आहे हे कळाले पण मीपण त्यांना हे अजिबात कळू दिले नाही. रोज सगळ्यांना भेटणे, जेवायला जाणे, घरी आईबाबांबरोबर खूप साऱ्या जुन्या आठवणी काढून गप्पा मारणे हे चालू होते त्यामुळे तसा कमी त्रास होत होता. खूपदा मनात यायचे की हेमंतला स्वतःहून फोन करावा किंवा मेसेज करावा पण माझे काही चुकलेच नव्हते त्यामुळे माघार घ्यायचा काही प्रश्नच नव्हता. खूपदा टाईप केलेला मेसेज परत डिलीट केला, फोन लावलेला कट केला. खूप घालमेल होत होती पण प्रत्येकवेळी अजून ठाम झाले.

८ दिवस कसे गेले कळलेच नाही. परत सासरी जायचा दिवस उजाडला पण माझी तिकडे जायची इच्छाच नव्हती. सकाळी नाश्ता करून निघायचे असे ठरले. नाश्ता करून उठायला गेले आणि तिथेच परत खुर्चीवर बसले. अंगातले त्राणच निघून गेले. बाबांनी मला आधार द्यायला म्हणून हात धरला तर त्यांना एकदम हाताला चटका बसल्याने हात मागे घेतला. आईने बघितले तर मी तापाने फणफणले होते. दोघांनी मला हाताला धरून आत झोपवले, १०४ ताप होता अंगात. काल रात्रीपर्यंत एकदम ठणठणीत असलेली मी एकदम तापाने फणफणले होते. आईने पटकन बर्फाच्या पाण्याने माझे अंग पुसून कपाळावर पट्ट्या ठेवल्या. आईने काकूंना फोन

करून मला ताप आला आहे म्हणून सांगितले तर त्यांनी,"लग्न होऊन आता सासरी राहायचे आहे हे मानसीला पटत नसणार त्यामुळे आज इकडे यायचे म्हणजे हिला सणकून ताप आला". हे ऐकून बाबांना खूप राग आला, त्यांनी आईकडून फोन घेतला व बोलायला सुरुवात केली तोपर्यंत आईने परत फोन घेऊन त्यांना,"मला वाटत आहे की मानसीला ४ दिवसात ड्रिमलँडला जायचे आहे तर आपण आता तिचा ताप कसा कमी होईल हे बघायला हवे. ताप कमी व्हायची दुपारपर्यंत वाट बघुयात/ नाही झाले तर मात्र आम्ही तिला डॉक्टरांकडे घेऊन जाऊ. काय, कसे होते ते मी कळवते तुम्हाला", असे सांगून आईने फोन ठेवला. माझ्या डोळ्यातले पाणी बघून ते दोघेही खूप भावुक झाले. "थोड्या दिवसांचाच प्रश्न आहे, तिकडे तुम्ही दोघेच असाल तेव्हा काळजी करू नकोस", असे बाबांनी सांगितल्यावर तर मला आणखीनच रडू फुटले. तिघांनीही मनसोक्त रडून घेतले. रडून झाल्यावर मात्र मनावरचा बराचसा भार उतरल्यासारखे वाटले.

"मी आता ड्रिमलँडला जायच्या आदल्यादिवशीच तिकडे जाईन, तुम्ही दोघेपण माझ्याबरोबर या", असे सांगितल्यावर दोघांनीही होकार भरला. दुपारपर्यंत ताप उतरला होता पण खूप अशक्तपणा आल्यामुळे आम्ही सगळे ४ दिवसांनीच येऊ म्हणून आईने काकूंना फोन करून कळवले.

एवढी आजारी आहे हे कळूनही हेमंतचा फोन न आल्याने आपला निर्णय चुकला तर नाही ना असे वाटून गेले पण लगेच ह्या विचाराला झटकून

टाकून दिले. मी आजारी आहे हे कळल्यावर तर सगळयांनी माझी खूपच सेवा केली. तन्मय, मधुरा पण दुसऱ्यादिवशी मुंबईहून सुट्टी काढून पुण्याला आले. तीन दिवस कसे गेले कळलेच नाही.

मी जायच्या आदल्यादिवशी मात्र सगळेजण आल्यामुळे घर पूर्ण भरले. रात्रभर सगळे जागे होतो खूप धमाल केली. दुसऱ्या दिवशी दुपारी आईबाबा, तन्मय, मधुरा व मी माझ्या सासरी जायला निघालो तेव्हा लग्न होऊन पहिल्यांदाच सासरी जाताना होणारी घालमेल झाली होती. सगळेजण खूप रडले. पायच निघवत नव्हता. सगळेजण गाडीपर्यंत सोडायला आले. उद्या रात्री सगळेचजण मला टाटा करायला येणार असे ठरले.

सासरी आल्यावर मात्र काहीच झाले नाही असे दाखवून काकाकाकू एकदम छान वागल्यामुळे आलेला सगळा ताण निघून गेला. वातावरण एकदम हलकेफुलके झाले. आज्जींना बघुनतर मी एकदमच खुश झाले. रात्री डबा मागवल्याने स्वयंपाकाला सुट्टी मिळाल्याने सगळेजण निवांत होतो. बॅग नीट भरली आहे का? काही घ्यायचे तर राहिले नाही ना? हेच बघत होतो. काकूंना तुम्हाला काही सामान द्यायचे आहे का विचारल्यावर काहीच नाही ग! म्हणून सांगितल्यावर खूप आश्चर्य वाटले. हेमंतसाठीपण काही खायचे करून कसे देत नाहीयेत हेच कळत नव्हते पण कोण काय बोलणार! त्या काहीच देणार नसल्याने अजून काही किलो सामान नेता

येणार होते. आईने तन्मयला रात्री घरी पाठवून मेतकूट, लाहीपीठ, बेसनलाडू मागवून घेतले. एरवी छोट्याछोट्या गोष्टीत लक्ष घालणाऱ्या काकू मी बॅगेत काय भरत आहे, सामान काय, कसे नेले पाहिजे, कसे केले पाहिजे काहीच न सांगता त्यांच्या खोलीत बसून होत्या ह्याचे तर राहून राहून आश्चर्य वाटून चिडल्यात की काय असे वाटत होते पण त्या एकदम चांगल्या वागत होत्या त्यामुळेतर काही कळतच नव्हते. आता मी परत लवकर भेटणार नसल्याने चांगल्या वागत असतील असा विचार करून मनात सारखा येणारा विचार दाबून टाकला.

दुसऱ्यादिवशी सकाळी परत एकदा बॅग्ज तपासून बघणे, घरी काही सामान राहिले का ते बघणे, शिवाय माझे जे काही सामान होते तेसगळे नीट आवरून एकाच कप्प्यात ठेवणे असे सगळे करण्यात दिवस कसा गेला तेच कळले नाही. काकू त्यांच्या खोलीतच जास्त असल्याने व आई मला मदत करत असल्याने आज्जी व मधुराने स्वयंपाकघराचा पूर्ण ताबा घेतला होता. वेळोवेळी नाश्ता, सरबत, चहा, दुपारचा शिवाय रात्रीचापण स्वयंपाक तिने करून ठेवला होता. मधुरा सुगरण असल्यामुळे तिची खूप सारी प्रशंसा करत जेवणं झाली. शांत, छान वागत असलेल्या काकूंनामात्र इतका वेळ छान वागणे पचले नसल्याने,"मानसीच्या आई खूप नशीबवान आहात हो तुम्ही. मधुरासारखी इतकी छान सून मिळाली आहे तुम्हाला. सगळ्यांचे नशीब इतके चांगले नसते", म्हणून टोमणा मारलाच. आईने त्यांचा टोमणा

चांगल्या अर्थाने घेऊन मधुराचे खूप कौतुक केले त्यावेळी मधुराने,"आमचे लग्न ठरल्यापासून आईबाबांनी मला लगेच आपली मानून घरी मानाचे स्थान दिले आहे. माझ्या आईबरोबरच त्यांच्याकडून पण बऱ्याच गोष्टी शिकले आहे", असे म्हणून काकूंचे तोंड बंद केले पण आईला हे अजिबात आवडलेले नसल्याने ती काहीही न बोलता शांत बसली.

जेवणं होऊन सगळे बसलोच तोपर्यंत सगळेजण आले! घर एकदम भरून गेले. चहापाणी होईपर्यंत निघायची वेळ आली. तन्मयने माझ्या बॅग्ज बाहेर आणून ठेवल्या आणि इकडून काकांनीपण त्यांच्या खोलीतून बॅग्ज आणल्या तेव्हा काय चालले आहे हे कोणालाच काहीही न कळल्याने भरलेल्या घरात एकदम शांतता पसरली. त्यावेळी काकूंनी बाहेर येऊन गौप्यस्फोट केला,"मानसी पहिल्यांदाच विमानप्रवास करणार शिवाय परदेशातपण कोणीच नातेवाईक नसल्याने तिला एकटीला त्रास होऊ नये म्हणून मी तिला मदत करायला म्हणून तिच्याबरोबर जात आहे. तुम्हाला हे ऐकून होणारा आनंद मला बघायचा होता म्हणून तुम्हाला अगोदर सांगितले नाही". पण आम्हा सगळ्यांना आनंद होण्याऐवजी खूप मोठा धक्का बसला होता. कोणी काहीच न बोलता सगळ्यांनी किती छान म्हणून जोरदार टाळ्या वाजवल्या. नमस्कार करून आम्ही सगळेजण मुंबईला जायला म्हणून गाडीत बसलो. त्यावेळी आता खऱ्या वैवाहिक जीवनाला माझी सुरुवात होणार आहे हा विचार मनात आला.

फ्लाईटमध्ये बसल्यावर आता पुढे काय हा विचार मनातून काही केल्या निघत नव्हता. हेमंतचा काकांना फोन आला होता, सगळे व्यवस्थित घेतले का, कागदपत्र परत एकदा बघितली का वगैरे वगैरे बरेच काही विचारत होता. मी सोडून प्रत्येकाशी बोलला. खुपजण असल्यामुळे हेमंत माझ्याशी बोलला नाही हे कोणाच्याच लक्षात आले नाही. बाबांनीमात्र मला आत येऊन हेमंतशी बोलणे झाले का विचारले. अर्थात मी त्यांना हो म्हणूनच सांगितले. काकू असताना दोघांनाही पुढाकार घेऊन स्वतःहून बोलायला अवघड जाणार होते त्यातून कसा मार्ग काढायचा हेच कळत नव्हते. काकुमात्र एकदम खुश दिसत होत्या. आम्ही दोघी मिळून एकच चित्रपट बघत होतो. चित्रपट बघताना त्या अधेमधे त्याबद्दल माझ्याशी बोलत होत्या. मीपण त्यांना जेवढ्यास तेवढेच उत्तर देत होते. ड्रिमलँडला जायला डायरेक्ट फ्लाईट नव्हती त्यामुळे ३ फ्लाईट बदलून जायला लागणार होते. अगोदरच २४ तासाचा लांबचा प्रवास आणखीनच लांब वाटत होता. इथे आता सगळे आपल्यालाच बघायला लागणार, आईबाबा, काकाकाकू, तन्मयमधुरा कोणीच नसणार ह्याचा विचार करून तर अजूनच डोळ्यात पाणी येत होते. तीन फ्लाईट बदलून एकदाचे एअरपोर्टवर पोहचलो. चेकआऊट करून सगळ्या बॅग्ज दोन ट्रॉलीवर ठेवून बाहेर आलो तर हेमंत आमची वाटच बघत होता. आम्हाला बघून तो एकदम खुश झाला. जवळ येऊन त्याने अगोदर काकूंना नमस्कार करून माझ्याकडे

आला, प्रसन्न हसून हात हातात घेतला. माझ्या डोक्यावरचे मोठे टेन्शन उतरले त्यामुळे एकदम 'हुश्श' असे बाहेर आले. मीपण एकदम छान हसून त्याला प्रतिसाद देऊन त्याचा हात दाबून मलापण खूप आनंद झाला आहे हे दर्शवले.

खूप टेन्शन असल्यामुळे माझे आजूबाजूला लक्षच नव्हते. आम्हाला तिथेच उभे करून हेमंत गाडी आणायला गेला. माझे मन आता प्रसन्न असल्यामुळे बाकीच्या ठिकाणी लक्ष गेले. एअरपोर्ट तसे छोटे पण खूप छान होते. अर्थात मी हे एअरपोर्ट आत्ता बाहेरून बघायला सुरुवात केली. अगदी स्वप्नात असल्यासारखे वाटत होते. बाहेरच्या बाजूने सगळीकडे सुंदर हिरवळ होती. एकदम छान रस्ता होता. समोरच एक छोटीसी बाग होती, तिथे एक सुंदर कारंजे होते, तिथे ३-४ मुलं खेळत होती, काही आज्जीआजोबा तिथेच असलेल्या बेंचवर बसले होते. खूप छान वाटत होते सगळे बघताना! हेमंत गाडी घेऊन आला आणि आम्ही दोघी गाडीत बसायला गेलो. मी आणि काकू दोघीही पुढच्या सीटवर बसण्यासाठी गेलो. एकदम काय करावे दोघीनांही कळाले नाही. मी पटकन मागे होऊन मागचा दरवाजा उघडायला गेले तर काकूंनी दार धरून मला पुढे बसायला सांगून मागे बसल्या. परत पुढे जाऊन हेमंत शेजारी बसले, त्याच्याकडे बघितले तर तो आमचे काय चालले आहे हे माहितीच नसल्यासारखे खाली वाकून काहीतरी करत होता. बहुतेक त्यालापण

एकदम काय करावे ते सुचत नव्हते. गाडी सुरु केल्यावर त्याने काहीच झाले नसल्यासारखे एकदम सहज बोलायला सुरुवात केली त्यामुळे परिस्थिती लगेच आटोक्यात आली. आम्हा तिघांचा हा अर्ध्या तासाचा प्रवास खूप लवकर हसतखेळत संपला.

अर्ध्या तासाने आम्ही एका छोटेसे कंपाऊंड असलेल्या गेटमधून आत प्रवेश केला. आतमधले आवार खूप छोटे पण सुंदर होते. तिथे पार्किंगसाठी असलेल्या जागी गाडी पार्क करून बॅग्ज काढून आम्ही घराकडे निघालो. २ मजली असलेल्या ६ इमारती होत्या. प्रत्येक मजल्यावर ४ घरे होती. आमचे घर दुसऱ्या मजल्यावर होते. एक मजला एवढ्या मोठ्या बॅग्ज घेऊन जायचे खूप अवघड वाटत होते. पण हेमंतने एक बॅग हातात घेऊन पुढे जायला लागला. त्याचे बघून मी एक बॅग घेऊन वर चढायला सुरुवात केली पण मला खूप अवघड जात होते. काकू छोटी बॅग घेऊन चढत होत्या. मी ४-५ जिनेसुद्धा चढून गेले नाहीतर हेमंत बॅग ठेवूनपण आला. माझी बॅग घेऊन तो वर गेला. मी परत खाली अजून एक बॅग घ्यायला गेले पण ४ बॅग्ज जवळपास चौथ्या पायरीनंतर त्यानेच घेतल्या. काकू छोटी बॅग घेऊन अगोदरच पोहचल्या होत्या. आम्ही दोघे वर गेलो तर त्यांनी आम्हा दोघांना ओवाळून खोबऱ्याचा तुकडा ओवाळून उजवा पाय आत टाकून प्रवेश करायला सांगितले. पूर्ण घर फुलांनी सजवले होते.. माझे स्वागत कसे होईल

ह्या भीतीने मी विमानात बसले होते पण इथे मात्र सुखद धक्का बसला. खूप भारावून गेले मी!

आम्ही सोफ्यावर बसलो तर तिथे टेबलवर पाण्याचा जार व ग्लास ठेवले होते. पाणी पिऊन फ्रेश होऊन बाहेर आले तर मस्त गरमागरम आले घालून वाफाळलेला चहा हातात मिळाला. पहिला घोट घेतला आणि आहा! "स्वर्गात जे अमृत मिळत असेल ते अश्याच चवीचे असणार" असे हेमंतला म्हंटल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचे समाधानाचे हसू बघून खूप छान वाटले. त्यानेच वरणभाताचा कुकर लावला. २४ तास बेचव खाल्ल्यानंतर वरणभात खाऊन तृप्ततेचा ढेकर देऊन खूप दमलो असल्याने आम्ही लगेच झोपायला गेलो. बेडरूमपण खूप छान ठेवली होती. तिथे बेडवर एक बुके आणि ग्रीटिंग ठेवले होते. माझे स्वागत करण्याचे ग्रीटिंग होते. वाचून डोळ्यानेच मी माझ्या भावना व्यक्त केल्या, त्याने त्या समजून घेऊन लगेच मान हलवून थोडावेळ आराम करायला सांगून दार लावून घेतले. आत गेल्यावर मी आईबाबांना फोन करून सुखरूप पोहोचल्याचे सांगितले पण बाबांना आमच्यात काहीतरी बिनसले आहे हे जाणवत असल्यामुळे त्यांनी लगेच "हेमंत कसा आहे? सगळे चांगले आहे ना!" असे विचारल्यावर हसून "हो बाबा, काही काळजी करू नका. सगळे चांगले चालले आहे" असे म्हणून विमानातून उतरल्यापासूनचा आत्तापर्यंतचा सगळा वृत्तांत सांगितल्यावर त्यांनी निःश्वास सोडला. खूप दमलेले असल्याने लगेच फोन

ठेवून पाठ टेकवली, लगेच गाढ झोप लागली. कितीवेळाने जागी झाले माहित नाही पण उठल्यावरसुद्धा डोळे उघडवत नव्हते. बाहेरून बोलायचा आवाज येत होता पण डोळे उघडवतच नसल्याने खूप वेळ तशीच पडून होते. हेमंत मी उठले का बघायला आला तेव्हा डोळे किणकीणे करून बघितले तर तो लगेच आत आला,"बाईसाहेब उठा! ८ तास झाले झोपून. चला तोंड धुवून घ्या, मस्त गरमगरम चहा करतो". असे म्हणून हात धरून उठून बसवून उभे करून चहा करायला निघून गेला. खोलीत वॉशरूम असेल असे समजून मी सगळीकडे बघितले तर आतमध्ये कुठे दार दिसलेच नाही मग बाहेर जाऊन मगाशी वापरलेल्या वॉशरूम मध्ये जाऊन मस्त गरमगरम पाण्याने अंघोळ केल्यावर एकदम ताजेतवाने वाटू लागले. आवरून बाहेर आले तर काकू फोनवर बोलत होत्या. हेमंतने हातात चहा दिल्यावर तो पीतपीत हेमंतशी गप्पा मारताना कळले की काकू फक्त १ तासच झोपल्या होत्या.

त्यादिवशी स्वयंपाकघरात पाऊल टाकले नाही. नुसताच आराम केला. परत रात्री जेवून झोपल्यावर एवढे झोपूनही लगेच झोप लागली. सकाळी मात्र लवकर जाग आली.

एकटीच उठले असल्याने सगळे घर फिरून आले. खूपच छोटे घर होते. बाहेरून आत आले की एक छोटासा पॅसेज, तिथून आत आले की

हॉल, तो म्हणजे आमच्याघरी पाहुण्यांच्या साठी असलेल्या खोलीएवढा होता. १ थ्री सीटर, १ टू सीटर एवढेच दोन सोफे होते आणि एक टेबलं. पुढच्या भिंतीवर अडकवलेला ४२" टीव्ही, त्याच्याबाजूला चार खुर्च्या असलेला डायनिंग टेबल, संपला हॉल. तिथून आत गेले की डावीकडे स्वयंपाकघर, ते म्हणजे कोपऱ्यात गॅसकूकर, त्याबाजूला छोटा ओटा-त्यावर मिक्सर, दुसऱ्या कोपऱ्यात सिंक. बाजूलाच एक फ्रिज. जेमतेम २ माणसे सरळ रांगेत उभी राहू शकतात एवढीच मोकळी जागा. त्याच्याबाजूलाच एक खोली होती पण काकू झोपल्या असल्याने ती काही उघडता आली नाही. त्यानंतर वेगवेगळे संडास व न्हाणीघर. समोर आमची खोली तीपण छोटी. म्हणजे आमचा डबलबेड त्याला लागून २ कपाटं नंतर एक छोटे ड्रेसिंगटेबल. बाजूने फक्त २ माणसे उभी राहतील एवढीच जागा. लग्नाअगोदर खूपदा हेमंतशी बोलणे व्हायचे पण बऱ्याचवेळेला तो ऑफिसमध्येच असायचा, घरी असला तरीही घर कधीही बघितले नाही. एकूणच घर, देश ह्याबद्दल खूप वेगळे चित्र मनात होते. त्यामुळे काडेपेटीएवढे घर बघून खूपच मोठा धक्का बसला.

एकदम स्तब्ध झाले होते. काय करावे काय बोलावे काहीच कळत नव्हते. आतून फोन घेऊन बाहेर येऊन बाबांना फोन लावला, तिकडे दुपार झाली होती. साधारण ५-६ रिंगनंतर बाबांनी फोन उचलून एकदम उत्साहाने,"काय चिमणाबाई कसे काय वाटत आहे तिकडे? नवऱ्याला भेटून

अगदी आनंद झाला असेल ना!" ह्या वाक्यानेच सुरुवात केली. त्यावर काय उत्तर द्यावे न सुचून फक्त हसले तर म्हणाले," हो हो माहित आहे मला. तुला माझ्याशी बोलायला कसेतरी होत असेल, हरकत नाही तू आनंदात आहेस ना, बास! आम्हाला आणखी काय हवे आहे." मीपण लगेच,"हो बाबा, एकदम छान आहे सगळे. काल हेमंतने आमचे खूप छान स्वागत केले. सगळीकडे फुले लावली होती. काकूंनी आत घेताना दोघांना ओवाळले. काल आल्यापासून मला सगळेकाही हातात मिळाले आहे. अगदी पाण्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत. काकूपण एकदम छान वागत आहेत. त्यांनीच रात्री ताटपाणी घेऊन उचलून लगेच घासून पण ठेवली. मीतर स्वयंपाकघरात पायपण ठेवला नव्हता. खूप कंटाळले होते. हेमंत आणि काकू अजून झोपल्या आहेत मग एकटीच उठून काय करावे न समजल्याने घर फिरून आले. छान आहे सगळे!" असे म्हंटल्यावर बाबांनी सुटकेचा श्वास घेतलेला आवाज कानी आला. "बाबा हेमंत उठला आहे, थोड्यावेळाने फोन करते" असे म्हणून मी फोन ठेवला. इतका वेळ दाबून ठेवलेले रडू एकदम बाहेर आले आणि एक जोरात हुंदका बाहेर आला. बाबांना माझ्या आवाजावरून मी कशी आहे, आजारी आहे की आनंदी आहे की उदास आहे हे लगेच कळायचे पण आज त्यांना कसे काय कळाले नसेल की कळून न कळल्यासारखे केले असेल काहीच समजत नव्हते. ५ मिनिटं मोकळेपणाने रडून घेतल्यावर आता पुढे काय करावे हेच सुचत नव्हते. तोपर्यंत आतून आवाज आला. हेमंत स्वयंपाकघरात गेला. मी

तशीच परत खोलीत येऊन अंग टाकून दिले. खूपवेळ तशीच पडून राहिले. ही आपली फसवणूक झाली आहे का? ह्या दोघांना जाब विचारावा का? का आहे ते स्वीकारून आता पुढे चालावे? काहीच कळत नव्हते. थोड्यावेळाने हेमंत सावकाशपणे आत आला. कपाट उघडून परत काहीही न बोलता बाहेर गेला. ज्याअर्थी तो इतक्या शांतपणे राहिला आहे, काहीच बोलत नाहीये त्याअर्थी त्याला ही कल्पना असणार मग त्याने असे खोटे का बोलायचे, कोणाला सांगू हे सगळे, पुढे काय करायचे कोणाला विचारू? डोके अगदी सुन्न झाले होते. तशीच झोपून राहिले. दुपारी पोटात खूपच कावळे ओरडायला लागले असल्याने उठून बाहेर आले. काकू सोफ्यावर पडून टीव्ही बघत होत्या. मी बाहेर आलेली बघितल्यावर त्या उठून स्वयंपाकघरात गेल्या. मला सगळे अन्न गरम करून ताट आणि पाण्याचा ग्लास हातात आणून दिले. तिथेच बाजूला बसून टीव्ही बघत बसल्या. प्रचंड भूख लागली असल्याने सगळे पटापट संपवले तर त्यांनी अजून पोळी हवी का म्हणून विचारले मी नको म्हणून मान हलवल्यावर आमटी भात आणून वाढला. तो खाल्ल्यावर मात्र पोट चांगलेच भरले आहे हे जाणवले. माझ्या हातातून ताट घेऊन ताक दिले, नको म्हणून मान हलवल्यावर "ताक पिऊन घे, बरे वाटेल" गुपचूप ताकाचा ग्लास हातात घेऊन ताक प्यायले तर खरेच जरा बरे वाटले. उठून परत आत जाऊ लागल्यावर "थोडावेळ बस इथे", असे म्हणून काकूंनी मला हाताला धरून खाली बसवले. मी काहीच न बोलता खाली बसले. "हे बघ मानसी, मला माहित आहे इतके छोटे घर

बघून तुला खूप कसेतरी होत आहे. हे घर तुझ्या अपेक्षेप्रमाणे नाहीये. तू वेगळीच स्वप्न बघितली असणार. पण हेमंत आत्ताच नोकरीला लागला आहे. इथे सगळ्या गोष्टी खूप महाग असतात ग! सगळे परवडायलापण पाहिजे ना. आम्ही दोघांनी हेमंतला मोठे घर घेण्यासाठी मदत करायची ठरवली होती पण त्याने त्यासाठी नकार दिल्यावर आम्ही काहीच बोललो नाही. थोडे दिवस दे त्याला. हळूहळू पगार वाढेल मग बघ ह्यापेक्षा मोठे घर घ्याल तुम्ही. मला खात्री आहे तुमचे सगळे चांगलेच होणार आहे. मला माहित आहे तुला इथून लगेच निघून जावेसे वाटत असेल. जर तुला जायचे असेल तर आम्ही कोणीच अडवणार नाही, तू जो काही निर्णय घेशील त्याचा आम्ही मान ठेवू पण कुठलाही निर्णय घ्यायच्या अगोदर पूर्ण विचार कर आणि मग ठरव."

मी उठून परत आत गेले. दुपारी काकूंनी चहा आणि लॅपटॉप आणून दिला. चहा पिऊन लॅपटॉप तिथे तसाच ठेवून परत नुसतीच पडून राहिले. संध्याकाळी हेमंतचा बोलण्याचा आवाज आला तेव्हा भिंतीकडे तोंड करून झोपले. थोड्यावेळाने तो आत आला. बराच वेळ कपाट उघडून काहीतरी करत होता. थोड्यावेळाने परत काहीही न बोलता बाहेर निघून गेला. मला आणखीनच राग आला. निदान मला समजावयाला, बोलायला तरी त्याने यायला पाहिजे होते. त्याची बाजू त्याने सांगायला हवी. पण एकही शब्द न बोलता निघून गेला. सकाळी मी चहापण नव्हता घेतला तरीही काहीही

बोलला नाही की चहा द्यायलापण आला नाही. एकतर त्याने मला अगोदर सगळी कल्पना द्यायला हवी होती. इतके महीने आम्ही दिवसरात्र बोलत होतो, एकदाही त्याच्या तोंडून कसे काहीच बाहेर पडले नाही. एकप्रकारे त्याने माझी फसवणूकच केली आहे. नुसते त्याने नाहीतर ह्या देशमुखांनीच मला फसवले आहे. इतके करूनही त्याला काहीच वाटत नाहीये तर मीच का पडती बाजू घेऊ, इतका विचार का करू. त्यापेक्षा जातेच ना निघून इथून. असे म्हणून आईला फोन केला. आईने फोन नाही उचलला तेव्हा लक्षात आले की अरे तिकडे तर मध्यरात्र झाली आहे....

नुसतेच बसून-झोपून कंटाळा आला होता. म्हणून मग तिथेच बाजूला असणाऱ्या छोट्या खिडकीच्या इथे उभी राहिले. संध्याकाळची वेळ होती, सूर्यास्त होत होता. खूप छान नजारा दिसत होता. आपल्याकडे जितका छान सूर्यास्त दिसतो तितका इथे छान नव्हता दिसत पण तरीही छान वाटत होते. काहीकाही लोक रस्त्यावरून जाताना दिसत होती. सगळीच गोरी लोकं होती आपले कोणीच दिसले नाही. इथे आपली लोकं राहत असतील ना! आपण हेमंतला विचारले होते तेव्हा तो थोडीफार आपली लोकं आहेत असे म्हणाला होता तेपण खोटे बोलला असेल का? पण तसे तो आपल्याशी खोटे नाही बोललेला. त्याने फक्त आपल्याला सांगितले नाही. आपणपण बाकीचे सगळे विचारले पण घर कसे आहे, दाखव वगैरे काहीच विचारले नाही. इतके लहान घर असेल असे स्वप्नातही वाटले

नव्हते ना! खिडकीतून बाहेर अंधार पडून सगळीकडे लाईट लागलेले दिसायला लागल्यावर परत बेडवर येऊन पडले.

सासूबाई जेवणाचे ताट घेऊन आत आल्या, लाईट चालू केला तेव्हा खूप अंधार पडला आहे हे जाणवले. ताट हातात देऊन "जेवून घे" सांगून निघून गेल्या. थोड्यावेळाने पाण्याची बाटली घेऊन आल्या तेव्हासुद्धा मी खिडकीतच उभी होते आणि ताट तसेच बेडवर होते. ते बघून त्या जवळ आल्या, मला हाताला धरून बेडवर बसवले, ताट हातात देत म्हणाल्या,"दोन घास जेवून घे, बरे वाटेल." मी जेवायला सुरुवात करणार तोपर्यंत त्यांनी माझ्या हातातून ताट हिसकावून घेतले आणि निघून गेल्या. मला एकदम काय झाले कळलेच नाही. अरे आत्ता जेव म्हणून हाताला धरून बसवले आणि जेवायला सुरुवात केल्यावर....

जोरजोरात हुंदके देऊन रडायलाच लागले मी. आता ह्यांनी बहुतेक छळायला सुरुवात केली हेच सारखेसारखे मनात येत होते. बाहेरून दार बंद नसेल केले ना! असा मनात विचार आला पण उठून बघायची हिम्मत पण नाही झाली. इतक्या जोरात रडू येत होते पण तरीही हेमंत आत आला नाही. म्हणजे आता नक्कीच हे मला इथे मोलकरीण म्हणून राबवून घेणार. बाहेरच्या देशात असे लग्न करून घेऊन जातात नंतर खूप त्रास देतात हे ऐकले होते, ते माझ्याबाबतीत खरे होणार की काय असे वाटू लागले. ह्याने

इथे दुसरे लग्नतर केले नसेल ना! आता तिला बाहेर आणले असेल का? ती बाहेर आली असेल तर मी काय करू? काहीच कळत नव्हते. बाबांना फोन करावा म्हणून फोन बघितला तर तिथे कुठेच फोन नव्हता. ह्या माझा फोनपण घेऊन गेल्या. मी कोणाशी काही बोलू नये म्हणून आता फोनपण नेला. मी काय करू, कोणाला मदतीला बोलावू, इथे माझे कोणीच ओळखीचे नाही, रात्री रस्त्यावरपण कोणी नसणार, देवा वाचव मला! कोणालातरी मदतीला पाठव! असे म्हणतानाच दरवाजा उघडला गेला. घाबरूनच मीवर बघितले. बाहेर पूर्ण अंधार होता त्यामुळे काहीच दिसले नाही.

हेमंत एकदम आत आला. चेहऱ्यावर एकदम राग दिसत होता. मी घाबरून एकदम मागे गेले. तर त्याने एकदम उडी मारून मला घट्ट पकडले,"बास झाले हं तुझे नखरे. आत्ता ठीक होईल, नंतर ठीक होईल म्हणून सकाळपासून शांत आहे मी पण तुझे काही संपतच नाहीये. एका खोलीत बसवण्यासाठी तुझ्याशी लग्न नाही केले मी. काल आल्यापासून काहीच काम केले नाहीस, नुसतीच बसून आहेस. राणीसारखे बसून राहायला तुझे काही कोणा राजाशी लग्न नाही झालेले. आल्यापासून आई राबराब राबतीये. एकदा सून घरी आली की तुला सगळे बसून हातात देणार म्हणून वचन दिले होते मी तिला. तर तूच आराम करत आहेस आणि ती मोलकरीण झाली आहे. ह्यासाठी लग्न केले का मी तुझ्याशी" असे म्हणतानाच काकूपण आत आल्या,"अरे सकाळी बाहेर आली तेव्हा तिला

मी सगळे अन्न गरम करून ताटात वाढून हातात दिले. मला वाटले तिला असे माझ्याकडून सगळे आयते जागेवर घ्यायला कसेतरी होत असेल पण काही नाही, निर्ल्लजासारखे अगदी बसून महाराणीसारखी जेवत होती, नंतर आमटीभात पण मी तिकडे जाऊन वाढले, ताक-पाणी पण जागेवर दिले. बाईसाहेब जेवण करून मी बोलत असताना काहीही न ऐकता, बोलता तश्याच आत निघून आल्या. संध्याकाळी चहापण मी इथे आत आणून दिला. तेव्हा असे वाटले की चला आता रात्रीचा स्वयंपाक मी करते असे म्हणेल पण काही नाही, नुसती बसून आहे लोद्यासारखी. आईने काही शिस्तच लावली नाहीये, नुसतेच लाडावून ठेवले आहे. काय आईबाप आहेत का.." असे म्हंटल्यावर मी लगेच"माझ्या आईबाबांना काही बोलायचे नाही सांगून ठे.." असे म्हणेपर्यंत हेमंतने माझ्या गालावर एक सणसणीत लगावून दिली.

मी एकदम फटकन उठून त्याचा हात पकडला. तर समोर कोणीच नव्हते. अरे हे दोघे कुठे गायब झाले? काहीच कळेना. एकदम सुन्न व्हायला झाले. किती भयानक स्वप्न होते हे, खरेच असे झाले तर. बापरे! काय करू मी आता. देवा काहीतरी मार्ग सुचव. येना रे मदतीला. असे म्हणेपर्यंत दार उघडले गेले आणि हेमंतने आत येऊन लाईट लावला. स्वप्नात दिसलेलेच घडत होते. एकदम घाबरून मी आत सरकून एकदम भिंतीपाशी जाऊन बसले. मला असे बघून काय झाले हेच त्याला कळेना. तो तसाच बाहेर

निघून गेला. काकू आत आल्या. मी अजूनही तशीच घाबरून दोन्ही पाय जवळ घेऊन अजून कोपऱ्यात सरकले. त्या बेडवर येऊन बसल्या,"मानसी अग काय झाले? इतकी का घाबरली आहेस? किती धरधरून घाम सुटला आहे बघ तुला. काय झाले बाळा! इकडे ये", असे म्हणून जवळ यायला लागल्यावर मी आणखीनच मागे सरकले पण मागे भिंतच होती. आता दोघे मिळून मला बांधून ठेवतील असे वाटून मी जोरात ओरडायला सुरुवात केली पण तोंडातून आवाजच फुटत नव्हता. तोपर्यंत त्या अगदी जवळ आल्या, मला मिठीत घेऊन थोपटायला लागल्या. ह्या अनपेक्षित प्रतिसादाने मी एकदम गळून पडले, त्यांना घट्ट मिठी मारून रडायला सुरुवात केली. खुपवेळ अशीच रडत राहिले, त्यापण काहीही न बोलता फक्त पाठीवरून हात फिरवून मला मन मोकळे होईपर्यंत रडू दिले. हळूहळू मी शांत झाले हे बघितल्यावर त्यांनी "जेवणार का"? म्हणून विचारल्यावर मानेनेच नकार दिल्यावर त्यांनी हेमंतला हाक मारून मोठा कपभरुन दूध गरम करून आणायला सांगितले. हेमंतने तो कप काकूंच्या हातात दिला. काकूंनी माझ्या हातात कप दिला पण मी त्यालापण नकार दिल्यावर त्यांनी "जेवू नकोस पण हे दूध तुला माझ्यासमोरच पिऊन संपवावे लागेल" असे सांगितल्यावर "तुला कोकोपावडर घालून दूध आवडते ना म्हणून मी तसे करून आणले आहे, पिऊन बघ" म्हणून हेमंत म्हणाला. काकूंनी माझा हात हातात घेऊन कप धरायला लावला. मी तो कप घेऊन नुसतीच बसले पण त्यांनी माझा कपचा हात माझ्या तोंडाजवळ घेऊन गेल्या. मी दूध पिताना

एकदम हेमंतकडे बघितले तर तो खूप घाबरलेला वाटला. हुमासे देतदेत मी कसेतरी सगळे दूध पिऊन संपवल्यावर काकूंनी कप घेतला आणि हेमंत पेपरटॉवेलने माझे तोंड पुसायला पुढे आला पण मी तो माझ्या हातात घेऊन तोंड पुसल्यावर काकूंनी तो घेऊन त्या कप ठेवायला निघून गेल्या. हेमंत बराचवेळ तसाच बसून होता. मीपण अजूनही थोडीशी घाबरून एकदम कोपऱ्यात बसून राहिले. खुपवेळ आम्ही दोघे असेच बसून राहिलो. हळूहळू मी त्या स्वप्नाच्या धक्यातून बाहेर आले. माझा मोबाईल कुठे आहे ते शोधायला लागले, कुठेच दिसत नव्हता. मी शोधाशोध करत असतानाच हेमंत बाहेर निघून गेल्यावर मनात परत शंकेची पाल चुकचुकली. हेमंत परत एकदम आत आला. मी परत घाबरले. त्याने मोबाईल देऊन,"दुपारी जेवण झाल्यावर तू बाहेरच विसरली होतीस. बाबांचा फोन येऊन गेला. आई द्यायला आली होती पण तू झोपली होतीस म्हणून उठवले नाही", असे म्हणून तिथेच उभा राहिला. मी मोबाईल उघडून सगळे नंबर्स आहेत ना वगैरे सगळे तपासून बघितल्यानंतर त्याने दुसरा फोन बेडवर ठेवत" इथला नंबर घालून तुला हा नवीन मोबाईल घेतला आहे. इथले सगळे emergencyचे नंबर पण सेव्ह केले आहेत. बघून घेशील". असे म्हणून बाहेर निघून गेला. आत्ताच बाजारात आलेला नवीन आयफोन प्रो होता. त्याला खूप सुंदर कव्हर होते. फोन उघडला तर आमच्या दोघांचा फोटो त्यात होता. अनलॉक करायला गेले तर त्याला पासवर्ड. मी स्वतःहून त्याच्याशी बोलावे म्हणून मुद्दामून लॉक करून दिला आहे असे मनात येऊन सहज आपले नाव घातले

तर incorrect पासवर्ड आले, परत माझे नाव आणि जन्मतारीख घातली तर फोन उघडला गेला. तर स्क्रीनवर माझा एकटीचा मला आवडणारा फोटो होता. कॉन्टॅक्टमध्ये जाऊन बघितलेतर सगळे emergency नंबर होते. ज्याअर्थी हे सगळे नंबर ह्याने मला दिले आहेत त्याअर्थी हे मला छळणार नाहीत हा विचार मनात येताच जरा हायसे झाले. फोनवर दोन-तीन गेम्सपण डाउनलोड करून ठेवले होते. दुपारी झोप झाल्यामुळे झोप येतच नव्हती त्यामुळे खुपवेळ त्यातले गेम्स खेळत बसले. एकदम घड्याळ बघितले तर पहाटेचे ३ वाजले होते. आई ऑफिसमध्ये असेल, बाबा जर कामासाठी बाहेर असतील निवांत बोलता येईल म्हणून बाबांना फोन लावला तर अर्ध्या रिंगमध्येच फोन उचलला,"मनू सगळे ठीक आहे ना तिकडे! काही काळजी करण्यासारखे नाही ना ग! कालपासून मला करमत नाहीये ग! खूप वाईट वाईट विचार मनात येत आहेत. आईने खूप समजावले, ओरडली पण तरीही मनातली भीती काही जातच नाहीये" हे ऐकल्यावर तर मला रडूच कोसळले. बाबांना माझा बाहेर आलेला हुंदका बहुतेक ऐकू गेला असेल," मनू अग सांग ना काय झाले? मी येऊ का तिकडे? आत्ताच तिकीट बुक करतो बघ. तोपर्यंत श्यामदादाला पाठवू का तिकडे तो २-३ तासात येऊ शकेल बघ". त्यांची ही चाललेली जीवाची घालमेल ऐकून मी लगेच "अहो बाबा, काळजी करण्यासारखे काही नाही. मी एकदम छान आहे. आल्यापासून नुसती बसून आहे, कामालासुद्धा हात लावला नाही. सकाळी जेवणाचे ताट काकूंनी हातात आणून दिले, आत्ता भूक नाही म्हंटल्यावर हेमंतने मला

आवडते म्हणून कोकोपावडर घालून गरम दूध आणले आणि काकूंनी जबरदस्ती प्यायला लावले", असे म्हणताच "अग मग रडत का होतीस? अजूनही तुझा आवाज असाच येत आहे. खरे सांग सगळे नीट आहे ना? तूला जराजरी काही वेगळे वाटत असेल तर मला सांग, काळजी करू नकोस किंवा घाबरूपण नकोस. आपले खूप नातेवाईक शेजारच्या देशात राहतात. तिकडे ३-४ तासात येऊ शकतील". बाबांची इतकी काळजी बघून मला अजूनच रडू येत होते पण मी ते दाबून "अहो बाबा! तुम्हाला दोघांना असे सोडून राहायची सवय नाही मला. तुमची सारखी आठवण येत आहे. सारखेसारखे रडू येत आहे. मीतरी काय करू?" असे म्हणल्यावर बाबा जरा शांत झाले "रात्री जेवली का नाहीस? जेवली नाहीस ना म्हणूनच झोप येत नाहीये तुला. जेवल्याशिवाय झोपू नये ग. हेमंत कुठे आहे? तुझ्या बोलण्याने जाग येईल ना ग त्याला". असे म्हंटल्यावर मी बाहेर येऊन बोलतीये असे सांगितले. खुपवेळ आम्ही गप्पा मारत होतो. मी उदास आहे हे जाणवल्याने बाबांनी मला भरपूर हसवले. मी दुःखी आहे हे विसरूनच गेले आणि त्यांच्याशी एकदम मनमोकळ्या गप्पा मारल्या. जवळपास दोन तास बोलून नंतर मी फोन ठेवला. खूप शांत आणि एकदम मोकळे वाटत होते. त्यानंतर मात्र मला पाच मिनिटातच गाढ झोप लागली.

सकाळी जाग आल्यावर आजूबाजूला बघितले तर चांगलेच उजाडले होते. घड्याळात बघितले तर दुपारचे १२.३० वाजले होते.

थोडावेळ लोळून दात घासायला म्हणून बाहेर गेले तर काकूंनी हसून "चहा पिणार का"? विचारल्यावर मी "हो" म्हणून सांगितले. तोंड धुवून खोलीत गेले तोपर्यंत काकू पोहे घेऊन आल्या. गरमगरम पोहे खाऊन एकदम बरे वाटले. पोहे खाऊन होईपर्यंत चहापण घेऊन आल्या. "सकाळी चहा घेऊन आले होते तर गाढ झोप लागली होती तुला म्हणून उठवले नाही. एकदम ताजीतवानी दिसत आहेस". मीपण हसून,"हो छान झोप लागली होती" म्हंटल्यावर त्या समाधानाने हसत ताटली व कप घेऊन निघून गेल्या. नुसतेच बसून काय करायचे म्हणून मी अंघोळ करून आले तर खूपच ताजेतवाने वाटू लागले. आवरून बाहेर येऊन बसले तर काकू टीव्हीच बघत होत्या. त्यांनी माझ्या हातात रिमोट देऊन "काय बघायचे ते लाव" म्हणून सांगितल्यावर मी सगळे चॅनेल्स बदलायला सुरुवात केली थोडावेळ हे बघून "कुकर लावते आपल्यासाठी" असे म्हणून आत निघून गेल्या. टीव्ही बघायची सवय नसल्याने काय बघावे हेच सुचत नव्हते म्हणून मी चॅनेल्सच बदलत होते. थोड्यावेळाने त्या परत येऊन बसल्या.

"हवा छान असते इथली. तशी थंडीच जास्त असते पण बोचरी नाहीये. वर्षातून २-३ महिने बर्फ पडत असतो. उन्हाळा तीनेक महिने असतो. पाऊस तर अगदी कधीही पडत असतो". मी "हो का" असे म्हंटल्यावर तर त्यांनी उत्साहाने बोलायला सुरुवात केली."हेमंत लहान असताना आम्ही सिमला, कुलूमनालीला गेलो होतो. तिथे बर्फात खेळताना

खूप खुश झाला होता तो. बर्फात खेळताखेळताच तो म्हणाला होता की मी मोठा झालो ना की इथेच नोकरी करणार. मला बर्फ खूप आवडतो. कुलूमनाली नाही पण इथे बर्फ पडणाऱ्याच ठिकाणी नोकरी करायला आला हो" असे म्हणून समाधानाने हसल्या. हळूहळू बोलत बोलत मीपण त्यांच्याशी कधी बोलायला लागले हेच समजले नाही. खुपवेळ आम्ही छान इकडच्या तिकडच्या गप्पा मारत होतो. हळूहळू त्यांनी ड्रिमलँड हा देश कसा आहे? इथे काय काय बघण्यासारखे आहे? MBA पूर्ण केले तेव्हा त्याला कुठेच जॉब मिळत नव्हता. खूप प्रयत्न करून दमून, निराश होऊन तो परत भारतात येणार होता तोपर्यंत त्याच्या इथेच राहणाऱ्या एका मित्राने ह्या कंपनीमध्ये जागा आहे तर अप्लाय करून बघ पण हा देश इतका ऐकिवात नसल्याने अगोदर विचार करत होता पण मित्र म्हणाला आहे तर बघुयात काय होतंय म्हणून अप्लाय केले तर मुलाखतीसाठी बोलावले आणि लगेच हजरपण व्हायला सांगितले. भारतात जाण्याऐवजी इथे राहून प्रयत्न करू म्हणून इथे राहायला आला. इथली जागा, माणसे आणि थंड वातावरण आवडल्याने त्याने आता इथेच राहायचे ठरवले. मला असे वाटते की तू इथे थोडे दिवस राहून आवडते का बघ. तू जो काही निर्णय घेशील तो आम्हाला मान्य असेल पण तरीही एकदा थंड डोक्याने विचार करून नंतरच काय तो निर्णय घेशील!

काकू माझ्याशी इतक्या चांगल्या वागतील हे स्वप्नातही वाटले नव्हते. मला खूप रडू येत होते, काकूंनी माझ्या हातावर हात ठेवला आणि मी परत धाय मोकलून रडायला लागले. मला मायेने जवळ घेऊन त्या थोपटत राहिल्या. खूपवेळ रडून शांत झाल्यावर मीपण बोलायला सुरुवात केली. "काकू तुम्ही आम्हाला लग्नाअगोदरच ही कल्पना द्यायला हवी होती ना. मला खरेच खूप मोठा धक्का बसला आहे. मी स्वप्नातपण ह्याची कल्पना केली नव्हती. काय आणि कसे करू काहीच समजत नाहीये!

"नार्वेकरांनी आम्हाला जेव्हा तुझे स्थळ सुचवले तेव्हाच अगदी तुला बघायला यायच्या अगोदरच आम्ही त्यांना सगळी कल्पना देऊन ठेवली होती. म्हणजे घर छोटे आहे वगैरे हे नव्हते सांगितले. पण हेमंत आत्ताच MBA झाला आहे आणि अजून तो स्थिरस्थावर झाला नाही आहे. नोकरी म्हणावी तशी चांगली नाहीये, सुरुवातीला मुलीला थोडे सांभाळून घ्यायला लागेल हे सगळे सांगितले होते. त्यावरून तुम्हाला थोडीफार तरी कल्पना येईल असे आम्हाला वाटले होते आणि तुम्ही जर आम्हाला विचारले असते तर आम्ही घर दाखवणारच होतो. हे बघ मी तुला हेमंतने मला काढून पाठवलेले फोटो आणि आमचे चॅटपण दाखवते", असे बोलून काकूंनी त्यांच्या व्हाट्सएपवर हेमंतशी त्यांचे झालेले बोलणे आणि फोटो दाखवले. मी अगोदर हे सगळे कधी झाले आहे ते बघितले तर खरेच सातेक महिन्यांपूर्वीचे संभाषण होते. जर आम्ही देश, घर, आजूबाजूचा

परिसर, कंपनी, मित्रमैत्रिणी, बॉस ह्याबद्दल काही विचारले तर म्हणून आम्हाला दाखवायला म्हणून खुपसारे फोटो, इथल्या काही लोकांचे कॉन्टॅक्ट, शिवाय अमेरिकेतले एमबीए करत असताना झालेल्या मित्रमैत्रिणींचे कॉन्टॅक्टस, त्यांच्याबरोबरचे खूप सारे फोटो, कॉलेजमधले फोटो असे खूप काही त्याने काकूंना पाठवून दिले होते. ते आमच्यापासून काहीही लपवून ठेवणार नाहीये, जे काही ते प्रश्न विचारतील त्याची सगळी उत्तर आणि आमच्या शंकेचे समाधान करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, असे त्यांनी एकमेकांशी बोलताना स्पष्ट लिहिले होते. हे वाचून मलाच आपण बावळट आहोत हे जाणवले. आपले इतके मोठे कुटुंब आहे तरीही हे सारे कोणाच्या कसेच काहीही डोक्यात आले नाही. मला आता ह्या सगळयांच्या ऐवजी आमच्या सगळ्या नातेवाईकांचा, आईबाबांचा राग यायला लागला होता. कोणीच काही चौकशी कशी केली नसेल, खूप आश्चर्य वाटत होते.

"हे सगळेजरी खरे असले तरीही मी चिडल्यापासून हेमंत एकदातरी माझ्याशी बोलायला, मला समजावयाला आला का? काल सकाळीतर तुम्हीपण आत आला नाहीत. मी एकटीच बसून होते. चहासुद्धा दिला नाहीत मला", असे म्हंटल्यावर त्या एकदम हसल्या पण लगेच गंभीर होत म्हणाल्या," अग आम्हालापण काय करावे हे सुचत नव्हते. तुला थोडे आश्चर्य वाटेल असे वाटले होते पण तू इतकी गंभीर होशील असे अजिबात वाटले नव्हते ग. हेमंततर खूप गोंधळला आहे. त्याला काय करावे तेच सुचत

नाहीये त्यामुळे तो तुझ्याशी बोलायला आला नाही. खूप घाबरला आहे ग तो. जवळपास वर्ष झाले तुम्ही एकमेकांशी बोलत आहात, आतातर तुमचे लग्नपण झाले आहे. खूप प्रेम करतो ग तो तुझ्यावर. तू सोडून जाशील का ह्याची भीती वाटत आहे ग त्याला. एकुलता एक असल्याने तळहाताच्या फोडासारखा जपला आहे मी त्याला. अगदी खरे सांगू लग्न झाले ना तेव्हा खूप खुश होते मी पण कुठेतरी आता आपला लेक आपल्यापासून दूर जाईल ही भीतीपण मनात होती ग. मलापण थोडा वेळ लागला ग ह्यातून सावरायला" दोन्ही हात हातात घुंफून त्या हे बोलल्या. खूप भावुक झाल्या होत्या त्या. मी त्यांचे दोन्ही हात हातात घेतले आणि हसून त्यांना डोळ्यांनीच समंती दिली तेव्हा खूप हायसे वाटले त्यांना, माझ्याकडे बघून अगदी कौतुकाने हसल्या त्या. आम्हा दोघींमध्ये एक बॉण्ड झाल्यासारखे वाटले मला.

मी आत जाऊन स्वछ तोंड धुवून आवरून जरा बरे कपडे घालून बाहेर आले. थोडावेळ टीव्ही बघून नंतर मी स्वयंपाकघरात जाऊन चहापावडर, साखर शोधून चहा करायला ठेवला तोपर्यंत हेमंत बाहेर आल्याचा आवाज आला. आले किसून त्यात घातले तोपर्यंत तिथे वाळलेला गवती चहा बघितल्यावर तोपण घातला. एकदम कडक चहा करून ३ कप घेऊन बाहेर आले तर हेमंत समाधानाने माझ्याकडे बघून हसला. मीपण हसून त्याच्या हातात कप दिला. त्या दोघांनी काहीच झाले

नसल्यासारखे दाखवून माझ्याशी एकदम व्यवस्थित बोलायला सुरवात केली. खूप वेळ आम्ही अश्याच गप्पा मारत होतो. ८ कधी वाजले कळालेच नाही. आता स्वयंपाक कधी करणार कधी जेवणार त्यापेक्षा आपण इथेच जवळ पिझ्झा कॉर्नर आहे तिथे पिझ्झा खायला जाऊयात असे हेमंतने सुचवल्यावर आम्ही लगेच समंती दिली. मी आवरलेच होते, काकू आवरायला आत गेल्या. हेमंत तसाच येणार होता त्यामुळे तो तसाच बसला होता. मलापण एकदम काय करावे न सुचून टीव्हीवर चॅनेल बदलत बसले तोपण टीव्हीकडे बघत बसला. १० मिनिटात काकू तयार होऊन बाहेर येताना मुद्दामून दार उघडल्याचा मोठा आवाज करून परत जोरात बंद करून २ मिनिटांनी बाहेर आल्या त्यामुळे आम्हाला अजूनच कसेतरी झाले. मी लगेच टीव्ही बंद करून चप्पल घालायला गेले तर हेमंतने आत जाऊन मला बाहेर थंडी आहे आणि मला अजिबात थंडी सहन होत नाही म्हणून नवीन विकत आणलेला कोट आणि शूज दिले. त्याने माझा एवढा विचार करून माझ्यासाठी हे सगळे विकत आणले म्हणून खूप आनंद झाला. आम्ही तिघेही बाहेर पडलो तर खरेच बाहेर बऱ्यापैकी थंडी वाजत होती. पिझ्झाकॉर्नर जवळच आहे तर आपण चालत जाऊयात का असे काकूंनी विचारल्यावर हेमंतने माझ्याकडे बघितले, त्यानिमित्ताने आजूबाजूचा परिसर बघता येईल म्हणून मी लगेच होकार दिला. सगळा विचार करून खूप आखीवरेखीव असे बांधलेला परिसर होता. ४ पदरी डांबरी रस्ता, ठिकठिकाणी सजावटीसाठी काहींनाकाही केले होते. शिवाय मध्येमध्ये

बसण्यासाठी बेंचपण होते. बऱ्याच ठिकाणी खोट्या गवताचे गालिचे पण घातले होते. शिवाय पादचारी रस्ता, सायकलीसाठीपण वेगळा छोटा रस्ता होता. स्वप्नात एखादे गाव कसे असावे असे गाव होते हे. येणारे जाणारे सगळेजण थांबून 'हॅलो' म्हणून मगच पुढे जात होते. बरेचजण हेमंतच्या ओळखीचे होते पण कोणीही आम्हाला थांबवून गप्पा वगैरे काहीही मारायला थांबवले नाही की आम्ही कोणाला थांबवले नाही. फक्त हेमंत व काकूंना ओळखीचे हास्य आणि मला 'वेलकम' एवढे म्हणून पुढे जात होते. भारी वाटले एकदम. हॉटेलमध्ये ५ मिनिटात पोहचलो. एकदम साधे, छोटे पण खूपच छान हॉटेल होते. प्रत्येकजण एकमेकांना ओळखत होते. त्यामुळे येणारे जाणारे तिथले काम करणारे सगळेजण एकमेकांना नाव घेऊन हॅलो म्हणत होते. सगळ्यांनी माझे स्वागत केले. सगळी माणसे खूप चांगली आणि साधी वाटली. मला पिझ्झाची चव खूप आवडली नाही पण ज्यूस छान होता. आम्ही अर्ध्याच्यावर पिझ्झा घरी घेऊन आलो. घरी आल्यावर थोडावेळ टीव्ही लावून आम्ही गप्पा मारून काकू झोप आली म्हणून उठल्यावर आम्हीपण टीव्ही बंद करून खोलीत गेलो. आत गेल्यावर हेमंतने घट्ट मिठी मारून,"काहीही झाले तरी प्लिज मला सोडून जायचा विचारसुद्धा मनात आणू नकोस, मी तुझ्याशिवाय नाही जगू शकत" म्हणून मला अजून घट्ट विळखा घातला. त्याच्या डोळ्यातले अश्रू माझ्या ड्रेसवर पडले तेव्हा मला अगदी कसेतरी झाले. मीपण त्याला घट्ट मिठी मारली. थोड्यावेळाने त्याने मला अलगद उचलले, "पहिल्या रात्री तुला कसे उचलले होते

आठवते का?" असे म्हंटल्यावर लाजून मी माझा चेहरा झाकून घेतला. त्याने मला बेडवर ठेवून माझा हात अलगद काढून "आमची बायको लाजल्यावर इतकी सुंदर दिसते हे मला माहितीच नव्हते" असे म्हणून त्याने माझे तोंडावर आलेले केस बाजूला केले.

हेमंत सकाळी ६ वाजताच उठला. एकदम कसल्यातरी आवाजाने मला जाग आली, बघितले तर हेमंतच्या हातून तिथले एक पुस्तक खाली पडले आणि त्याचा आवाज झाला होता. मला उठलेले बघून लगेच 'सॉरी' म्हणाला. मी परत झोपायला लागल्यावर जवळ आला आणि म्हणाला,"आता उठलीच आहेस तर जरा चहा कर ना". घड्याळात बघितले तर ६ वाजले होते. तशीच उठले आणि चहा ठेवला. चहा पिऊन परत झोपुयात हा विचार करत असतानाच काकूपण स्वयंपाकघरात आल्या. नाश्त्याला काय करायचे, डब्यात हेमंतला काय करायचे हे सांगून 'आलेच' म्हणून निघून गेल्या. चहा करून बाहेर घेऊन आलेतर दोघेही तिथे बसले होते. तिघांनी गप्पा मारत चहा प्यायलो नंतर हेमंत आवरायला आणि काकू खोली आवरायला म्हणून निघून गेले. मी कप घेऊन स्वयंपाकघरात येऊन नाश्ता व डबा तयार केला. तिघांनी मिळून नाश्ता करून हेमंत ऑफिसला निघून गेला. मी आणि काकू नाश्ता झाल्यावर थोडावेळ तसेच बसलेलो असताना इथे काही कामाला बाई मिळत नाही त्यामुळे आपल्याला घरीच कशी सगळी कामे करावी लागतात हे सगळे सांगून काय काय आणि कशी

कशी सगळी कामे करायची ते सगळे समजावून सांगितले. मी काय काम करायची? पहिल्यांदा कुठले, नंतर कुठले काम करायचे हे सगळे सांगून तिथून बाकीचे आवरायला निघून गेल्या. ‘मानसीताई चला उठा संसाराला सुरुवात झाली आहे तुमची, तेव्हा कामाला लागा' असे स्वतःला सांगून उठले. दुपारपर्यंत कामे पुरून उरली. १ वाजता बरोबर काकूंनी,"मी जेवायला ताट घेते तोपर्यंत पटकन आपल्यासाठी गरम पोळया कर ग" असे म्हंटल्यावर मी हातातले काम सोडून स्वयंपाकघरात गेले तर,"अग तुला म्हणाले होते ना १२.३० वाजता कुकर लाव म्हणजे गरमगरम आमटीभात खाता येईल, विसरलीस का?" खरेच सगळे आवरताना कुकर लावायचे पूर्ण विसरून गेले होते. त्यांनी कुकर लावायला म्हणून भांडी काढली ते बघून तोपर्यंत हातातले काम संपवता येईल म्हणून मी परत आतमध्ये गेले. कुकरच्या शिट्ट्या येणे बंद झाल्यावर परत पोळया करायला म्हणून आले तर लगेच बाहेर गेल्या. एकदम अश्या बाहेर का गेल्या समजले नाही पण फार लक्ष न देता मी पोळया करून बाहेर घेऊन गेले तर ताटपण नव्हती घेतली. मी एकदम आश्चर्याने बघितल्यावर,"कुकर लावायचे तुझे काम मी केले, आता तू ताटपाणी घे" म्हणून परत टीव्ही बघत बसल्या. कुकर उतरल्यावर साधे वरण करून सगळे बाहेर आणले आणि जेवून थोडावेळ झोपायचा विचार करत असतानाच,"बॅग आवरून घेशील ग आता" असे म्हंटल्यावर आश्चर्यच वाटले मला. आता मी काय ह्यांच्या मनाप्रमाणे वागायचे का? पण काहीच न बोलता तिथले सगळे आवरून खोलीत

जाऊन दार बंद करून झोपून गेले. एकदम गाढ झोप लागली होती मला. खूप जोरात दार ठोठवायचा आवाज आल्यावर जाग आली तर कोणीतरी आमच्याच खोलीचा दरवाजा वाजवत होतं. एकदम हडबडून दार उघडले तर हेमंत दार वाजवत होता. "अग किती गाढ झोपली होतीस. ५ मिनिटं झाले दार वाजवत आहे". असे म्हणत आत आला. मी लाडाने जवळ गेलेतर थोडावेळ जवळ घेऊन लगेच कपडे बदलायचे कारण देऊन बाजूला झाला. मीपण तोंड धुवायला म्हणून गेले. बाहेर आलेतर,"अग आपण दोघीच असतो घरी त्यामुळे दुपारी झोपताना दार नाही लावले तरी चालेल. बघ बरं, हेमंत एवढा दमून आला पण ५ मिनिटं त्याला दार ठोठावत उभे राहायला लागले. जा आता चहा कर आपल्याला". सासू आहे की कैदासीण असे मनात म्हणून मी सरळ खोलीत गेले तर हेमंतने,"चहा झाला का?" विचारले. काहीच न बोलता परत स्वयंपाकघरात जाऊन चहा ठेवला. मायलेक बाहेर मस्त हसतखेळत गप्पा मारत होते. तिघांनीही छान गप्पा मारून चहा घेऊन आवरून फिरायला म्हणून बाहेर पडलो. बाहेर गेल्यामुळे एकदम ताजेतवाने वाटत होते. घरी गेल्यावर परत रात्रीचा स्वयंपाक करायचा ह्या विचाराने खरेतर घरी परत जावेसेच वाटत नव्हते पण काही इलाज नसल्याने नाखुशीनेच घरी परत आलो तर रात्री फक्त खिचडी कढी करायची ठरवल्याने जरा बरा वाटले.

सकाळी उठा, चहा, नाश्ता, डबा करा. हेमंत गेल्यावर केरफरशी, बाकीची आवराआवरी करा, परत दुपारी कुकर, पोळया, करून जेवून दुपारीच भांडी घासा, थोडावेळ पडून परत चहा, फिरून येणे, रात्रीचा स्वयंपाक करा, जेवून थोडावेळ टीव्ही बघा मग झोपा. परत सकाळी उठून हीच दिनचर्या सुरु करा. हो आठवड्यातून एकदा कपड्यांची मशीन लावावी लागत होती. शनिवार रविवार मात्र जवळपास कुठेतरी फिरायला जायचो. पण बाकी काहीच वेगळे नाही.

हळूहळू तिकडचा बराचसा परिसर माहित झाला होता. गाव छोटे असल्याने खूपजणांना ओळखायलापण लागले होते. थोड्या मैत्रिणीपण झाल्या होत्या. महत्वाचे म्हणजे कमी पैशात संसार कसा करायचा हे खूप छान शिकले होते. ६ महिन्यांनी काकूंचा परत भारतात परत जायचा दिवस आला. सगळ्यांना द्यायला काहिनाकाही घेतले होते. अगदी माझ्या माहेरकडच्यांनापण सगळ्यांना काहीनाकाही घेतले होते, छान वाटले होते मला. आता कमी दिवस राहिले आहेत हे कळल्यावर थोडे छान वाटले होते, सासुरवासातून सुटका होईल, जरा मनासारखे वागत येईल म्हणून छानपण वाटले होते पण त्या जाताना खूपच वाईट वाटत होते. कितीही म्हंटलेतरी त्यांची सवय झाली होती.

त्यांना सोडून आलोतर हेमंतला खूपच वाईट वाटत होते. त्यामुळे मीपण एकदम शांत होते. थोड्यादिवसांनी तो परत नॉर्मल झाला. आता संध्याकाळी तो ऑफिसमधून आला की आमचे फिरणे बंद झाले कारण त्यावेळेत आम्ही काकाकाकुंशी बोलायचो. मी मात्र सगळ्यांशी दिवसा बोलायची त्यामुळे हेमंतचे माझ्या माहेरकडच्यांशी फार बोलणे होत नसायचे.

शनिवार रविवार मात्र आम्ही कमी खर्चात कुठे बाहेर फिरता येईल ह्याचा विचार करून बऱ्याच ठिकाणी फिरून यायचो. खरेच ड्रिमलँड म्हणजे स्वप्नात असल्यासारखाच देश होता. मी कार्टून्स मध्ये गावं बघायचे ना असाच देश होता. एकदम सुंदर व्यवस्थापन केलेला. एकतर खूप छोटा देश त्यातून लोकसंख्यापण खूप कमी. त्यामुळे ते सगळे सांभाळणेपण सोप्पे जात असणार. इथे अजूनही राजाराणी, राजघराण्याला खूप महत्व होते. त्यांना खूप मान होता. ते भाषण द्यायला आलेतरी खुपसारी गर्दी लोटायची. तेपण सामान्य लोकांचा खूप विचार करून त्यांच्या ज्या काही तक्रारी असतील त्या दूर करायचे. आतले राजकारण काही कळत नव्हते पण बाहेरून तर सगळे एकदम छान दिसत होते. आम्हीपण ३-४ वेळेला राजाराणी, राजकुमार आणि राजकुमारीला बघायला गेलो होतो. एकदम खानदानी वाटत होते. त्यांच्याकडे बघूनच ते एकदम खानदानी आहेत हे कळत होते. चेहऱ्यावरतर इतके तेज होते की विचारू नका. बाहेर येऊन ते

खूप जणांशी बोलले, बऱ्याचजणांच्या अडचणी ऐकून ज्या तिथेच सोडवता येण्यासारख्या होत्या त्या तिथल्या तिथे उभ्या असणाऱ्या अधिकाऱ्यांना सांगत होते आणि जे लगेच सोडवू शकणार नाही ते लिहून ठेवत होते. पहिल्यांदा जेव्हा हे सगळे बघितले तेव्हा खूप भारी वाटले.

असाच आमचा संसार चालू होता. दोघांचे असून असून किती काम असणार. हेमंत ऑफिसला गेला की दोन तासात सगळी कामं होऊन जायची. नंतर खूप कंटाळा यायचा. मग रोज सकाळी थोडावेळ चक्कर मारायला जायचे. एक दिवस असेच फिरताना एक छोटी शाळा दिसली. माझी पाऊले आपसूकच तिथे वळली. बाहेर चक्कर मारत असतानाच तिथले मुख्याध्यापक बाहेर आले आणि माझ्याशी खूप छान गप्पा मारू लागले. जर मला बसून कंटाळा येत असेल तर तिथेच जवळ एक अनाथ मुलांची शाळा आहे, तिथे थोडावेळ शिकवायला जाऊ शकते म्हणून सुचवले. मला ही कल्पना खूपच आवडली, मी त्यांना लगेच होकार दिला. त्यांनी माझ्याकडून सगळी माहिती घेऊन काय काय कागदपत्रे लागतील ह्याची माहिती दिली. मी हवेतच उडत घरी आले. आईबाबांना फोन करून लगेच ही माहिती दिली. ते दोघेपण खूप खुश झाले. हेमंत घरी आल्यानंतरच त्याला सांगावे म्हणून दिवसभर त्याची वाट बघत बसले. संध्याकाळी चहा पिता पिता त्याला ही माहिती दिली तर तोपण खुश झाला आणि त्याने लगेच काकाकाकूंना फोन करून ही बातमी दिली. काका काहीच बोलले

नाहीत पण काकूंची किरकिर सुरु झाली," कशाला पाहिजे नाही ती कामं करायला. अगोदर घर नीट ठेव म्हणावे नंतर बाकीचे कर. पैसेतर काही कमावणार नाही पण फुकटचे कामं करायला मात्र लगेच जमते. आपल्या डोक्यावर स्वतःचा सगळा भार टाकून बाईसाहेब अगदी मोठेपणा करून सामाजिक कार्य करणार म्हणे" हे सगळे ऐकून मी चाटच पडले. फोन ठेवल्यावर माझा रडवेला चेहरा बघून,"तुला पाहिजे ते तू कर" असे सांगून आत निघून गेला. थोडीसुद्धा समजूत घालायला आला नाही. पण मी मात्र ही संधी सोडणार नव्हते. दुसऱ्याच दिवशी सगळी कागदपत्रे घेऊन शाळेत गेल्यावर त्यांनी मला लगेच मी इथे कुठलाही मोबदला न घेता कामं करू शकते म्हणून पत्र दिले व १ तारखेपासून हजर व्हायला सांगितले.

शाळा सकाळी ७.३० वाजता सुरु होत असल्यामुळे हेमंतच्या अगोदरच निघावे लागणार होते. १ तारखेला सकाळी लवकर उठून सगळे पटपट आवरून ७ वाजताच सगळे आवरून झाले. हेमंतचा डबा, नाश्ता, चहा सगळे टेबलवर ठेवून मी त्याला सांगून निघताना,"तुझी सवय झाली आहे ग मला. ऑफिसला जाताना तुला बघण्याशिवाय जाणे म्हणजे नको वाटत आहे. आपण दोघे एकत्र बाहेर पडू ना. एकदा त्यांना विचारून घे" असे सांगितल्यावर मी 'हो' म्हणून लगेच निघाले.

शाळेत पोहचले पण खूप धाकधूक होत होती. ऑफिसमध्ये जाऊन पत्र दाखवले तर त्यांनी माझे खूप छान हसून स्वागत केले. माझी आवडनिवड विचारूनच मला क्राफ्ट शिकवायला सांगितले होते. तिने मला तिथे असलेल्या एका खोलीत आणून सोडले. तिथे कोणीच नव्हते. पूर्ण खोली फिरून तिथे असलेली कपाटे, ड्रॉवर्स सगळे उघडून बघितले व काय काय सामान आहे ते बघितले. खूप नाही पण तसे बऱ्यापैकी सामान होते. मी तिथे असलेल्या सामानातून आज काय शिकवता येईल हे ठरवून होईपर्यंत १० मुलं वर्गात आली. त्यांना क्राफ्ट शिकवायच्या अगोदर मी ओळख करून घ्यायला सुरुवात केल्यावर ती छोटी छोटी मुले लाजली मग छान गप्पा मारत मी त्यांच्याशी ओळख करून घेतली. ४५ मिनिटांचा तास कसा संपला कळलेच नाही. मी त्यांना काहीच शिकवले नव्हते पण ती मुलं एकदम खुश होऊन वर्गाबाहेर जाताना जेव्हा "बायबाय" म्हणून गेली ना तेव्हा खूप छान वाटले. त्यादिवशी एकूण तीन वर्गातली मुलं आली. त्यांच्याशी फक्त गप्पा मारून त्यांना आपलेसे करून घेतले. संध्याकाळी खूपच खुश होऊन एकदम प्रसन्न मनाने घरी आले. कोणालाच काहीही बोलायला जागा द्यायची नाही हे ठरवूनच घरी आल्याआल्या थोडावेळसुद्धा न बसता सगळे घर आवरून चकाचक करून पूर्ण स्वयंपाक करून खीर सुद्धा केली.

संध्याकाळी हेमंत आला तेव्हा मी थोडावेळ पडले होते तर त्याचे लगेच,"मला माहितीच होते तू दमणार म्हणून विचार करून निर्णय घे

म्हणालो". मी लगेच उठून हसून त्याचे स्वागत केले, जाता जाता,"आवरून घे, मी मस्त चहा करते" म्हणून निघून गेले. दोघांनी मिळून चहा घेतला. खरेतर मला खूप काही सांगायचे होते पण त्याने लगेच काकूंना फोन लावला. उचलल्या उचलल्या,"काय आज चहातरी मिळाला का?"असे विचारल्यावर डोकेच फिरले माझे. लगेच चहाचा कप दाखवला. "स्वयंपाकाचे काय?"असा लगेच पुढचा प्रश्न. मी उत्तर द्यायला तोंड उघडले तर लगेच स्वयंपाकघरात गेला. तिथे असलेली सगळी झाकणं काढून स्वयंपाक काय केला ते दाखवले. तर "अरे वा! आज महाराणींचा पहिला दिवस म्हणून खीर का?"असा लगेच टोमणा मारला. मी बाहेरून सगळे ऐकत होते पण काही बोलूच शकत नव्हते. मग बाबांना फोन केला तर त्यांनी खुश होऊन,"काय कसा गेला दिवस आज! एकदम खुश दिसत आहेस म्हणून बोलायला सुरुवात केली". चेहऱ्यावर आलेला उदासपणा लगेच निघून जाऊन तिथे उल्हास आला. आज काय काय झाले, किती छान वाटले, तिथल्या बाकीच्या शिक्षिका, मुलं सगळ्यांबद्दल सांगितले. जवळपास अर्धा तास मी एकटीच बोलत होते आणि आईबाबा हसून ऐकत होते. आई येऊन बसलेली पण जाणवले नाही मला. माझे बोलून झाल्यावर दोघांनी हसून माझे खूप कौतुक केले आणि अशीच नेहमी खुश, आनंदी राहा म्हणून आशीर्वाद दिला.

माझी आता छान घडी बसली होती. माझी ही नोकरी मला खूप आवडत होती. काकू मध्येमध्ये कटकट करायच्या पण मी ऐकून न ऐकल्यासारखे करायचे. बघताबघता लग्नाला एक वर्ष होत आले. खरेच एक वर्ष किती पटकन गेले कळलेच नाही.

आम्ही दोघांनी सुट्टी घेतली आणि मस्त तिथे जवळच असलेल्या "रुंबा" म्हणून गावात राहायला गेलो. खूपच सुंदर छोटेसे गाव होते. हॉटेल छोटे होते पण खूप सुंदर होते. तिथल्या मालकमालकिणीने आमचे खूप छान स्वागत केले. आम्ही रूममध्ये गेलो तर रूम खूपच छान सजवली होती. हेमंतने त्यांना बोलता बोलता आम्ही आमचा लग्नाचा वाढदिवस साजरा करायला येत आहोत हे सांगितले होते त्यामुळे त्यांनी खूपच छान खोली सजवली होती. इतके भारी वाटले बघून. दोन दिवस कसे गेले ते कळलेच नाही. निसर्गाच्या सान्निध्यात खूप छान वाटले. हॉटेल खूप छान असल्यामुळे आम्ही तिथेच वेळ घालवला. एकदम फ्रेश होऊन परत घरी आलो.

थोड्याच दिवसात नवीन पाहुणा घरी येणार ह्याची चाहूल लागली. चित्रपटात दाखवल्यासारखे आता सगळे खुश होतील. मला डोक्यावर चढवून ठेवतील असे वाटले होते पण इथेतर उलटेच झाले. हेमंत काहीच बोलला नाही. काकूंना सांगितल्यावर,"अरे हेमंत तीन वर्ष थांबायचे ठरले

होते ना आपले मग हे काय?" असे विचारल्यावर मी तर थक्कच झाले. मला म्हणाल्या,"काका तीन वर्षांनी रिटायर झाल्यावर आम्ही तिकडे येऊन राहिल्यानंतर मग आपण कुटुंब वाढवायचा विचार करू, हे मी तुला सांगितले होते ना! त्यातून अग हेमंत अजून स्थिरावला नाहीये, तू त्याला नोकरी करून मदत करायच्याऐवजी सामाजिक कार्य करत आहेस. कसे काय करणार आता". हे ऐकल्यानंतर मी हेमंतला फोन देऊन आत निघून गेले. आईबाबा मात्र खूप खुश होते. काय, कशी काळजी घेणार. कुठल्या दवाखान्यात दाखवणार ह्याची सगळी चौकशी केली. आत येऊन मी बसलेच तोपर्यंत तन्मय आणि मधुराचा फोन आला. खूप सारे चिडवून मला भरपूर हसवले. कुठेतरी हरवलेला मूड परत आला. हेमंतपण खोलीत आलेला तन्मयने बघितल्यावर त्याच्याशीपण दोघे बोलले. जेवायच्या वेळेला ताटंपाणी घ्यायला हेमंतने आज थोडी मदत केली. त्यामुळे जरा बरे वाटले.

आता मात्र खरी अडचण जाणवू लागली होती. इन्शुरन्समध्ये दवाखान्याचा खर्च कव्हर होणार असला तरीही बाकीचे बरेच खर्च होते. आता मात्र पगाराची हातातोंडाशी गाठ पडत होती. खूप विचार करून खर्च करत होतो. चोरचोळी भरण्यासाठी तिसरा महिना लागल्यावर काकू आल्या. त्या सहा महिने राहणार होत्या. येताना खूप सारे खायला शिवाय खूप वेगवेगळे कपडे आणि खूप काही सामान घेऊन आल्या होत्या. त्यांनी येताना हेमंतच्या इथल्या अकाउंटमध्ये पैसे पण भरले होते. त्यांनी

आल्यानंतर लगेच माझी नोकरी बंद केली पण खूप लाड केले. बरेच काही वेगवेगळे खायला करत होत्या, मला काय हवे नको बघत होत्या. मला थोडाजरी त्रास झाला तर लगेच आराम करायला लावायच्या. रोज सकाळी हेमंत ऑफिसला गेला की व्यायाम करायला लावायच्या. संध्याकाळी आम्ही तिघेजण फिरायलापण जायचो शिवाय रात्री जेवल्यानंतर परत शतपावली करायचो. त्यांना पाहिजे आणि हवे तसे वागायचे की मग काही अडचण नसायची. सुरुवातीला थोडे जड गेले पण नंतर मला आईने समजावले,"बाकीचे सगळे लाड करत आहेत ना मग वाग ना त्यांच्या मनासारखे, काय फरक पडतो. सुरुवातीला त्रास होईल पण नंतर हळूहळू सवय होईल". त्यानंतर मी त्या म्हणतील त्याप्रमाणे वागायला सुरुवात केल्यानंतर मात्र आमचे सगळयांचेच जीवन सुकर झाले. काकू आल्यानंतर हेमंत ज्या उतरल्या चेहऱ्याने वागायचा तेपण कमी झाले आणि तोपण खुश राहू लागला. सातवा महिना लागल्यावर त्यांनी डोहाळजेवणाची तयारी सुरु केली. तिथे असलेल्या सगळया भारतीय कुटुंबाना आमंत्रण दिले शिवाय काही तिथल्या चांगले संबंध असलेल्या आणि आमच्या इमारतींमधल्या गोऱ्या लोकांना सुद्धा आमंत्रण दिले. जेव्हा त्यांनी सगळे सामान बाहेर काढले तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला होता. आईबाबा व काकाकाकूंनी आधीच सगळे ठरवून त्याप्रमाणे सगळे सामान तिथेच तयार करून इथे आणले होते. अगदी छोट्या छोट्या गोष्टींचा विचार करून सगळे आणले होते. आम्ही तिघांनी मिळून आणलेल्या सामानानी पूर्ण हॉल सजवला तर

पूर्ण हॉलच भरून गेला. आलेले पाहुणे आता कुठे बसणार ह्याचा खूप मोठा प्रश्न पडला. मग थोडे सामान कमी करून टीव्हीस्टॅन्ड, सोफा सगळे आत ठेवले आणि प्लास्टिक च्या खुर्च्या भाड्याने आणायचे ठरले. स्वयंपाकाचा मेनू अगोदरच ठरला होता. तिथे माझ्या २ खूप चांगल्या मैत्रिणी झाल्या होत्या. त्या दोघीही मदतीला आल्या. चौघींनी मिळून पटापट सगळा स्वयंपाक करून आवरून संध्याकाळी खूप छान डोहाळजेवणाचा कार्यक्रम पार पडला. वाट्या उघडताना काकू एकदम उत्सुकतेने बघत होत्या, त्यांना मुलगाच पाहिजे होता पण मला मात्र मुलगी हवी होती. वाटी उघडली तर गुलाबजाम आला, काकू एकदम खुश झाल्या. खरेतर आम्हाला मुलगी होणार आहे हे मला माहित होते पण काकूंना मुलगा हवा होता आणि त्यांच्या वागण्यात काही फरक पडू नये म्हणून आम्ही त्यांना सांगितले नव्हते. "आपण मुलगा आहे की मुलगी आहे बघायलाच नको! भारतात कशी हुरहूर असते तशी हुरहूर आपणपण जाणवून घेऊ!" असे काकूंना सांगून त्यांचे समाधान केले होते. मी मात्र मला मुलगी होणार म्हणून खूपच खुश होते.

बाळंतपणाच्यावेळी आईला फक्त दीड महिना सुट्टी मिळणार होती म्हणून नंतर मावशी येणार होती पण तिचा व्हिसा रिजेक्ट झाला मग नंतर परत काकू ६ महिने येऊन राहणार असे ठरले. आई अगदी ८ दिवस अगोदर आली पण मला दुसऱ्याच दिवशी त्रास सुरु झाला. आई व हेमंत

माझ्याबरोबर होते. सकाळपर्यंत काहीही होणार नाही असे डॉक्टरांनी सांगितल्यामुळे काकू परत घरी गेल्या पण मला खूपच त्रास होऊ लागल्यामुळे हेमंतने लगेच घरी फोन करून सांगितले आणि काकू लगेच आल्या. त्या पोहोचायच्या अगोदर २ मिनिटच अगोदर मला मुलगी झाली. तिथे सगळयांना कळल्यावर श्रीशाने लगेच फोन करून मी डबा घेऊन येते म्हणून सांगितले. काकू येताना तश्याच आल्या होत्या त्यामुळे श्रीशा येईपर्यंत म्हणून हेमंतने तिकडूनच चहा बिस्कीट मागवून मला खायला दिले होते. बाळाला हातात घेताना काकूंनी आईला टोमणा मारला, म्हणाल्या"तुमच्या मानसीला मुलगी हवी होती तर तिची इच्छा पूर्ण झाली". कोणी काहीच बोलले नाही.

थोड्यावेळाने श्रीशा मस्त गरमगरम डबा घेऊन आली. ती २ तास बसायच्या तयारीने आल्यामुळे सगळयांना घरी जाऊन थोडावेळ आराम करायला सांगितलं. आईला घरी जायचे जाम टेन्शन आले होते पण रात्रीचा डबा घेऊन यायचा असल्यामुळे ते तिघे घरी आले. श्रीशाने हे सगळे ऐकले होते पण तिने ते अजिबात जाणवू न देता मला प्रेमाने भरवले आणि माझ्याशी छान गप्पा मारत राहिली. दोन तास कसे गेले कळलेच नाहीत. आई व हेमंत माझा रात्रीचा डबा घेऊन आले. दुसऱ्या दिवशी काकूंनी नाश्त्याला शिरा दिला तर त्यात अजिबात साखर नव्हती. एक घास खाणेही अशक्य झाले होते. हेमंतने अगोदर मान्यच केले नाही पण जेव्हा खाऊन

बघितले तेव्हा काहीच बोलला नाही. हेमंतला पॅटर्निटी सुट्टी मिळाली होती त्यामुळे तो तिथे थांबणार होता. आई घरी अंघोळीला म्हणून गेली आणि हेमंतला थोड्यावेळाने घरी बोलावले. तिने पटकन थोडे उप्पीट करून त्याच्याबरोबर पाठवून दिले. दुपारी पूर्ण छान मला आवडणारा डबा घेऊन आली. खरेतर हॉस्पिटलमधले खायचे होते पण आम्ही त्यांना सांगून घरचे खाणे खात होतो. डॉक्टर खूप छान ओळखीची झाल्यामुळे तिनेपण परवानगी दिली होती. ५ दिवस राहून घरी आले. दुसऱ्याच दिवशी काकू भारतात परतल्या.

आईला येऊन दीड महिना कधी झाला कळलेच नाही. माझी आणि रेवाची तब्येत चांगलीच सुधारली होती. मला लगेच भारतात जाणे शक्य नसल्याने इथेच बारसे करायचे ठरले. एक दिवस चांगला होता म्हणून दोघी असताना बारसे करायचे ठरले. काकू येताना खूप सारे सामान घेऊन आल्या होत्या. खूप छान बाळंतविडा तयार केला होता. आजींनी त्यांच्याबरोबर पणती झाली म्हणून चांदीची पणत दिली होती. रेवाचे खूप जोरदार बारसे झाले. इथले सगळे गोरे आणि इथे असलेले सगळे भारतीय बारशाला आले होते. गोऱ्यांना हे सगळे नवीन होते. त्यामुळे त्यांनी प्रत्येक गोष्ट बारकाईने बघून खूप एन्जॉय केले. सगळ्यांनी परत घरी जाताना असे काही कार्यक्रम असतील तर आम्हाला बोलावत जा म्हणून सांगितले.

रेवा हळूहळू मोठी होत होती. तिच्या बाळलीलांमध्ये आम्ही सगळेच रमलो होतो. माझे शाळेत जाणे बंदच झाले होते. फुकटची समाजसेवा बंद झाली त्यामुळे काकूपण खुश होत्या. साधारण रेवा ८ महिन्याची झाली आणि हेमंतची नोकरी गेली. लहान मुलगी पदरात आणि हेमंतला भारतात परत जायचे नव्हते त्यामुळे आता काय करावे हेच सुचत नव्हते. व्हिसा लगेच कॅन्सल करू नका म्हणून कंपनीला केलेली विनंती त्यांनी मान्य केली. मग मी रेवाला घेऊन भारतात जायचे व इथेच राहून हेमंतने नोकरी शोधायची असे ठरले. आता अचानक भारतात जायचे मग काय सांगायचे तेच कळत नव्हते पण काकूंनी,"कोणाला कशाला स्पष्टीकरण द्यायचे" म्हणून सांगितले. आईबाबांनापण सगळी कल्पना होती. हेमंतची नोकरी आणि पगार अगदीच यथातथा होता. त्यामुळे काहीच सेविंग नव्हते त्यामुळे काकांनीच आमच्या तिकिटाचे पैसे दिले. साधारण ८ दिवसांनी रेवाला घेऊन भारतात परतले. काकाकाकू आणि आईबाबा घ्यायला येणार होते पण तन्मयने तेव्हाच,"मी मानसीला घ्यायला जाईन. ती व रेवा इथे २-३ दिवस राहून मग पुण्यात येतील" म्हणून निक्षून सांगितले. आश्चर्य म्हणजे काकूपण त्यावर काहीही बोलल्या नाही.

भारतातून इकडे येताना काकू बरोबर होत्या पण आता जाताना रेवाला सांभाळून तीन फ्लाईट्स बदलून २४ तासाचा इतक्या लांबचा प्रवास एकटीने करायचा नको वाटत होते. खूप भीती वाटत होती. अगोदरच पुढे

काय होणार हे माहित नसल्यामुळे खूप धास्ती वाटत होती आणि त्यातून एकटीने रेवाला घेऊन प्रवास करावा लागणार होता. ड्रिमलँड इतका छोटा देश होता त्यामुळे काही झाले तरीही सगळ्यांना लगेच कळायचे. त्याप्रमाणे ही बातमीपण सगळ्यांना कळाली होती, तिथे माझे सगळ्यांशी खूप चांगले संबंध झाले असल्याने मला सोडायला खुपजण आले होते. परत येणार की नाही माहित नसल्याने प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी तरळत होते. प्रत्येकाने मला लक्षात रहावे म्हणून काहीना काही भेट दिली होती. नशिबाने मी खूप सामान बरोबर घेतले नसल्याने सगळे बॅगेत बसले. जड मनाने प्रत्येकाला निरोप देऊन आम्ही एअरपोर्टसाठी निघालो. हेमंतला सोडून जाताना पण अगदी नको होत होते, खूप रडू येत होते, हेमंतलापण अगदी नको होत होते. पण.....

रेवा अगदी शहाण्या बाळासारखी वागत होती. कुठेही मला त्रास दिला नाही. पण प्रवासात मात्र आम्हा दोघीनांही कंटाळा आला होता. प्रत्येकवेळी फ्लाईट बदलताना एरवी पायात भिंगरी अडकवल्याप्रमाणे धावणारी रेवा कांगारू बॅगेत किंवा माझा हात धरून चालत होती. शेवटी एकदाचा कंटाळवाणा प्रवास संपला. इतक्या वर्षांनी परत मायभूमीला पाय लागले होते. जेव्हा भारतात जाईन तेव्हा तिथे काय काय करायचे, कोणाकोणाला भेटायचे हे सगळे मी १००० वेळा तरी ठरवले असेल. नुसत्या विचारानेच आनंदी व्हायची मी! पण ह्यावेळेस खरेच जेव्हा आले

होते तेव्हा अजिबातच उत्साह नव्हता. तन्मय आणि मधुराला बघितल्यावर मात्र डोळयात पाणी तरळले. त्याची दोन्ही मुलं आत्या आत्या म्हणून येऊन चिकटली. मधुराने रेवाला घेतले आणि रेवापण न रडता लगेच तिच्याकडे गेली. तन्मयने जसे जवळ घेतले तेव्हा मात्र खूप रडले. कोणी काहीच न बोलता आम्ही घरी गेलो. मधुराने मला आवडणारा स्वयंपाक केला होता. दोन्ही मुलं माझ्याभोवतीच घुटमळत असल्याने थोडे बरे वाटले. मधुरानेच रेवाचे सगळे केले, तिला जेवायला घातले. रेवा तिथे लगेच रुळली. जेवण झाल्यावर मधुराने,"मी रेवाकडे बघते, तू जाऊन आराम कर म्हणून सांगितल्यावर मीपण लगेच पडत्या फळाची आज्ञा घेऊन झोपायला गेले. गेले कित्येक दिवस झोपच आली नव्हती पण आजमात्र पडल्यापडल्या गाढ झोप लागली.

दोन दिवस खूप मज्जा केली. खूप सारे हिंडलो, खूप सारे खाल्ले, बाहेर जाऊन मस्त चहा, वडापाव, चाट, आईस्क्रिम खाल्यावर एकदम छान वाटले. इतके दिवस असलेला ताण लगेच निघून गेला जणू काही घडलेच नसल्यासारखे खूप मज्जा केली. तिसऱ्या दिवशी सकाळीमात्र निघताना आता सासरी जायचे ह्या कल्पनेनेच नको व्हायला झाले. सगळेच मला सोडायला आले होते त्यामुळे गाडीतपण खूप मज्जा केली. आश्चर्य म्हणजे गाडी काकाकाकूंच्या घरी न जाता माहेरी आली म्हंटल्यावर माझा आनंद गगनात मावेनासा झाला होता. आम्ही दारात आलो तर सगळे दाटीवाटी

करून उभे होते. घर आणि ही सगळी माझी माणसे मला भेटायला आतुर झाली होती. सगळ्यांना बघूनच मला इतके रडू आले आणि माझे बघून सगळेच रडायला लागले. आज्जीने सगळ्यांना बाजूला करून माझी आणि रेवाची दृष्ट काढून मला आत घेतले. सगळेजण रेवाला घ्यायला गेले पण इतक्या सगळ्यांना बघून रेवा खूपच घाबरून गेली व मधुराच्या कडेवरून उतरायलाच तयार होईना. बाबातर एका कोपऱ्यात उभे राहून रडत होते. इतक्या वर्षांनी त्यांची मनू त्यांना भेटत होती. मी त्यांच्याकडे गेल्यावर ते अगदी जोरजोरात रडायला लागले. त्यांना बघून सगळेच रडायला लागले. हे सगळे बघून रेवाने जो उच्च स्वर लावला तो बघून सगळे एकदम शांत झाले. तेव्हा मात्र आजोबांनी सगळ्यांना,"अरे इतक्या वर्षांनी दोघी भेटत आहेत तर आनंद व्यक्त करा, रडताय काय?" असे म्हंटल्यावर सगळेच एकमेकांची चेष्टा करायला लागले. घरातले वातावरण एकदम प्रफ्फुलीत झाले होते. मी येणार म्हणून २ दिवसाची सुट्टी घेऊन सगळेजण आले होते. दोन दिवस कसे गेले ते कळलेच नाही. खूप म्हणजे खूप मज्जा केली. विशेष म्हणजे मला अगदी चहाचा कपसुद्धा हातात मिळत होता आणि कोणीतरी तो उचलून न्यायचे. कोणीही मला काहीही काम लावत नव्हते. त्यामुळे तर आणखीन छान वाटत होते. रेवातर सगळ्यांच्यात इतकी मिसळली होती की माझ्याकडे फक्त कधीतरी येऊन फक्त पापा देऊन लगेच कोणीतरी घेऊन तिला जायचे. आईबाबांना तर काय करू आणि काय नको असे झाले होते. दोन दिवस वाऱ्यासारखे उडून गेले. सगळे संध्याकाळी निघून गेल्यावर मात्र

खूप उदास वाटू लागले. रेवातर मधुराला सोडतच नव्हती. कसेतरी तिला बाबांनी त्यांच्या कडेवरून घेऊन बाहेर फिरायला घेऊन गेले. तन्मय, मधुरा आणि मुलं निघाल्यानंतर मात्र घर आणखीनच सुने झाले होते पण सगळेतरी किती दिवस सुट्टी घेणार!

सगळे गेल्यावर मी आईला,"अजून मी इथे किती दिवस राहणार?" असे विचारल्यावर,"हेमंत त्यांच्याशी बोलला आहे त्यामुळे त्यांनी अजून एक आठवडा राहायला परवानगी दिली आहे". परवानगी हा शब्द ऐकल्यावर डोकेच फिरले. "मी काय त्यांची मालमत्ता आहे का? आपल्या घरच्या सुना/ लेकी कोणालाच हा त्रास नाही मग मलाच का?" असे विचारल्यावर मात्र आई शांतच बसली "हे बघ आठवडा राहायला मिळत आहे ना! मग ह्याचा त्रास करून न घेता हा आठवडा आपण खूप मज्जा करूयात!" मी त्यावर,"कुठली मज्जा करणार आई! पुढे काय होणार माहित नाही. इथे राहायला लागणार, का ड्रिमलँडमध्ये, का अजून कुठे दुसऱ्या देशात हेमंतला नोकरी मिळणार, काहीच माहित नाही. तू म्हणतेस मज्जा करू". त्यावर आईने,"हे बघ मना! जे होईल ते चांगलेच होईल ह्यावर विश्वास ठेव. सगळ्यांची लाडकी आहेस तू त्यामुळे सगळ्यांचे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत. त्यामुळे जे होईल ते चांगलेच होईल ह्यावर विश्वास ठेव" असे म्हंटल्यावर मी तिच्या मांडीवर डोके ठेवून झोपले. आईने मला थोपटवून थोपटवून झोपवले.

सासरी गेल्यावर ह्यावेळेस आज्जींनी,"तू जोपर्यंत इथे राहशील किंवा हेमंत येईल तोपर्यंत मी इथेच राहणार आहे". असे सांगितल्यावर मी अगदी निःश्वास सोडला. तो बघून काकूंनी."का ग! माझ्याबरोबर एकटीला राहायला नको वाटते का तुला?" असे म्हंटल्यावर आज्जींनी लगेच,"अग रेवाला दूध दिलेस का?' असे म्हंटल्याम्हंटल्या मी तिथून सटकले. तश्या काकू वाईट नव्हत्या पण त्यांना आपली सून पुराणकाळात जश्या सुना असायच्या तशी हवी होती. म्हणजे सकाळी सासूच्या अगोदर उठून चहा ठेवावा आणि हातात कप द्यावा, घरातली सगळी कामे सुनेने करावीत, सासरकडचे कोणीही कितीही छोटे असतील, त्यांनी काहीही बोलले तरी गुपचूप ऐकून घ्यावे, माहेरमाहेर करू नये, माहेरच्यांशी जास्त बोलू नये किंवा अगदी कधीतरी काही कार्यक्रम असेल तरच जावे, उगाचच फोनवर जास्त वेळ गप्पा मारू नयेत/ माहेरच्यांशीतर फक्त कामापुरतेच बोलावे......... अश्या एक नाही तर अनेक अपेक्षा ज्या मी कधीच पूर्ण करू शकत नव्हते. येऊन चार महिने होत आले तरीही त्याच्या नोकरीचे अजूनही काहीही झाले नव्हते. आठ दिवसात परमिट संपल्यानंतर त्याला तिथे राहतापण येणार नव्हते. सगळे प्रयत्न करूनही नोकरी न मिळाल्याने हेमंत भारतात परत आला.

तो आल्यानंतर काही दिवसांतच रेवाचा वाढदिवस होता. पहिल्या नातीचा वाढदिवस धुमधडाक्यात झाला पाहिजे हा विचार करून काकाकाकूंनी आम्हाला न विचारता तो कसा साजरा करायचा हे ठरवायला सुरुवात केली. हे सगळे ऐकून माझे डोकेच फिरले. मी सरळ आत निघून गेले. माझ्यामागून लगेच रेवा आत आली, बिचारीवर थोडी चिडचिड झाली माझी. तशीच मुसमुसत मोठी आज्जी मोठी आज्जी करत आज्जींकडे गेली. मी तशीच आत येऊन झोपून राहिले. रात्री खूप उशिरा माझा डोळा लागला तोपर्यंत हेमंत आतपण आला नाही. रेवापण आज्जींकडेच झोपली. सकाळी नाश्ता करताना काकांनी मला वाढदिवसाबद्दल काय वाटते हे विचारल्यावर मला वाटले हेमंतने त्या दोघांना माझे मत विचारायला सांगितले असेल. विचार करूनच जरा बरे वाटले. माझे काही चालणार नाही हे माहित असल्यामुळे मी काही बोलले नाही तेव्हा आज्जी म्हणाल्या,"रेवाचा वाढदिवस तू म्हणशील तसाच आपण साजरा करूयात". हे ऐकून मी बोलायला सुरुवात केली,"अजून रेवा लहान आहे, तिला काहीच कळत नाहीये. तेव्हा आपण ती थोडी मोठी झाल्यावर अगदी पुढच्या वर्षीपासून तिचा वाढदिवस दणक्यात साजरा करू शकतो. तिचा पाचवा वाढदिवस एकदम दणक्यात करू शकतो. आता हेमंतला नोकरीपण नाहीये मग कशाला एवढा सगळा तामझाम करायचा?" माझे बोलून पूर्ण व्हायच्या अगोदरच काकूंनी लगेच सुरुवात केली,"आमची पहिलीच नात आहे. आता घरात कुठले मोठे कार्य व्हायची शक्यता खूप कमी आहे. तिच्या

लग्नापर्यंत आम्ही असू की नाही माहित नाही. आम्हाला आमच्या नातीचा वाढदिवस जोरात करावा वाटतो त्यात गैर काय आहे तेच कळत नाहीये मला!" झाले.. सगळेच शांत बसले. हेमंत तर खाली बघून पेपर वाचत होता, काहीही बोलला नाही. मग काकाच म्हणाले,"हे बघ मानसी तुला पाहिजे तो हॉल आणि तुला पाहिजे तशी सजावट आपण करूयात. वाढदिवस जोरदारच करायचा!" हे सांगून निघून गेले. तेवढातरी अधिकार मिळाला आहे म्हणून आनंद व्यक्त करू की माझी मुलगी असून मी कुठलाच निर्णय घेऊ शकत नाही आणि नवरा काहीच बोलत नाही म्हणून दुःख व्यक्त करू, हेच कळत नव्हते. चला नवरा नाही पण आज्जीतरी माझ्याबरोबर आहेत ह्या विचाराने जरा बरे वाटून कामाला लागले.

वाढदिवसासाठी पाण्यासारखा पैसा ओतल्याने तो तर जोरदार होणारच होता. मीपण अगदी कुठलाही विचार न करता एकदम महागाचा हॉल ठरवून सजावटपण एकदम छान केली. लग्नापेक्षाही जास्त तामझाम होता. आलेला प्रत्येकजण खुश होऊन जात होता. हेमंतबद्दल कोणी काही विचारले तर काकू सगळ्यांना,"एकच मुलगा आहे आम्हाला. आता आम्हाला दुसरं कोण आहे? त्यात रेवाचीपण खूप सवय झाली आहे त्यामुळे परत जाऊ नको म्हणून मागे लागलोय. बघूया ऐकतात का?" असे सांगत होत्या त्यावर मी फक्त हसून त्यांच्याकडे बघत असे.

काकांनी त्यांचा मित्र काळेकाकांबरोबर हेमंतच्या नावाने भागीदारीत एक धंदा सुरु करून हेमंतसाठी रोजगार उपलब्ध करून दिला होता. स्वतःचाच धंदा असल्याने साहेब सावकाश उठून सगळे आवरून ११ वाजता कामाला जायचे. परत दुपारी १ वाजता जेवायला घरी येऊन वामकुक्षी घेऊन आरामात २.३० वाजता जायचे. संध्याकाळी मात्र उशिरापर्यंत थांबून काम करायचे. रोज काका सकाळी हेमंत लवकर कामाला जात जा म्हणून ओरडायचे पण काकू लगेच,"रात्री उशिरा आलाय, थोडातरी आराम करू दे त्याला", असे म्हणून लगेच पदराआड घालायच्या. आमचे रोजचे रुटीन बसले होते, मीपण एका ठिकाणी नोकरीला जात होते, रेवाला दिवसभर सांभाळण्यासाठी माधुरी नावाची नवीनच लग्न झालेली मुलगी यायची. खूप गोड होती. मुख्य म्हणजे तिचे आणि रेवाचे चांगले गुळपीठ जमले होते त्यामुळे मी रोज बिनधास्तपणे कामाला जाऊ शकायची.

रेवा ३ वर्षांची झाली होती त्यामुळे तिला शाळेत घालायचे ठरले. जवळच एक छान बालवाडी होती. मी रेवाला तिथेच घालायचे ठरवले होते पण मी आणि आज्जी सोडून बाकी सगळ्यांना तिला प्लेस्कूल मध्ये पाठवायचे होते. इथेपण मी सगळ्यांपुढे हरले होते. रेवा शाळेत गेल्यावर तिची माधुरीताई घरी मदत करायला लागली त्यामुळे माझा भार खूपच कमी झाला. असेच दिवसांमागुन दिवस जाऊन रेवानंतर निशांतचा जन्म होऊन

तोपण आता ५ वर्षाचा आणि रेवा १० वर्षाची झाली. घरी सगळेजण खुश होते. आमचे कुटुंब पूर्ण झाले होते. माझी नोकरी, दोघांची शाळा, माधुरीचे त्यांना सांभाळणे, आजींनी त्या दोघांचे लाड करून संस्कार लावणे, काका रिटायर होऊन त्यांचे योग, मित्रांबरोबर मजा करणे हे रुटीन चालू होते तर काकू अजूनही हेमंतमध्ये गुंतल्या होत्या. हेमंतबद्दल काही न बोललेलेच बरे!

जसेजसे दिवस जात होते तसतसे हेमंतचे घरातील लक्ष कमी होत होते. साहेब कायम स्वतःच्याच नादात असायचे. घरी खर्चालासुद्धा पैसे देत नसत. तसेही भारतात परत आल्यावर आमच्या दोघांमधील संवाद खूप कमी झाला होता, तो दिवसेंदिवस कमी होत होत बंदच झाला होता. हळूहळू मला त्याच्यातला फरक प्रकर्षाने जाणवायला लागला. कोणाकडे बोलताही येत नव्हते.

खूप विचार करून एक दिवस हेमंतशी बोलायचं हा निर्णय घेऊन घरी काहीतरी कारण सांगून मी त्याला आज बाहेर घेऊन आले. मी सरळ बोलायलाच सुरुवात केली." हे बघ हेमंत, आपण ड्रिमलँडहुन इथे येऊन जवळपास १० वर्ष होत आली आहेत. सुरुवातीला आपण थोडेतरी बोलायचो- गप्पा मारायचो पण गेल्या ४-५ वर्षात आपले बोलणेतर कमी झालेच आहे पण आपल्या नात्यात नवराबायको म्हणून असे काहीच राहिले

नाहीये. तुला असे एका घरात, एका खोलीत त्रयस्थासारखे राहायचा काहीच त्रास होत नाही का रे? एवढ्या तुझ्या बाजूने नेहमी भांडणाऱ्या काकूपण तुला काय झाले आहे हे मला विचारत आहेत. नक्की काय कारण आहे तू मला स्पष्ट सांगशील का?' हेमंतने सगळे गुपचूप एकही शब्द न बोलता सगळे ऐकून घेऊन,"असे काही नाहीये, कामाचा ताण खूप वाढला आहे आणि त्याचाच मला खूप ताण येत आहे त्यामुळे मला घरी लक्ष द्यायला होत नाही. कामावरून रात्री आल्यावर खूप दमतो, त्यामुळे लगेच झोपून जातो." हे ऐकून मी,"अरे परवाच काळे काका घरी आले होते. ते काकांशी बोलत असताना नेमके मी त्यांना ऐकले आहे. म्हणूनच मी तुला इथे बोलायला बोलावले" हे ऐकून तो थोडा घाबरून लगेच,"काळेकाका कसे आहेत माहित नाही का तुला! नुसती तक्रार करायचीच सवय आहे त्यांना. तू कधीपासून चोरून ऐकायला लागलीस?" असे म्हणून माझ्यावरच उलटला. मला सुरुवातीला काय प्रतिक्रिया द्यावी तेच कळले नाही पण लगेच शांत होत,"अरे मी हे दुसऱ्यांदा ऐकतिये. ६ महिन्यांपूर्वीपण ते घरी आले होते. तेव्हापण मी त्यांना बोलताना थोडेफार ऐकले आणि मला खूप संशय यायला लागला होता. परवा ते घरी आले तेव्हामात्र अगदी जाणूनबुजून मी त्यांचे सगळे बोलणे चोरून ऐकले.. हो चोरूनच ऐकले कारण काकांना खूपदा विचारूनही ते मला नीट उत्तर देत नव्हते. हे बघ तुला मला काही सांगायचे असेल तर तू माझ्याशी स्पष्टपणे काहीही बोलू शकतोस. माझी काहीही ऐकायची तयारी आहे." हे ऐकून तो थोडासा

काहीतरी बोलायचा प्रयत्न करत आहे असे मला वाटले पण तो लगेच शांत बसला. बिल देऊन लगेच," उशीर झाला आहे, मुलं आणि आईबाबा वाट बघत असतील, चल निघुयात" असे म्हणून लगेच उठवायला लागला. माझे डोकेच फिरले, वाट्टेल तशी मी त्याला बडबड केली. काहीही न बोलता त्याने सगळे गुपचूप ऐकून घेतले. मी तरी एकटी किती आणि काय बोलणार. बडबड करून शांत झाल्यावर तो तिथून उठला, मीपण इलाज नसल्याने तशीच उठून आम्ही घरी आलो. सगळेच झोपले होते त्यामुळे आम्हीपण लगेच झोपी गेलो. आताशा रेवा आणि निशांत आज्जींकडे झोपत असल्याने एकटीला झोपच येत नव्हती, हेमंत खोलीत असून नसल्यासारखाच होता. खुपवेळाने झोप लागली. त्या दिवसानंतर मात्र रोज सकाळी देवापुढे हात जोडताना देवा हे कोडे उलगडव म्हणून प्रार्थना करत होते. एकमात्र खरे की देवाने माझ्या झोळीत रेवा आणि निशांत सारखी दोन नक्षत्र पदरात टाकली आहेत. दोघेही दिसायला तर गोड होतीच पण खूप हुशारपण होती.

साधारण ६-७ महिन्यानंतर ऑफिस सुटल्यानंतर एका मैत्रिणीने सगळ्यांना खूप आग्रह करून रेस्टॉरंटमध्ये खायला नेले होते. खाऊन घरी निघताना एकदम लक्षात आले की माझी एक जुनी मैत्रीण इथल्या भागात राहते. इथपर्यंत आलोच आहोत तर तिला भेटून जावे हा विचार करून सगळ्यांना टाटा करून मी तिच्याकडे जायला निघाले. तिच्या घरी गेल्यावर

घर उघडेच दिसले म्हणून थोडेसे उघडले आणि माझा तिथे जागच्या जागी पुतळा झाला होता.

मी कधी आणि कशी घरी आले तेही मला कळलेच नाही. पण मी काहीच बोलत नसल्याने सगळेच घाबरले होते. अगदी आईबाबापण घरी आले होते. सगळेचजण मला बोलते करायचा प्रयत्न करत होते. डॉक्टरांनी मला इंजेक्शन देऊन कुठला तरी धक्का बसला आहे, थोडा वेळ द्या सावरायला म्हणून सांगून गेले. साधारण २-३ दिवस मी अश्या स्थितीतच काढले. रोज डॉक्टर येऊन जात होते. एखाद्या लहान बाळाचे करावे असे माझे सगळे आई करत होती. निशांत आणि रेवा दोघेही खूप घाबरले होते. मला काय झाले हे कळत नसल्याने घरातल्या सगळ्यांनाच संभ्रम पडला होता त्यामुळे त्या दोंघाकडे कोणाचेच लक्ष नव्हते. पण माधुरीने मात्र त्या दोघांना खूप छान रीतीने सांभाळले. तिच्या मुलांना घेऊन ती इकडेच राहायला आली होती. शाळेतून आल्यावर माझ्याकडे थोडावेळ घेऊन येऊन नंतर त्यांना खायला घालून बागेत घेऊन जायची, त्यांना खुश ठेवायचा खूप प्रयत्न करायची, खूप नशीबवान आहे मी मला माधुरीसारखी सखी मिळाली जिने मला एकदाही काय झाले हे न विचारता कोणी माझ्याबरोबर नसेल तेव्हा प्रेमाने पाठीवरून हात फिरवत राहायची.

बाबा माझ्यासाठी जेवणाचे ताट घेऊन आले, पाणी आणायचे विसरले म्हणून ताट तिथेच ठेवून पाणी आणायला गेले आणि नेमका हेमंत आत आला. त्याला बघितले .... ताट हातात घेऊन त्याला जोरात फेकून मारले. हेमंतचा जोरात ओरडण्याचा आणि ताट पडल्याचा आवाज ऐकून सगळेच आत धावत आले. हेमंतला कपाळाला खोच आलेली बघून काकू एकदम पिसाळल्या,"एकतर काही बोलत नाहीये. घुम्यासारखी बसून राहिली आहे, वर हेमंतला ताट फेकून मारते...." त्यांना जास्त बोलू न देता हाताला धरून तिथून आज्जी घेऊन गेल्या. इतकावेळ स्तब्ध होऊन उभा राहिलेला हेमंतपण लगेच बाहेर पळाला. आईबाबा माझ्याजवळ येऊन बसले नि माझा सगळा बांध सुटला. मी जोरजोरात रडायला लागले. रडताना नेहमी शांत करणारे बाबा ह्यावेळी मात्र थोडे आनंदी झाले होते. खूपवेळ रडून मी हळूहळू शांत होतानाच गोळीचा असर होऊन झोपी गेले. थोड्यावेळाने जाग आली आणि मला माझा भूतकाळ डोळ्यासमोर आला. सगळे डोळ्यासमोरून तरळून गेले, तशीच उठून बसायचा प्रयत्न करू लागले.

आईने मला आधार देऊन उठून बसवले, आजूबाजूला बघितले तर काका, आई बाबा तिथेच बसून होते. मी उठलेले बघून बाबांनी लगेच पाणी दिले. आईने माधुरीला आवाज दिला तर ती लगेच चहा घेऊन आली. मला बळजबरीने चहा प्यायला लावला पण खरेच चहा पिऊन जरा बरे वाटले.

मी आपली खाली मान घालून चहा पिऊन सगळ्यांकडे बघितले तर तिघांच्याही डोळ्यात प्रश्नचिन्ह होते. बाबांनी सहज वेगळ्या गप्पा मारायला सुरुवात केली त्यात काका व आईपण सहभागी होऊन छान गप्पा मारत मला सामील करायचा प्रयत्न करत होते. कोणाला माझ्याकडून आत्ताच काहीही ऐकायचे नव्हते. माझा राग आणखीनच वाढला आणि मी त्यांना बाहेर जायला सांगितले तोपर्यंत तन्मय तिथे आला. त्याला घट्ट मिठी मारून मी जोरजोरात रडायला सुरुवात केली. त्याने मला हळूहळू थोपटून शांत केले. मी हळूहळू त्याच्याशी बोलायला सुरुवात केली.

लग्न ठरले आणि मी हेमंतवर मनापासून प्रेम करायला लागले. इतकी रागीट, फटकळ असूनही केवळ नवरा चांगला आहे म्हणून मी काकूंचा त्रास सहन केला. नवीन लग्न झाल्यावर सगळे सुरळीत चालू होते पण रेवा झाल्यानंतरच मला हेमंतमध्ये थोडा फरक दिसायला लागला होता, खूप तुटक वागायला लागला होता. मी जेव्हा त्याच्याशी ह्या विषयावर बोलले तेव्हा त्याने चिडूनच मला शांत केले होते. रेवा लहान असताना माझ्या मनात असे विचार कसे येऊ शकतात? मी तिच्याकडे पूर्ण लक्ष द्यायचे सोडून डोक्यात वेगळ्याच कल्पना कशी करते? असे खूप काही बोलून मलाच ओशाळवाणे केले होते. हे बोलणे ऐकून मलाच कुठेतरी अपराध्यासारखे वाटायला लागले. मीच वेडी आहे, एका गोड मुलीला जन्म देऊन तिच्याकडे पूर्ण लक्ष न देता मी तिचा पूर्ण विचार करून समजूतदारपणे

वागणाऱ्या नवऱ्याचा संशय घेत आहे असा सगळा विचार करून खूप ओशाळवाणे झाले. मनात येणारे सगळे विचार झटकून मी रेवाकडे पूर्ण लक्ष द्यायचे ठरवून तिच्यात गुंतले. भारतात परत आलो त्यावेळी नोकरी, इथे येऊन सगळयांमध्ये मिळूनमिसळून , तडजोड करून राहायचे.. बरेच ताण होते. त्यावेळी मनाने जवळ येण्याऐवजी आम्ही दूरच होत चाललो होतो. मी खूपदा प्रयत्न करत होते पण कधी काही बोलायला लागलो तर काकू लगेच मध्ये यायच्या मग जवळ येण्याऐवजी माझी चिडचिड होऊन त्यांनी कसे त्याला इतके परावलंबी केले आहे, त्यामुळे तो कसा आळशी झाला आहे, इथे येऊन इतके दिवस झाले तरीही नोकरी शोधत नाहीये, धंदा करायला लागल्यावर कसा वेळेवर न जाता आपल्या सोयीने जात आहे वगैरे बोलले जाऊन भांडणेच होत होती. आम्ही बोलताना काकू हे सगळे ऐकायच्या मग मीच कशी ह्या सगळ्याला जबाबदार आहे हे सांगून सगळा दोष माझ्यावर यायचा. असे करून करून आमचे बोलणेच बंद झाले. रेवा थोडी मोठी झाल्यावर मला दुसरे बाळ हवे होते म्हणून आम्ही तेवढ्यापुरतेच जवळ आलो आणि निशांतची लगेच चाहूल लागली. त्यानंतर अजूनही आम्ही एकमेकांच्या जवळ आलो नाही की प्रेमाने बोललो नाही. खूप घुसमट होत होती माझी! कोणाकडे आणि काय बोलणार मी हे सगळे. तुम्ही सगळेजण जेव्हा मला चेहरा उतरलेला, नेहमी थकलेली का दिसते, असे विचारल्यावर काय सांगणार? मग ऑफिसमध्ये काम खूप आहे म्हंटल्यावर काकूंनी लगेच,"तुला नोकरीमुळे त्रास होतोय आणि सगळेजण आम्ही तुला

त्रास देतोय असे म्हणत आहेत. काही गरज नाही नोकरी करायची, सोडून दे," अशी कटकट करायला सुरवात केली मग मात्र मी हे कारण सांगणे बंद करून भरपूर मेकअप करून सगळे लपवायचा प्रयत्न करूनही काही उपयोग झाला नाही. एक दिवस संध्याकाळी रेवा, निशांत बरोबर बागेत खेळायला गेले आणि मी सगळे ताणतणाव विसरून तिथे मनसोक्त त्यांच्याबरोबर खेळले. त्यादिवशी खूप दिवसांनी मला रात्री गाढ झोप लागली. आता मी माझ्या दोन पिल्लांबरोबर मज्जा करणार हे ठरवून टाकले. माझे आयुष्य ह्या दोन पिल्लांमुळे परत रस्त्यावर यायला लागले. मी आणि हेमंत एकाच घरात, रात्री एकाच खोलीत राहून अनोळखी असल्यासारखे राहत होतो. विशेष म्हणजे मला त्याचा आता त्रास पण होत नव्हता.

एकदा काळेकाकांना काकांबरोबर (हेमंतचे वडील) बोलताना ऐकले," पहिल्या दिवसापासूनच हेमंत सकाळी उशिरा कामाला येतो, खूपदा सांगूनही त्याने ऐकले नाही नंतर मला त्याची सवय होऊन गेली, मी दुर्लक्ष करायला शिकलोही. पण गेले दोन वर्षे तो दुपारी जेवायला जातो तो परत येतच नाहीये. आपण ह्याबद्दल खूपदा बोललो आहे. मला माहित आहे तू त्याच्याशी खूपदा बोलला आहेस तरीही तो सुधारत नाही पण हे सगळे नको वाटत आहे रे. मला माहित आहे तूला त्याच्याकडून तो इतका वेळ येईल असेही वाटले नव्हते पण तरीही मला असे वाटत आहे की आपण मानसीचे नुकसान करत आहोत". त्यावर काकांनी मला सांगण्याऐवजी

काळेकाकांनाच,"अरे मी हेमंतला जन्म दिला आहे. तो कसा आहे माहित आहे मला. तो असा आळशी, बेजबाबदार व्हायला बऱ्यापैकी त्याची आईच जबाबदार आहे. कधीही त्याला ओरडायचो, शिक्षा करायला जायचो तेव्हा ती त्याला पदराआड घालून मीच कसा चुकीचा आहे, तो अजून लहान आहे, शिकेल हळूहळू असे करून मलाच बोलायची. शेवटी मी कंटाळून आता त्याच्याकडे तूच बघ म्हणून लक्षच काढून घेतले. आतापण मी त्याच्याशी खूपदा बोलायचा प्रयत्न केला पण आत्तासुद्धा त्याच्या आईने मध्ये येऊन तो खूप दमतो म्हणून मीच त्याला पाठवत नाही म्हणून सांगितले. काय करू मी आता तूच सांग". असे बोलून तो विषय संपवला.

मी संध्याकाळी घरी येते तेव्हातर हा घरी नसतो. ऑफिसमध्ये काम खूप असते मग रात्री घरी उशीरा दमून आल्यामुळे न जेवताच एका मिनिटात झोपायचा. मग मी यायच्या वेळेला हा घराबाहेर जातो का? काय कारण असेल? ह्याचा विचार परत डोक्यात सुरु झाला. हेमंतशिवाय चांगले आयुष्य जगायला सुरुवात केली असली तरीही तो निदान रात्री दिसायचा, सकाळी ऑफिसमध्ये जाईपर्यंत तिथेच असायचा, महत्वाचे म्हणजे तो माझा नवरा आहे त्यामुळे असे मी त्याला सोडून देऊ शकत नव्हते. बरं कोणाला काही विचारायची सोय नव्हती, काकूंना काही बोलले असते तर त्या माझ्याच अंगावर आल्या असत्या. काकांबरोबर बोलायचा प्रयत्न

केला तर त्यांनी,"काळजी नको करुस, दुर्लक्ष कर त्याच्याकडे," असे सांगून मला काही बोलूनच दिले नाही. मग मी आडूनआडून आजींना, माधुरीला विचारायला सुरुवात केली तेव्हा गेली ३-४ वर्षे हेमंत अगदी क्वचित काकू खूप मागे लागल्या तरच दुपारी जेवायला येतो, असे सांगितले. मला आता संशय यायला सुरुवात झाली. मला एकदम आठवले की गेली कित्येक वर्षे काकू मला नेहमी कुठलातरी विषय काढून अप्रत्यक्षपणे हेमंतबद्दल विचारत होत्या. सुरुवातीला मला विचित्र वाटत होते पण आमच्या दोघींचे संबंध अजिबात चांगले नसल्यामुळे मी सरळसरळ दुर्लक्ष करत होते. आता हा सगळा विचार करून कुठेतरी पाणी मुरतंय असे वाटायला लागले होते पण काहीच करू शकत नव्हते. परत सगळे विसरायचा प्रयत्न करून ऑफिस, मुलं आणि घरातल्या कामांमध्ये स्वतःला गुंतून गेले. पण परत काही महिन्यांपूर्वी काळेकाकांनी येऊन हेमंतबद्दल बोलायला सुरुवात केली त्यावेळी काकांनी काळजी व्यक्त केली. हेमंतशी काकांनी खूपदा बोलायचं प्रयत्न करूनही तो त्यांना दाद देत नव्हता. काकूंनापण आजकाल तो भाव देत नाहीये, त्यापण त्याच्या काळजीने खूप त्रस्त आहेत, पूर्ण घरातले वातावरण ह्या मुलामुळे खराब झाले आहे.... असे खूप सारे ऐकून मलामात्र काय करावे सुचत नव्हते. बरं ते माझ्याशी त्याविषयी बोलत नसल्याने मलापण काही बोलता येत नव्हते. रेवा आणि निशांत दोघांना हेमंतची सवयच नसल्याने आणि माधुरीमुळे त्या दोघांना ह्याचा कुठलाच ताण किंवा

त्रास जाणवला नाही. मलामात्र मनातल्या मनात एकटीच कुढण्याशिवाय दुसरा कुठलाच पर्याय नव्हता.

त्यानंतर मात्र मी हेमंतशी समोरासमोर बोलायचे ठरवले. घरी एकांतात बोलता येणारच नव्हते त्यामुळे तो खूप टाळाटाळ करत असतानासुद्धा मी त्याला बाहेर भेटायला भाग पडले. त्याच्याशी बोलल्यामुळे काही कळण्याऐवजी उलट मला त्रासच जास्त झाला आणि ह्याच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही म्हणून मी त्याच्याशी परत बोलले नाही. कितीही प्रयत्न केला तरी मनातून मात्र जात नव्हते. घरी काकाकाकूंनापण खूप काळजी लागली होती. पण कोणी काहीच करू शकत नव्हतो.

३-४ दिवसांपूर्वी ऑफिसमधल्या मैत्रिणींनी खूप आग्रह केला म्हणून त्यांच्याबरोबर उपहारगृहामध्ये गेले होते तिथेच जवळ माझी कॉलेजमधली मैत्रीण राहते म्हणून तिथून तिला भेटायला गेले. गेलेतर दार नुसतेच लोटलेले होते. मी तिला सरप्राईझ देण्यासाठी म्हणून दार उघडले आणि..............

मी परत जोरजोरात रडायला सुरुवात केली. मैत्रिणीकडे गेली आणि हिला इतका धक्का कसा बसला, मग हेमंतला तिने ताट फेकून का मारले ह्या विचाराने काका, आई बाबा व तन्मय संभ्रमात पडले. पण कोणी काहीच

न बोलता शांत बसून होते. माधुरी सगळ्यांना चहापाणी घेऊन आली. आईने माधुरीला मुलांना घेऊन खाली जायला सांगितले. तोपर्यंत माझे रडूपण थोडे कमी झाले होते. इतका मोठा धक्का बसला होता मला त्यातून सावरणे शक्यच नव्हते. पण तरीही मी बोलायला सुरुवात केली.

मी दार उघडले आणि सोफ्यावर कोणीतरी पूर्ण नग्न अवस्थेत कोणावरतरी झुकला होता. दाराचा आवाज आल्यामुळे त्या व्यक्तीने लगेच मागे वळून पाहिले तर तो हेमंत होता. त्याला बघून मला धक्काच बसला. लग्न झाल्यानंतर ३-४ वर्षांपासूनच मला ह्याचे दुसऱ्या मुलीवर प्रेम आहे असे सारखे वाटत होते पण हा विचार मनात आला की मीच मूर्ख आहे म्हणून असा विचार मीच करू शकते म्हणून स्वतःलाच झापायची. त्यामुळे कुठेतरी मला वाटत होते ते खरे आहे असे वाटेपर्यंतच हेमंत मला बघून गडबडून सरळ उभा राहिला आणि सोफ्यावर एक माणूस पूर्ण नग्न अवस्थेत असलेला मी बघितला. पुढे काय झाले मला काहीच माहित नाही.

मी परत जोरजोरात रडायला सुरुवात केली होती. कोणी काहीच बोलत नव्हते. सगळेचजण सुन्न झाले होते. कोणाला काय बोलावे हेच कळत नव्हते.

दुसऱ्यादिवशी सकाळीसकाळी आईने माधुरीला सांगून मुलांची बॅग भरायला सांगितले आणि तिने माझी बॅग भरून मुलांना व मला घेऊन तन्मय, आईबाबा बाहेर आले. काकाकाकू, आज्जींना खूप वाईट वाटत होते पण कोणाला काय बोलावे तेच कळत नव्हते. आम्ही सगळेजण काहीही न बोलता गाडीत जाऊन बसलो. माधुरी तिच्या व माझ्या मुलांना घेऊन तन्मयच्या गाडीत बसली व आम्ही सगळे माहेरी निघून आलो.

मला खूप बरे नाहीये म्हणून मानसी आणि मुलांना घरी घेऊन आलो आहोत, असे घरी सगळ्यांना सांगितले. माधुरीला नक्की कारण माहित नसले तरी तिला हेमंतचे कुठल्यातरी मुलीबरोबर चक्कर आहे असे वाटत होते. तरीही ती कोणालाही एक शब्द बोलली नाही. तिच्या नवऱ्याची समंती घेऊन तिच्या मुलांना घेऊन इकडे राहायला आली होती. खूप मोठे घर आणि सांभाळायला खूपजण असल्यामुळे मुलं खूप खुश होती. माधुरी माझ्याकडे पूर्ण लक्ष देत होती. २ दिवस राहून तन्मय परत मुंबईला गेला. मी ८-१० दिवस नुसती जेवण्यापुरती उठून बसायची. बाकीच्या वेळेत नुसती शून्यात बघत बसायची. घर मोठे असल्याने सारखे कोणीनाकोणी येऊन जायचे पण मी कोणाशीच बोलत नसल्याने नक्की काय झाले ते कोणालाच कळत नव्हते. हळूहळू आईने मला सकाळी चहासाठी बाहेर आणायला सुरुवात केली. संध्याकाळी टीव्ही लावून तो बघायला बाहेर घेऊन यायला लागली. मी खूप विरोध केला पण तिने शांतपणे बोलून, समजावून मला

बाहेर घेऊन आली. शेवटी कितीही दुःख असले तरीही माणूस काही दिवसांनी परत सामान्य होतोच, किती दिवस शांत बसणार. त्यात आमचे घर म्हणजे आनंदाचा झराच होता. काही दिवसांनंतर सगळेजण रात्री जेवणानंतर आमच्या घरी एकत्र जमू लागले. गप्पा मारून वातावरण खूप हलके होत होते आणि मीपण हळूहळू थोडेथोडे हसू येऊन सगळयांच्यात रुळायला लागले. पण तरीही बसलेला धक्का इतका मोठा होता की त्यातून सावरायलाच होत नव्हते. इतके दिवस झाले तरीही मला सासरहून कोणीच भेटायला आले नव्हते. कोणी हेमंतचा विषय काढला की तो टाळला जात होता त्यामुळे घरी सगळयांना संशय यायला लागला होता. सगळयांच्या लक्षात यायला लागल्यावर एकानेही परत तो विषय काढला नाही. सगळेजण माझे मन रमवायचा प्रयत्न करत होते.

साधारण १ महिन्यांनी बाबांनी "आता परत नोकरीला जायला लाग," म्हणून सांगितल्यावर मला खूप मोठा धक्का बसला. "तुम्हाला माझा इतका भार होत असेलतर मला इथे का आणले? तिथेच सोडायचे होते....." असे बरेच मी जवळजवळ अर्धा तास बडबड करत होते. आईबाबांनी एकही शब्द तोंडातून न काढता एकदम शांत बसले होते. मी रात्री न जेवताच तशीच झोपले. आपले आईबाबा आपल्याशी असे वागू शकतात हे स्वप्नातदेखील आले नव्हते त्यामुळे हा दुसरा धक्का आपण सहन करू शकू की नाही हेच कळत नव्हते. रात्रभर १ मिनिट डोळयाला

डोळा लागला नाही. सकाळी आई चहा घेऊन आली तेव्हा सकाळ झाली ही जाणीव झाली. मी चहा प्यायला नकार दिला. आईने कप समोर धरल्यावर,"आई चहा बाजूला कर नाहीतर मी फेकून देईन. तुम्हाला माझा त्रास होत आहे. तुम्ही मला जन्म दिला आहे म्हणून थोडेदिवस इथे ठेवून घ्या. मी एकदा सोय बघितली की मुलांना घेऊन मी लगेच निघून जाईल", माझी ही बडबड आईने शांतपणे ऐकून घेऊन चहाचा कप तिथेच ठेवून गेली. खूप इच्छा होऊनही मी चहा घेतला नाही. नंतर माधुरी नाश्ता आणि चहा घेऊन आली,"ताई कितीही रागवा पण एवढा नाश्ता आणि चहा प्या. तुम्हाला असे बघून मुलंपण घाबरली आहेत. त्यांच्यासाठीतरी तुम्हाला लवकर बरे व्हावे लागणार आहे." तिचे हे बोलणे ऐकून तिच्याच गळ्यात पडून रडून घेतले. चहा, नाश्ता करून आता पुढे काय करायचे, ह्याचा विचार करू लागले. इथून दुसरीकडे राहायला जावे लागेल हेच मनात आले नव्हते. त्यामुळे आता मुलांना घेऊन कुठे जायचे? त्यांच्या शाळेचे काय करायचे? त्यांना बऱ्याच अभ्यासेतर उपक्रमात घातले होते त्याचे काय करायचे? ह्यासगळ्यासाठी पैसा कुठून आणायचा? आत्तापर्यंत सगळे खर्च काकाच बघत होते. आता मी एकटी काय आणि कसे करणार? सगळ्या गरजा कश्या भागवणार? माधुरीकडे राहायला जावे का? पण तिचे घर खूपच छोटे होते, हे सगळे मुलांच्या अंगवळणी कसे पडणार? त्यापेक्षा परत हार मानून काकाकाकूंकडे जाऊयात का? मुलांचे आबाळ तरी होणार नाहीत! असे

असंख्य विचार मनात येत होते. परत ३-४ दिवस नुसतीच झोपून राहिले होते.

हळूहळू बाबांचे बोलणे लक्षात यायला लागले. संध्याकाळी बाबा घरी आल्यावर त्यांना मी स्वतःहूनच हाक मारली, बिचारे घाबरतच माझ्यापाशी येऊन बसले. त्यांच्या खांद्यावर डोके ठेवून बसल्यावर त्यांनी मला जवळ घेतले. त्यांच्या डोळयातले पाणी माझ्या ड्रेसवर पडत होते. दोघेही काही न बोलता खूप वेळ नुसतेच शांत होतो. मी दुसऱ्यादिवसापासून ऑफिसला जायला सुरुवात केली.

काही दिवस राहून माधुरी परत घरी गेली होती. इथे तशी माधुरीची गरज पडत नव्हती. घरातले कोणीही रेवा, निशांतला शाळेत सोडायचे, कोणीतरी घेऊन यायचे. संध्याकाळी कुठलीतरी काकू फिरायला, बागेत घेऊन जायची. दिवेलागणीला पणजोबा, पणजी सगळ्या नातवंडांना घेऊन श्लोक म्हणायचे. तरीही आईबाबांनी तिला रोज तिचे आवरले की नंतर ये असे सांगून पगाराशिवाय बसभाड्याचेपण पैसे दिले. ती आमच्या घरची एक सदस्यच झाली. तिची मुलंपण सुट्टी असली की मागे लागून तिच्याबरोबर यायची.

आम्ही तिघेजण आता इथे रुळलो होतो. हेमंतने केलेल्या कृत्याचा मला आता त्रास न होता त्याची किळस वाटत होती पण तरीही त्याचा विचार मनातून जात नव्हता. इतकी वर्ष त्या घरात राहत होतो त्यामुळे नाही म्हंटले तरीही काकाकाकूंची आणि जास्त करून आजींची खूप आठवण येत होती. महत्वाचे म्हणजे आता हे घर माझे राहिले नव्हते. सगळयांनी मला, मुलांना इथे सामावून घेऊन घरातलेच एक केले होते, तन्मय, मधुरा मुलांना घेऊन दर शनिवार, रविवार राहायला यायचे त्यावेळी आम्ही फिरायला किंवा बाहेर जेवायला जायचो, काहीतरी वेगळे करायचो पण कितीही म्हंटले तरीही ते घर आता मला माझे वाटत नव्हते. का माहित नाही पण नको वाटायचे तिथे राहायला. माझी आर्थिक स्थिती इतकी चांगली नव्हती की आम्ही तिघे वेगळे राहू शकू. हा सगळा विचार करून मी तिथेच रमायचा प्रयत्न करत होते.

साधारण ३-४ महिन्यांनी अचानक एक दिवस संध्याकाळी काकाकाकू दोघेजण आले. आमचा छान नित्यक्रम सुरु होता मग आता हे का आले? अजून त्रास देऊन झाला नाही वाटते, असे मनात अनेक विचार सुरु होते. आईने सगळयांना चहा ठेवून दोन्ही मुलांना आजीकडे सोडून आली. चहा देऊन आम्ही तिघे त्यांच्याकडे स्तब्धपणे बघत होतो. त्या दोघांनापण काय

बोलावे हे कळत नव्हते. खुपवेळ तसेच बसून काकांनी बोलायला सुरुवात केली.

आमचे लग्न झाल्यानंतर खूप वर्ष मुलंच होत नव्हते. खूप नवस उपवास करून नंतर हेमंतचा जन्म झाला. परत दुसरे मुलं झालेच नाही. लहानपणी हेमंत सारखा आजारी पडायचा त्यामुळे आम्ही त्याला तळहाताच्या फोडासारखे जपत होतो. त्यातूनच त्याचे लाड करणे सुरु झाले. त्याने कुठलीही गोष्ट मागितली आणि ती घरी आली नाही असे कधीच झाले नाही. हिनेतर स्वतःचे आयुष्य म्हणजे हेमंत असे करून घेतले होते. ना कुठे बाहेर जायची, ना मैत्रिणीबरोबर कुठे बाहेर फिरायला, चित्रपट बघायला, तो शाळेत जाईपर्यंत अगदी हळदीकुंकवालासुद्धा जाणे बंद केले होते. त्याला एकट्याला सोडून कुठे म्हणजे कुठेच जायची नाही.

हेमंतने शाळेत जायला सुरुवात केल्यावर सगळी मुलं त्याला चिडवायची, त्रास द्यायची. त्यावेळी माझे न ऐकता हिने स्वतःहून निर्णय घेऊन त्याच्या २-३ शाळापण बदलल्या. पण सगळीकडेच हीच स्थिती असल्याने शेवटी आम्हाला शाळा बदलणे हा पर्याय नाही हे लक्षात आले पण त्यामुळे आजारी आहे, बरे वाटत नाहीये अशी कारणं सांगून तो महिन्यातून कमीतकमी २ आठवडे तरी घरीच असायचा. साधारण ६-७वीत

गेल्यावर त्याचा एक मित्र झाला आणि त्याने शाळेत आनंदाने जायला सुरुवात केली. हळूहळू त्याच्या खूप साऱ्या मैत्रिणी आणि मित्र कमी असे होत गेले. मी खूप चिडायचो पण नेहमीप्रमाणे त्याची आई त्याला पाठीशी घालायची. हे दरवेळीच होत असल्याने हळूहळू मी घरातून लक्ष काढून घ्यायला लागलो. तेव्हापासून घरी सगळे हिचेच चालत आले आहे त्यामुळे सुरुवातीला तुमचे लग्न झाल्यावर आता मुलगा आपल्या हातातून निघून जाईल ह्याची सगळ्यात जास्त भीती आणि स्वतःचे खरे करायची सवय असल्याने तुला त्रास झाला. तिला ते जाणवत होते तरीही 'कळतंय पण वळत नाही' ह्या म्हणीप्रमाणे ती काही बदलू शकली नाही.

मी, आई बाबा नुसतेच ऐकत होतो आणि काकू पहिल्यांदा खाली मान घालून काहीही न बोलता शांत बसून होत्या. काका इतके सगळे का सांगत आहेत, हेच आम्हाला कळत नव्हते. ह्या सगळ्याचा आणि हेमंत समलिंगी असण्याचा काय संबंध? आमच्या चेहऱ्यावरचे भाव काकांना कळत होते पण बहुतेक काय बोलावे हे त्यांना कळत नव्हते. खूपवेळ सगळेच शांत बसून होतो. थोड्यावेळाने काकूंनी बोलायला सुरुवात केली. "हे बघ मानसी! जे झाले ते काही परत येऊ शकत नाही. हेमंत जे आणि जसा वागला त्यावर आपण कोणी काहीच बोलू शकत नाही. पण तरीही मानसी आता तू देशमुख आहेस, दोन मुलं पदरात आहेत, त्यांचा विचार कर, त्यांना

काय वाटत असेल ह्याचातरी विचार केला आहेस का, किती दिवस तू इथे...." त्यांचे वाक्य पूर्ण होऊ न देता बाबा जागेवरून उठले, त्यांनी हात जोडले. काकाकाकूंकडे बघून,"तुमच्या दोघांची मनापासून माफी मागून तुम्हाला सांगतोय की आमच्यावर कृपा करा आणि आता निघा. परत यायची तसदी घेऊ नका. मानसी आता देशमुख झाली आहे, हे सांगितल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार. थोड्याच दिवसात मानसीचे आणि मुलांचे आडनाव बदलून घेऊ, काळजी करू नका!"

हे सगळे ऐकून काकाकाकू स्तब्धच झाले, बहुतेक काकूंना दुसरे बोलायचे होते पण अहंपणा, सुनेसमोर कात टाकण्याची लाज वाटल्यामुळे असे बोलले गेले असणार. बाबांचे हे बोलणे ऐकून काका उभे राहिले, बाबांच्यासमोर येऊन काकू असे बोलल्या म्हणून माफी मागितली. बाबा काहीही न बोलता खाली बसले व काकूंना एकही शब्द तोंडातून न काढायची तंबी देऊन शांत करून परत बोलायला सुरुवात केली.

"खरेच! माफ करा मला. हिला कसे, कुठे आणि काय बोलावे ते कळत नाही. तिच्यावतीने मी तुमची माफी मागतो." बाबा त्यावर,"तुम्ही इथे नक्की कशासाठी आला आहात हे कळले तर बरे होईल. कृपा करून सरळ मुद्यावर या!" हे ऐकून काका एकदम स्तब्धच झाले तर काकूंच्या डोळयात थोडासा

राग दिसला. काकांनी परत बोलायला सुरुवात केली,"हे बघा मानसीबरोबर जे झाले ते चुकीचेच आहे, आम्ही इथे कुठूनही हेमंतची बाजू घ्यायला किंवा त्यावर काही स्पष्टीकरण द्यायला आलो नाही. फक्त एवढेच सांगायचे आहे की हेमंतची चुकी मानसीने, मुलांनी भोगायला नको एवढेच वाटत आहे. मुलांचे बाजूला ठेवू पण मानसी आमची आहे, हेमंतच्या चुकीची शिक्षा आम्ही मानसीला नाही देऊ शकत. हेमंतशी आम्ही बोललो आहोत. त्याला स्पष्ट सांगितले आहे की ह्या घरावर व संपत्तीवर त्याच्याआधी मानसी आणि मुलांचा हक्क आहे. त्यानेपण हे मान्य केले आहे. फक्त त्याला एकदा मानसीशी बोलायचे आहे." मला हे ऐकून राग आलाच होता पण माझ्यापेक्षा बाबा जास्त चिडले होते. ते बघून काका दोन मिनिटं घाबरले पण तरीही त्यांनी आपले बोलणे सुरु ठेवले,"माझी विनंती आहे, कृपा करून माझे म्हणणे पूर्ण ऐकून घ्या. नंतर तुम्ही जे सांगाल ते मला मान्य असेल. तर मानसी, विचार कर. फक्त एकदा हेमंतशी बोलून घे. अगं कितीही अक्षम्य गुन्हा केलेल्या कैद्याला जेव्हा फाशीची शिक्षा देतात तेव्हापण त्याला त्याची शेवटची इच्छा विचारली जाते. तेव्हा तू एकदाच हेमंतशी बोल, तो काय म्हणतो बघ. शेवटी निर्णय हा तुलाच घ्यायचा आहे. तो निर्णय सगळ्यांना मान्य असणार आहे पण मी सांगतो म्हणून एकदा हेमंतशी बोल", असे म्हणेपर्यंत आजींचा फोन आला, काकांनी तो फोन मला दिला. "मानसी कशी आहेस ग! काळजी घे स्वतःची. मी एवढेच सांगायला फोन केला

आहे की तू जो काही निर्णय घेशील तो कोणाच्याही दबावाखाली न घेता स्वतःच्या मनाचे ऐकून नंतरच घे. कुठल्याही आणि कसल्याही क्षणी मी कायम तुझ्याबरोबर आहे, हे विसरू नकोस. काळजी घे. चल! फोन ठेवते", एवढे बोलून आजींनी फोन ठेवून दिला.

कोणी काहीच बोलत नव्हते. ही शांतता सहन न होऊन मी पहिल्यांदाच बोलले,"काका तुम्ही इथे माझा विचार करून आलात, खरेच खूप बरे वाटले. मी विचार करून तुम्हाला सांगते. माझ्याकडे तुमचा नंबर आहे." माझे बोलणे ऐकून काकाकाकू लगेच उठले. काकांनी माझ्याकडे हात जोडून नमस्कार केला आणि दोघे घरी निघून गेले.

ते येऊन गेल्यानंतर आठवडाभर घरी एकदम शांतता होती. आमचा सगळ्यांचा नित्यक्रम खरेतर चांगला चालला होता तोही आता बिघडला होता. सगळेजण चिंतेत होते. आतातर रेवा आणि निशांत पण शहाणे झाले होते. ह्या सगळ्या प्रसंगाने त्यांना खूप लवकर मोठे केले होते. त्या दोघांना बघून वाईट वाटत होते, त्यांचे बालपणच हरवून गेले होते. काकाकाकूंचे दोघेही लाडके- अगदी आजीआजोबा म्हंटले की खुश होणारे दोघेही, ते आले तेव्हा दोघांच्या चेहऱ्यावर १ मिनीट आनंद झळकला होता पण ते लगेच आत निघून गेले होते नंतर आई त्यांना पणजीकडे सोडायला म्हणून

त्यांच्यासमोरून घेऊन गेली तरीही दोघांनी काकाकाकूंकडे बघितले सुद्धा नाही. एवढेच नाहीतर आजतागायत माझ्या गोड पिल्लांनी आत्तापर्यंत जे काही झाले किंवा आपण इथे का राहायला आलो, असे कुठलेही प्रश्न विचारले नाहीत. कुठून एवढे शहाणपण दोघांना आले असेल! हेमंतने केलेल्या धोक्याचा त्रास होतच होता पण त्यापेक्षा जास्त रेवा निशांत कडे बघून जास्त होत होता! माझे दुःख आईबाबा, तन्मय आणि मधुराला जाणवत होते, बाकीच्यांना काय झाले हे माहित नसताना काहीतरी खूप वाईट घडले आहे ज्याचा मला त्रास होत आहे हे बघून माझ्यासाठी वाईट वाटत होते पण रेवा निशांतचे दुःख कोणालाच दिसत नव्हते. सगळे त्यांना खुश ठेवत होते, त्यांच्याशी खेळत होते, बागेत घेऊन जात होते त्याबरोबर माझ्याबरोबर जी चुकी झाली होती ती परत न करता त्यांना प्रेमाने का होईना पण तेवढीच शिस्त लावत होते. पण त्यांच्यातला बदल कोणालाच जाणवत नव्हता. जे मला मात्र प्रकर्षाने जाणवत होते त्यामुळे खूपदा आईबाबांकडे न राहता वेगळे राहावे असे वाटत होते. आता काकाकाकू येऊन गेल्यानंतर मात्र हे प्रकर्षाने जाणवायला लागले होते. माझ्यासाठी नाही पण मुलांसाठी तरी काहीतरी करायला लागणार एवढेच जाणवत होते. आईबाबा तन्मय, मधुरा सगळेच माझ्याशी काहीच झाले नाही अशारितीने वागत होते, कोणीही माझ्याकडे ह्याबाबतीत बोलत पण नव्हते त्यामुळे तर आणखीनच घुसमट होत होती.

शनिवारी तन्मय कुटुंब आल्यावर संध्याकाळी सगळे चहा पिताना मी विषय काढला. एकदा हेमंतशी बोलायचे हे माझ्या मनात आहे हे सांगितल्यावर बाबा आणि तन्मय चांगलेच चिडले. त्यांनी मला एकही शब्द पुढे बोलू दिले नाही. दोघेही माझ्या अंगावर ओरडायला लागले, मला कशी अक्कल नाही,वगैरे सांगायला लागले. दोघेही ओरडून शांत झाल्यावर वाहिनीने सगळ्यांना समजावून सांगितले की हे मानसीचे आयुष्य आहे. आपण मानसीच्या बाजूने किंवा मानसीबरोबर कायमच असणार. पण आपण तिच्या आयुष्यावर आपला हक्क नाही सांगू शकत. तिला जर हेमंतला भेटावेसे वाटत आहे तर भेटू दे ना. ती भेटायला गेली तर काय लगेच ती तिकडे राहायला जाणार नाहीये". हे ऐकून तन्मय पिसाळलाच,"मानसीला सांभाळायला मी समर्थ आहे, तुला तिचे काहीच करायला लागणार नाही. तू तिची काळजी करू नकोस आणि मध्ये बोलूपण नकोस." त्याचे हे बोलणे ऐकून आम्ही सगळेच अवाक झालो होतो. मधुराच्या डोळ्यात टचकन पाणी आले आणि ती आत निघून गेली. खरेच मनापासून बोलत होती ती पण ह्याने वेगळाच अर्थ लावला होता. आईने तन्मयकडे इतक्या रागाने बघितले की तो लगेच तिच्यामागे गेला.

सोमवारी सकाळी परत मुंबईला निघताना तन्मय-मधुरा माझ्या खोलीत आले आणि मी जो काही निर्णय घेईन तो त्यांना मान्य असेल तरीही जे काही करणार आहेस ते विचार करून ठरव हेपण सांगितले. त्यानंतर मी लगेच असे तडकाफडकी निर्णय न घेता अजून विचार करू मग ठरवू हे मनातच ठरवून टाकले.

साधारण दोन-तीन दिवसांनी मी ऑफिसमधून घरी येण्यासाठी म्हणून बसस्थानकावर उभी असताना अचानक गाडीतून जाताना हेमंत दिसला आणि मनात "धस्स" झाले. कुठेतरी धडधड व्हायला लागली. एकदम भानावर आल्यावर माझाच मला राग आला नि त्यावेळी स्वतःचीच लाज वाटली. 'अगं मानसी, ह्याने काय केले आहे तुझ्याबरोबर लक्षात आहे ना! त्याला बघून तुझ्या हृदयाची धडधड कशी होत आहे. इतकी मूर्ख असशील असे वाटले नव्हते' असे आतूनच ऐकू येऊ लागले. तशीच खाली मान घालून उभी असताना बस आली, गोंधळ ऐकू यायला लागल्यावर समोर बघितले तर माझीच बस माझ्या डोळ्यासमोरून निघून गेली होती. आता दुसरी बस अजून १५ मिनिटाने येणार होती, तोपर्यंत इथेच बसून राहायला लागेल ह्या विचाराने तिथेच बेंचवर बसत असताना समोर गाडी येऊन थांबली. काच खाली घेऊन हेमंतने मला गाडीत बसायला सांगितले. मी बावळटासारखी लगेच गाडीत बसले, त्याच्या चेहऱ्यावरचे स्मितहास्य

बघून मी एकदम जागी झाले आणि गाडीचे दार उघडायला लागले. त्याने पटकन पुढे वाकून दार बंद केले. त्याच्या स्पर्शाने माझा पुतळाच झाला. त्याने दार बंद करून गाडी चालू केली. साधारण ५ मिनिटांनी मी भानावर आले. "हेमंत गाडी बाजूला घे, मी तुझ्याबरोबर गाडीत बसू नाही शकत. तू असे मला घ्यायला येणे चुकीचे आहे.". त्यावर तो,"हे बघ मानसी मी काही मुद्दामून इकडे आलो नाही, काही कामासाठी जाताना मी तुला बसस्थानकावर बघितले. गाडी बाजूला घेत असताना तुझी बस निघून गेलेली बघितले म्हणून गाडी वळवून तुला सोडायला आलो. तू कुठलाही गैरसमज करून घेऊ नकोस". हे ऐकून तर माझे डोकेच फिरले. "हे बघ हेमंत, मला तुझ्याशी कुठलीही हूज्जत किंवा वाद घालायचा नाहीये, तू गाडी बाजूला घे नाहीतर मी चालत्या गाडीतून उतरेन". हे ऐकून त्याने थोडे नमते घेऊन,"इथे मध्येच थांबता नाही येणार. हा उड्डाणपूल आहे. पुढे बाहेर जाण्याचा रस्ता आहे तिथून बाहेर काढतो". मला शांत बसण्याशिवाय पर्यायच नव्हता. खूप मोठा रस्ता होता थोडावेळ शांत बसल्यावर हेमंतने बोलायला सुरुवात केली,"मी तुझा अक्षम्य गुन्हा केला आहे ज्याला कधी आणि कोणीच माफी देऊ शकत नाही. पण आपले जे काही थोडे दिवस किंवा काही वर्ष संबंध होते त्यावर विश्वास ठेवून एकदाच माझ्याशी बोल न. मी तुला म्हणतच नाहीये मला माफ कर म्हणून पण एकदाच माझे म्हणणे ऐकून घे". हे ऐकून मी काहीही बोलले नाही. माझा स्वभाव हेमंतला माहित

होता त्यानुसार मी त्याच्याबरोबर यायला तयार आहे हे त्याने ताडले. "पुढेच एक छान उपहारगृह आहे तिथे जाऊन बसुयात". मी त्याला नकार देऊच शकले नाही.

तिथे जास्त गर्दी नव्हती त्यामुळे आम्ही निवांत बसू शकलो. एका कोपऱ्यात जागा बघून आम्ही तिथे बसलो. हेमंतने अगदी लक्षात ठेवून माझ्या आवडीचे अन्नपदार्थ मागवले. ते बघून माझ्या डोळ्यात पाणी आले पण त्याला दाखवू न देता मी बाजूला बघायला लागले. खूपवेळ आम्ही दोघे शांतच बसून होतो. माझ्या मनात दंद्व चालू होते. 'का तू ह्याच्याबरोबर इथे यायला लगेच तयार झालीस? इतके ह्याने तूला फ़सवूनही तुझ्या मनात अजून ह्याला जागाच कशी असू शकते? इतकी बावळट आहेस असे वाटले नव्हते! अजूनही वेळ आहे, नको बोलूस त्याच्याशी. उठ, बाहेर जा, रिक्षा पकड आणि घरी जा". पण माझे पायच तिथून हलत नव्हते, खूप प्रयत्न करूनही मी जागेवरून उठूच शकले नाही. तोपर्यंत टेबलवर ज्युस आला. पितापिता हेमंतने परत बोलायला सुरुवात केली.

मला माहित आहे मानसी. तू माझ्यावर खूप चिडली आहेस, चिडायलाच पाहिजे. पण मी खरेच सांगतो ग अगदी लग्न होईपर्यंत मी समलिंगी आहे हे मला माहितीच नव्हते. लग्न काय गं अगदी रेवा होऊन तू भारतात परत येईपर्यंत मला मी समलिंगी आहे हे माहित नव्हते. एवढेमात्र

खरे की मला आपल्या संबंधामध्ये फार रुची वाटत नव्हती, त्यावेळी मी स्वतःलाच समजवायचो- खूप दमलो असेन, मानसिक स्थिती चांगली नसेल अशी काहीतरी स्वतःची स्वतःला कारणे देऊन स्वतःचीच समजूत काढायचो. तू रेवाला घेऊन जेव्हा भारतात आलीस, तेव्हा मी अगदी एकटा पडलो होतो ग. त्यात फोन केला की नेहमी आईशीच बोलणे होत असल्याने तुझ्याशी बोलताच येत नव्हते, त्यावेळी तर खूपच एकाकी जाणवत होते. मग विरंगुळा करायला म्हणून मी आपल्या घराजवळच्या बागेत फिरायला जायचो. तिथे रोज जॉनपण यायचा. आम्ही एकमेकांकडे बघून हसायचो पण बोलायचो नाही. एक दिवस मी बागेत गेलो आणि बघितले की जॉन खाली पडला होता. त्याचा चेहरा खूप रडवेला वाटत होता म्हणून मी जवळ गेलो, बघितले तर त्याचा पाय चांगलाच सुजला होता. दवाखान्यात घेऊन जायला म्हणून मी त्याला उचलून घेतले, तिथेच मला आत्तापर्यंत न जाणवलेली धडधड जाणवायला लागली. मला काय होतंय तेच कळत नव्हते तसेच मी त्याला दवाखान्यात सोडून लगेच घरी गेलो. नंतरचे दोन दिवस मी स्वतःला घरी कोंडून घेतले होते. दोन दिवस मी त्याला बागेत दिसलो नाही त्या काळजीने तिसऱ्या दिवशी जॉन माझी चौकशी करायला म्हणून स्वतःहून घरी आला. त्यादिवशी पहिल्यांदाच आम्ही दोघे बोलत होतो पण खूप दिवसांची ओळख असल्यासारखे आम्ही दोघे रात्रभर गप्पा मारत होतो. सकाळ कधी झाली कळलेच नाही. सकाळी मी जेव्हा त्याला

त्यादिवशी मी परत भारतात जाणार आहे म्हणून सांगितल्यावर त्याने मला गालावर पप्पी दिली आणि लगेच निघून गेला. माझ्या काळजाची धडधड अचानक वाढू लागली, काय होतंय तेच कळत नव्हते. तो गेल्यानंतर मला घर रिकामेरिकामे वाटत होते. तुम्ही दोघी जेव्हा भारतात परत गेलात ना तेव्हा मला अगदी एकटएकटं वाटत होते पण रिकामपण कधीच जाणवले नाही. थोड्यावेळाने सगळे मित्रमंडळी भेटायला आल्याने नंतर विचार करायला वेळच मिळाला नाही.

इथे परत आल्यावर तुम्हा दोघींना बघून विशेष आनंद झाला पण तुझ्याबद्दल ती गोडी राहिली नव्हती किंबहुना पहिल्यापासूनच मला ती गोडी वाटत नव्हती पण आतातर त्याबद्दल जाणवायला लागले. मी वेगळा आहे, चारचौघांसारखा नाही हे शाळेत असल्यापासूनच जाणवत होते. माझे मुलांबरोबर कमी आणि मुलींबरोबर जास्त जमायचे. अगदी लहान असताना शाळेत संजू नावाचा एक मुलगा जो दिसायला खूप छान होता शिवाय त्याचे व्यक्तिमत्वपण खूप छान होते. तो जवळून गेला तरीही मी हरखून जायचो. मला हे जाणवत नसले तरीही शाळेतल्या व्रात्य मुलांच्या हे लक्षात आले आणि ते मला खूप त्रास देऊ लागले मग आईने माझी शाळा बदलली. पण प्रत्येक शाळेत हे व्हायचे आणि माझ्या खूप शाळा बदलल्या गेल्या. सगळीकडे हे होत असल्याने शेवटी शाळेत नसून माझ्यात त्रुटी आहे

हे मान्य करून माझी शाळा बदलणे बंद झाले. पण सगळी मुलं मला खूप त्रास देत असल्याने मला शाळेत जावेसेच वाटत नव्हते. मग मी आजाराचे कारण सांगून घरी राहायला लागलो. मी आजारी आहे हे ऐकले तरीही आई खूपच चिंतातुर होत असल्यामुळे मी शाळेत न जाण्यासाठी नाटकं करत आहे हे तिच्या लक्षातच यायचे नाही. खूपदा बाबा सांगायचे पण त्यांचे न ऐकता ती मला शाळेत पाठवायची नाही. अगदी डॉक्टरकाकांकडून माझी प्रकृती नाजूक असल्याने शाळेतून कधीही सुट्टी घेऊ शकतो ह्या मजकुराचे पत्र घेऊन शाळेला दिले होते. अगदी सहावीत असेपर्यंत मला एकही मित्र किंवा मैत्रीण नव्हती.

सहावीत असताना अमित म्हणून एक मुलगा शाळेत नवीन दाखल झाला. खूप लाजराबुजरा आणि नाजूक तब्येतीचा अमित सगळया व्रात्य मुलांचा शिकार झाला. एकटाच रडत बसला असताना त्याची आणि माझी ओळख झाली. तो मला खूप समजून घ्यायचा, माझ्याशी नीट वागायचा, महत्वाचे म्हणजे मी वेगळा आहे हे त्याने मला कधीच जाणवू दिले नाही. सगळेजण आम्हा दोघांना चिडवायचे, आमची मजा उडवायचे. माझी काही मुलींशी चांगली मैत्री झाली होती. त्या खूप चांगल्या होत्या. एक दिवस शाळा सुटल्यावर मला आणि अमितला ह्या सगळया मुलांनी पकडून एका कोपऱ्यात नेले. तिथे आम्हा दोघांना सगळे कपडे काढायला लावून खूप

काहीतरी वेगळे करायला लावणार होते. आम्ही जेव्हा कपडे काढायला नकार दिला तेव्हा आम्हा दोघांचे डोके पकडून एकमेकांवर आदळले. आम्ही दोघेही रडत रडत कपडे काढत होतो. कपडे काढून झाल्यावर त्यांनी आम्हा दोघांना जवळ यायला सांगितले. दोघांचाही चाललेला हा अपमान सहन होत नव्हता पण सगळेजण आमच्यापेक्षा वयाने आणि शरीराने खूप मोठे असल्याने आम्ही काहीही करू शकत नव्हतो. त्यामुळे तर आणखीन राग येत होता. आम्हाला आमच्या मैत्रिणी सगळीकडे शोधत शोधत आमचा आवाज आल्याने तिथे आल्या, त्यांना बघून अगोदर ही सगळी मंडळी खूप घाबरली पण लगेच सरसावून त्यांनी ह्या सगळ्यांनापण मध्ये घेतले. मग मात्र माझे पित्त खवळले. तिथेच पडलेली काठी मला दिसली, ती घेऊन मी सगळ्यांवर धावून गेलो. ह्यात मला माझ्या मैत्रिणींनी साथ दिली. त्यापण माझ्याबरोबरीने सगळ्यांना पकडून मारायला लागल्या, त्यादिवशी पहिल्यांदा माझ्या अंगात 10 हत्तींचे बळ आले आणि मी प्रत्येकाला झोडपून काढले. सगळ्यांनी मिळून त्यांना इतके मारले की ते तिथून पळून गेले. अमित मात्र एका कोपऱ्यात घाबरून उभा होता. सगळे पळून गेल्यावर मात्र आम्ही एकदम अंगातले त्राण गेल्यासारखे धपकन खाली बसलो. त्यावेळी अमित माझे कपडे घेऊन आला नि आम्ही सगळे जोरजोरात हसू लागलो. त्यानंतर मात्र मी आता कधी घाबरून राहणार नाही आणि स्वतःला सिद्ध करणार हे ठरवून टाकले. त्या क्षणापासून माझे

वागणेबोलणेपण बदलले. मी सगळयांबरोबर बोलायला लागलो होतो. खरेच सांगतो मानसी, अमित आणि ह्या सगळया मला समजून घेणाऱ्या मैत्रिणी मला मिळाल्या नसत्या तर मी कधीच आत्महत्या केली असती किंवा नुसता अमित असता तर कदाचित तेव्हाच मला माझी ओळख झाली असती....

दहावी झाल्यानंतर मात्र आम्ही सगळयांनी वेगवेगळे क्षेत्र निवडले. मी ठरवल्याप्रमाणे सायन्स निवडून नंतर BE केले. अभ्यासात काही मी हुशार नव्हतो त्यात आईने खूप लाडावल्यामुळे आळशीपण झालो होतो त्यामुळे खरेतर मला कुठेही प्रवेश मिळाला नसता पण बाबांच्या ओळखीमुळे किंवा पैशांमुळे मला सगळीकडे सहजतेने प्रवेश मिळाला. रडतखडत का होईना मी BE झालो. त्यावेळी मला असे वाटायला लागले होते की मी मुलांकडे जास्त आकर्षित होत आहे. सगळे मित्र मुलींच्यामागे लागायचे, त्यांना चिडवायचे पण मलामात्र त्यात कधीच रस नव्हता. उलट कुठला चांगला मुलगा दिसला की मला त्याच्याकडे बघायला आवडायचे. पण शाळेत झालेल्या किस्स्यामुळे मी त्याकडे फार लक्ष न देता लगेच स्वतःला सावरायचो. ह्या सगळयातून बाहेर यायला मला खूप त्रास झाला पण नक्की मी काय आहे, असा का आहे हे कळत नसल्याने स्वतःला दाबायचो. असे बरेच प्रसंग आले पण मी स्वतःला बावळट समजून त्यातून बाहेर आलो.

BEला असताना पहिल्याच वर्षी माझे श्रीशावर प्रेमपण जडले होते. आम्ही दोघेच अर्ध्यापेक्षा जास्त वेळ एकत्र असायचो त्यामुळे तर हे सगळे विचार झटकून टाकायला खूप मदत झाली. आम्ही दोघांनी लग्न करायचेपण ठरवले होते. तिच्यामुळे मी MS करायला अमेरिकेत गेलो. तिथे आम्ही दोघांनी MS पूर्ण केले. खरे सांगायचे तर तिच्यामुळे मी BE आणि MS पूर्ण केले. ती मला नेहमी म्हणायची की तू बाकीच्या मुलांसारखा नाहीयेस. पण मी तिला तिथेच तोडून विषय टाळायचो. कॅम्पस इंटरव्ह्यूमधून तिची खूप मोठ्या कंपनीमध्ये निवड झाली. मला मात्र कुठेच नोकरी मिळाली नाही. आमची परीक्षा संपल्यावर तिने माझ्याबरोबरचे सगळे संबंध तोडून टाकले. मी तिला मनवायचा खूप प्रयत्न केला. शेवटी एक दिवस कंटाळून,"इतकी वर्ष आपण एकत्र राहत आहोत हेमंत. तुला स्वतःहून कधीही मला जवळ घ्यावेसे वाटले नाही. मीच तुझ्याजवळ यायचे. खरेतर मला तुला बघितल्यावरच कळले होते की तू समलिंगी आहेस पण तुला अजून ते माहित नव्हते. ह्याचाच फायदा घेऊन मी तुझ्याशी संबंध ठेवले. तुला माझ्याबरोबर अमेरिकेत यायला भाग पाडले. आता माझे स्वप्न पूर्ण झाले आहे. मला खूप चांगली नोकरी मिळाली आहे. तुझ्यामुळे मला दुसऱ्या कुठल्याही मुलांकडे बघावे लागले नाही आणि अभ्यासात पूर्ण लक्ष ठेवता आले. खरेतर माझ्यामुळे तू BE झालास, इथे आलास, MS पण माझ्यामुळे पूर्ण झाले आहे. तू माझे आभार मानले पाहिजे. जाऊ दे! मी

काही तुझ्याकडून अपेक्षा करत नाहीये. तू मुलींचा नाद सोडून एखाद्या मुलाबरोबर लग्न कर". असे सांगितल्यावर मला काहीच बोलता आले नाही. त्याच दिवशी रात्री मी आईला फोन करून,"आई मला एकट्याला राहायला जमत नाहीये, माझे जेवणाखाण्याचेपण खूप हाल होत आहेत, तेव्हा आपण माझ्या लग्नाचे बघुयात का?" असे म्हंटल्यावर आई खुश झाली आणि बाबा नाही म्हणत असताना माझे नाव नोंदवून आली. पण दिसायला सुमार, अजून नोकरी नाही त्यामुळे लग्नच ठरत नव्हते. एकतर हुशार नव्हतो आणि आत्तापर्यंत श्रीशामुळे सगळ्या परीक्षा पास व्हायचो. श्रीशाला मात्र एकदम चांगल्या कंपनीमध्ये नोकरी लागली. बाबा परत बोलावत असताना मी इथेच नोकरी करणार ह्या हट्टाला पेटलो पण कुठेच नोकरी मिळत नव्हती. शेवटी तिथे झालेल्या एका मित्रामुळे मला ड्रिमलँड मध्ये नोकरी लागली आणि तूपण माझ्या आयुष्यात आलीस. आपले स्वप्न पूर्ण झाले म्हणून मी खूप खुश होतो. आपल्या लग्नाच्या पहिल्या रात्री खूप प्रयत्न करूनही मला त्यात जास्त रुची वाटली नाही पण तरीही मी प्रयत्न करून आपले संबंध ठेवत होतो. श्रीशा बोलल्यामुळेतर मी हट्टाला पेटून तिला दाखवण्यासाठी माझे कुटुंब पूर्ण करून तिला दाखवणार होतो. थोड्या वर्षांनंतर मी तिला विसरूनपण गेलो होतो. पण माझे मनमात्र मला मुलं आवडतात हे मान्य करायलाच तयार नव्हते.

नंतर तू भारतात निघून आलीस आणि मी मगाशी सांगितल्याप्रमाणे जॉन भेटल्यावर जी छातीत धडधड झाली तेव्हा मला परत श्रीशा आणि तिचे शब्द आठवले. पूर्ण प्रवासात सारखे हेच विचार मनात येत होते. इथे आल्यानंतरसुद्धा हे विचार मनातून जातच नव्हते. तुझ्याशी लग्न करून मी तुझे खूप मोठे नुकसान केले आहे असे सारखे मनात येत होते. त्यामुळे तुझ्याशी बोलायलापण नको होत होते आणि मी दिवसेंदिवस तुझ्यापासून दूर राहायचा प्रयत्न करत होतो. नंतर तू दुसरे बाळ पाहिजे म्हणून माझ्या मागे लागलीस म्हणून वैतागून फक्त एकाच दिवशी मी तुझ्याजवळ आलो. तुला आठवते की नाही माहित नाही पण त्यानंतर मी ४-५ दिवस घरीच आलो नव्हतो. त्यानंतर मी जितके होईल तेवढे बाहेर राहायला लागलो होतो. एक दिवस हिम्मत करून तुला सगळे सांगायला म्हणून घरी आलो तर तू परत आई होणार आहेस हे कळले आणि शांत बसलो. मला खूपच अपराध्यासारखे होत होते. काय करावे कळत नव्हते. ऑफिसमध्येपण बसवत नव्हते. रोज दुपारी मी स्वाद ह्या उपहारगृहात जेवायला म्हणून जायचो तर तिथेच ५-६ वाजेपर्यंत बसून राहायचो. तिथे सगळे ओळखीचे झाल्याने कोणी काहीच बोलत नसत. निशांतचा जन्म झाल्यावर मी खूपच खुश झालो. आता मी २ मुलांचा बाप झालो आहे तेव्हा हे सगळे विसरून आता आपण आपला हा संसार प्रामाणिकपणे करायचा हे ठरवून टाकले. २ महिने मी निशांत-रुचाची खूप काळजी घेतली पण तुझ्याजवळ आलो

की एकदम आजारी असल्यासारखे होऊन गळून जायचो. तू परत ऑफिसला जायला सुरुवात केल्यावर तर तू दिवसभर घरी नसल्याने हा केलेला निश्चय गळून पडला आणि मी परत स्वाद उपाहारगृहाचा आधार घ्यायला सुरुवात केली.

एक दिवस तिथेच दुपारी चहा घेताना अचानक एकजण समोर येऊन बसला. "ओळखले की नाही मला", असे विचारल्यावर मी २ मिनिटं नुसतेच 'आ' करून बसून राहिलो. त्यानेच स्वतःची ओळख करून दिली. "अरे हेमंत तू मला विसरशील असे स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते. आपल्या आयुष्यातले सोनेरी दिवस आपण एकत्र काढले. नंतर तू आम्हा सगळ्यांना विसरलास पण आम्ही सगळे अजूनही एकमेकांना भेटतो त्यावेळी तुझी खूप आठवण येते यार". बोलताना माझ्या हळूहळू लक्षात यायला लागले. मी "अमित" म्हणून हाक मारल्यावर त्याने उठून मला कडकडून मिठी मारली. आम्ही दोघे त्यादिवशी उपहारगृह बंद होईपर्यंत गप्पा मारत बसलो होतो. जाताना तिथली सगळी लोकं आनंदी दिसली. सगळ्यांनी अमितला तिथे रोज येऊन मला भेटायला सांगितले. त्यांनी म्हणे मला पहिल्यांदा आनंदी बघितले होते. त्यानंतर रोजच अमित तिथे यायचा. तो खूप मोठा लेखक आहे मानसी. तूतर त्याची खूप मोठी चाहती आहेस.. "हेमांमीत"

हे नाव ऐकले आणि मी उडूनच गेले. त्याचा आजपर्यंत एकही फोटो नाहीये की तो कोण आहे कोणालाच माहित नाही पण त्याची पुस्तके आपल्याला खिळवून ठेवतात इतकी छान असतात. मी खूपदा अमितच्या मागे लागायचे," हेमांमीत कोण आहे शोधून काढ, तो मुलगा आहे की मुलगी, वयोवृद्ध आहे की तरुण काहीच कळत नाहीये. नाही भेटला तरी चालेल पण एखादा फोटोतरी मिळेल का बघ ना" पण त्याला शोधणे शक्यच नव्हते.

हा विचार करतानाच माझे घड्याळाकडे लक्ष गेले. ९ वाजत आले होते. रुचा, निशांत वाट बघत असतील. आईबाबा आणि घरातले सगळे काळजी करत असतील ह्या विचाराने मला धडकीच भरली. ताडकन उठून उभी राहिले. हेमंत अचानक काय झाले हे विचारत होता पण त्याच्याकडे सरळ दुर्लक्ष करून मी बाहेर आले. हेमंत माझ्या मागोमाग बाहेर आला. त्यावर त्याने,"काळजी करू नकोस मानसी! मी बाबांना संध्याकाळीच फोन करून आपण दोघे भेटत आहोत म्हणून सांगितले आणि त्याबरोबरच तुझ्या घरच्यांनापण कळवायला सांगितले". हे ऐकुनतर मी उडालेच,"अरे आपण दोघे एकत्र असताना तर तू कोणाशीच फोनवर बोलला नाहीस, मग तू कधी सांगितलेस?" माझे हे बोलणे ऐकून तो २ मिनिटं शांतच बसला."मला माफ कर मानसी. खरेतर मी तुझ्याशीच बोलायला आलो होतो. खूप दिवस मी

तुझ्या फोनची, मेसेजची वाट बघत होतो पण तू मला संपर्कच केला नाहीस. ह्याचा मला खूप त्रास होत होता. मी खूपदा बसस्टॉपवर येऊन गेलो पण तुझ्याशी बोलायची हिम्मतच होत नव्हती त्यामुळे तू बसमध्ये बसल्यावर परत जायचो. आज मला हे सगळे सहनच झाले नाही आणि तुझ्याशी बोलायचे म्हणून मी सरळ बसस्टॉपवर आलो. तू माझ्याशी बोलायला नक्की तयार होशील ह्याची मला खात्री होती त्यामुळे मी अगोदरच बाबांना फोन करून कळवले". हे ऐकून तर माझे डोकेच फिरले. मला ह्याने गृहीत धरले, त्याने जो विचार केला तशीच मी वागले, हे लक्षात आल्यावर तर स्वतःचा आणखीनच राग आला. त्याच्याकडे पाठ करून मी रिक्षाची वाट बघत उभी राहिले. हेमंत परत आत निघून गेला, ३-४ मिनिटांनी बाहेर आला तरीही मला रिक्षा नाही मिळाली. "चल मानसी. मी तुला घरापर्यंत सोडतो. रात्र झाली आहे, एकटी कुठे जातेस?" असे त्याने म्हंटल्यावर मी लगेच,"ह्याचा विचार तू लग्न करायच्या अगोदरच करायला हवा होतास. बरं लग्न केलेस तर हे असले व्यभिचार करायच्या अगोदर आमचा विचार तरी करायचा होतास. आला मोठा काळजी करणारा!" असे बोलेपर्यंत एक रिक्षा पुढे येऊन उभी राहिली. सरळ आत जाऊन बसले. रिक्षावाल्यांना कुठे जायचे सांगितले तर त्यांनी सरळ नकार देत,"हे बघा ताई, मी आता घरी चाललो आहे. तुमचे आणि माझे घर म्हणजे दोन टोकं आहेत. तुम्हाला माझ्या घराच्या रस्त्यावर कुठे सोडायचे असेल तर सांगा", असे

म्हंटल्यावर,"मग रिक्षा कश्याला चालवता? तुमचे काम असते ना गिऱ्हाईकांना ते म्हणतील तिथे सोडायचे. जमत नसेल तर बंद करा हा धंदा", माझे हे बोलणे ऐकून रिक्षावाल्याचे डोकेच फिरले. ते काही बोलणार तेवढ्यात हेमंतने त्यांची माफी मागून मला हात धरून बाहेर ओढले. ते निघून गेल्यावर,"हे बघ मानसी, आत्ता रिक्षा मिळणे खूप अवघड आहे. कृपा करून माझे ऐक. चल मी सोडतो तुला", मी त्याच्याकडे लक्ष न देता तशीच उभी राहिले तर तो निघून गेला. तो गेलेला बघितल्यावर मात्र मला धडकीच भरली. रस्त्यावर कोणीच नव्हते आणि रिक्षा मिळेल की नाही हे माहित नसल्यामुळे तर धडधडायलाच लागले. नशिबाने हेमंत गाडी घेऊन लगेच आला आणि माझ्यासमोर येऊन दार उघडून मला बसायला सांगितले. एक मन गाडीत जाऊन बस सांगत होते तर अंगातली आखड बसू देत नव्हती. शेवटी तो गाडी थोडी पुढे घेऊन तिथेच उभा राहिला. १५-२० मिनिटे झाली तरीही गाडी येत नाही हे पाहून माझ्याकडे येऊन मला गाडीत बसायची विनंती केली. मी अगदी लगेच गाडीत जाऊन बसले. गाडीत एक अवाक्षरही एकमेकांशी न बोलता आम्ही घरी पोहचलो. मी गाडीतून उतरून त्याच्याकडे न बघता लगेच आत गेले. आईबाबांपुढे जायला खूप लाज वाटत होती. तशीच आत गेले तर आईबाबा वाटच बघत होते. मला बघून आईने हसून,"दमली असशील ना! हातपाय तोंड धुवून घे. चहा पिणार का?" असे विचारल्यावर मी मानेनेच नकार दिला. त्यावर तिने

मला आवरून झोपायला सांगितले. आईबाबांनी काहीच न विचारल्याने मला मनातून बरे वाटले. लगेच आत जाऊन दोन्ही पिल्लांना कवटाळून झोपायचा प्रयत्न केला तरीही विचारांच्या काहुराने झोपच आली नाही. सकाळी आईने उठवल्यावर घड्याळ बघितले तर ८ वाजले होते. ऑफिसला जायला उशीर होईल म्हणून ती उठवायला आली होती. बघितले तर रेवा, निशांत दोघेही बाजूला नव्हते. तेव्हा आईने ते दोघेही शाळेत गेले आहेत म्हणून सांगितले. मीपण पटपट आवरून ऑफिसला गेले. तिथेही कामात लक्ष लागत नव्हते.

मी हेमंतला ज्याच्याबरोबर बघितले तो अमित होता. ज्याची मी चाहती आहे त्यानेच माझ्या नवऱ्याला माझ्यापासून पळवून नेले होते. त्यामुळे त्याचा राग यायला लागला होता. हेमंतच्या ऐवजी मी त्याच्यावरच चिडले. त्याच्यामुळेच माझा नवरा मला दुरावला होता. आमचा चांगला संसार त्याने बिघडवला होता. सगळे सहन करून मी त्या घरात राहत होते. आता सगळे छान रुळले होते तर ह्या अमितने त्या सगळ्यावर राख पेरली, आमचा संसार उद्धवस्त केला. काही केल्या दुसरे काही सुचतच नव्हते. पुढे काय झाले असेल? ह्या अमितने हेमंतला कसे आणि कधी आपल्या जाळ्यात ओढले असेल? त्या दोघांचे हे चक्कर कधीपासून चालू असेल? हेमंतचे एखाद्या बाईबरोबर चक्कर असेल असे वाटत होते, त्याचे एखाद्या पुरुषाबरोबर

संबंध असू शकतील हे कधीच कसे डोक्यात आले नाही आपल्या? आपण इतके मूर्ख आहोत का की कोणीही आपल्याला फसवू शकते? डोक्यातील काहूर काही केल्या थांबतच नव्हते. मला आता "हेमांमीत" ह्या शब्दाचा अर्थ समजला होता. लग्नाअगोदरपासून मी ह्याची पुस्तके, लेख ह्याची फॅन होते. हेमंत आणि अमितचा संगम करून ठेवलेले हे नाव त्याने लेखक म्हणून ठेवले आहे म्हणजे ह्या दोघांचे आमचे लग्न होण्याअगोदरपासूनच एकमेकांवर प्रेम असणार. समाजात दाखवण्यासाठी आणि आपले लफडे लपवण्यासाठी ह्याने माझ्याशी लग्न केले आहे. हा विचार मनात येऊन येऊन माझे डोके फिरायची वेळ आली होती. आत्महत्या करावीशी वाटत होती. खूपदा हा विचार मनात येऊन मी दुकानात झोपेच्या गोळ्या आणायला तर कधी उंदीर मारायचे औषध आणायला म्हणून जात होते पण विकत आणायची हिम्मत होत नव्हती. रेवा आणि निशांतचा चेहरा सारखा समोर यायचा. ही दोन बछडी माझ्यावाचून कसे राहतील असे वाटत होते. दोघांना घेऊन इथून पळून जाऊन दूर कुठेतरी एखाद्या आश्रमात किंवा अजून कुठेतरी रहायला जावे असा पण विचार मनात येत होता पण ह्या दोघांनी काय गुन्हा केला आहे. ह्या दोघांना आपल्यामुळे कशाला भोगायला लावायचे असा विचार मनात येऊन तेपण होत नव्हते. काय करावे सुचत नव्हते. हेमंतला फोन करण्यासाठी म्हणून खूपदा फोन हातात घेतला पण त्याला फोन करायची हिंमत काही झाली नाही. इतके सगळे झाले होते

तरीही मनात कुठेतरी घालमेल होत होती. एकीकडे घृणा वाटत होती पण कुठेतरी आतमध्ये त्याची खूप आठवण येत होती.

आता परत हेमंत येऊन गेल्यामुळे थोडी थोडी सगळयांच्यात मिसळत असलेली मी परत कोशात राहू लागले. आतातर माझे बोलणे एकदमच बंद झाले. अगदी रेवा आणि निशांतशी पण बोलत नव्हते पण माझी बछडी अजिबात तक्रार करत नव्हती की कुठली मस्ती करत नव्हते, खूप लवकर शहाणी झाली होती.

साधारण ८ दिवसांनी हेमंतचा फोन आला. मीपण इतके दिवस त्याच्या फोनची वाट बघत असल्याने लगेच उचलला. त्याने आपण परत भेटायचे का विचारल्यावर मी त्याला दुसऱ्या दिवशी परत फोन करायला सांगून लगेच ठेवून दिला. घरी गेल्यावर तन्मयला फोन करून मी परत हेमंतला भेटायला जाणार आहे म्हणून सांगितल्यावर त्याने लगेच संमती दिली. आईबाबांना विचारले तर तेपण 'हो' म्हणाले. दुसऱ्यादिवशी हेमंतचा बरोबर कालच्याच वेळेला फोन आला. मी त्याला आपण रविवारी सकाळी भेटूयात म्हणून सांगितल्यावर त्याने लगेच,"मी सकाळी ११ वाजता घरी येतो", म्हणून सांगितल्यावर मी,"घरी नको येऊस, आपण बाहेर कुठेतरी भेटूयात". त्यावर त्याने मला सिंहगडला जाऊयात म्हणजे निवांत बसता

येईल म्हणून सांगितल्यावर मी त्याला लगेच 'हो' म्हणून सांगितले. घरी सांगितल्यावर कोणी काहीच बोलले नाही पण बाबांच्या चेहऱ्यावर सगळे वाचता आले की आपली ही लेक अजूनही हेमंतमध्ये गुंतली आहे त्यामुळे त्याच्याबरोबर सिंहगडलापण जायला तयार आहे. मी ते भाव वाचूनही काही बोलले नाही. आता मी रविवारची वाट बघायला लागले जो लवकर येतच नव्हता.

शेवटी तो दिवस उजाडला. सकाळी लवकर उठून मी ९ वाजताच तयार होऊन बसले. त्यादिवशी रविवार असूनही माधुरी तिच्या मुलांना घेऊन घरी आली. मी,"काय ग! आज कशी काय आलीस"? हे विचारल्यावर आईकडे बघितले नंतर मला म्हणाली,"ताई आज मुलांना आठवण येत होती म्हणून घेऊन आले. संध्याकाळपर्यंत थांबते. चालेल ना!" त्यावर मी सगळे समजल्यासारखे मान हलवली. मी काही बोलणार तोपर्यंत हेमंतचा बाहेर आलेल्याचा फोन आल्यामुळे मी सगळ्या मुलांना येताना खाऊ घेऊन यायचे वचन देऊन लगेच बाहेर पडले. बाहेर आले तर हेमंत बाईक घेऊन आला होता. मला सिंहगडला गाडीवरून जायला आवडते हे त्याच्या अजून लक्षात आहे तर!

सिंहगडला गाडी थांबवून आम्ही चालत जाऊन एक चांगली जागा शोधून तिथे बसलो. दोघांनाही काही बोलायला सुचत नसल्यामुळे खूपवेळ नुसतेच बसून होतो. हेमंतनेच बोलायला सुरुवात केली,"नाश्ता करून आलीस ना! काही खायचे आहे का हे वाटेत विचारायचं विसरलो". त्यावर मी नुसतेच हसले. हेमंतने बोलायला सुरुवात केली.

"अमित मला भेटला आणि माझे जीवन पार बदलूनच गेले. पुढे बरेच दिवस तो दुपारी उपहारगृहात येऊन आम्ही अगदी रात्रीपर्यंत गप्पा मारायचो. तो मला खूप दिवस घरी बोलावत होता पण मी काही ना काही कारण काढून घरी जाणे टाळत होतो. एक दिवस दुपारी तो जेवायला आलाच नाही. काय झाले काही कळतच नव्हते. खूप बैचैन व्हायला झाले होते. इतकी बैचैनी का होत होती तेच कळत नव्हते. तिथेच काम करत असलेल्या मुलाने,"साहेब, अमित साहेबांना फोन करून विचारा ना! रोज येणारे आजच का आले नसतील"? असे म्हंटल्यावर मी लगेच त्याला फोन लावला तर खूपदा फोन करूनही त्याने फोन उचलला नाही. काय झाले कळत नव्हते, तो नक्की कुठे राहतो हेपण मला माहित नव्हते. रात्रीपर्यंत वाट बघून शेवटी घरी निघून आलो. तो आला तर नाहीच, ना फोन उचलला. काय करू, कुठे शोधू काहीच कळत नव्हते. त्यावेळी हे जाणवले की अमितला माझ्याबद्दल सगळे माहित आहे पण मलामात्र त्याच्याबद्दल काही म्हणजे काहीच माहित

नाही. साधारण १०-१२ दिवसांनी माझी वाट बघत तो उपहारगृहात बसला होता. त्याला बघून मी पळत जाऊन त्याला मिठी मारली, त्याला खूप काही सुनावले. त्यात मी बरेच काही बोलून गेलो हे लक्षात आल्यावर मी लगेच शांत बसलो. नंतर कळले की त्याची बहीण आजारी होती त्यामुळे त्याला अचानक बहिणीकडे जावे लागले. घाईत जाताना तो घरीच फोन विसरून गेला होता आणि माझा नंबर लक्षात नसल्यामुळे त्याला मला फोन करायला जमले नाही. त्याने मला घरी जाऊन बसायचे का? असे विचारल्यावर त्यादिवशी मात्र मी लगेच तयार झालो".

हे ऐकल्यावर मला पुढचे चित्र डोळयासमोर यायला लागले. मला पुढचे काहीही ऐकायचे नसल्यामुळे मी तिथून उठले. थोडावेळ तिथेच फिरून परत हेमंतजवळ जाऊन बसल्यावर हेमंतने मला लगेच मटका खायला दिला. परत आम्ही शांतपणे दही संपवले. मी त्याला,"पुढे काय झाले असेल ह्याची मला थोडी कल्पना आली आहे. खरेच हेमंत मला आता पुढे काय झाले हे ऐकायचे नाहीये. चल आपण निघुयात, मला घरी सोड!" असे बोलून मी गाडीकडे जायला निघाले तर हेमंत म्हणाला,"तू समजतेस असे काहीच नाहीये ग. कृपा करून माझे ऐकून घे ना!" एवढ्या लांब मी काय झाले हेच ऐकायला आले आहे तेव्हा काहीही झाले तरी जागेवरून न उठता सगळे ऐकून घ्यायचे हे ठरवले आणि परत खाली बसले.

"तिकडून आम्ही दोघे घरी गेलो. आम्ही सोफ्यावर बसलोच तोपर्यंत अमितला एक फोन आला. त्याला एकेठिकाणी कामानिमित्त अर्जेंट बाहेर जायचे होते. अर्ध्या तासात परत येतो म्हणून सांगून तो लगेच निघाला. एकटाच असल्याने काय करावे न सुचून मी सगळे घर फिरून बघायला सुरुवात केली. साधेच पण खूप छान सजवले होते. सगळीकडे फिरून मी त्याच्या खोलीत गेलो, तिथे त्याच्या टेबलवर बराच पसारा होता तरीही काय काय आहे हे बघायला म्हणून तिथे थांबलो तर तिथे एक सुंदर फोटोफ्रेम दिसली आणि त्यात आमच्या शाळेतल्या ग्रुपच्या फोटोचे कोलाज होते. मी ती फ्रेम हातात घेऊन बघत होतो तोपर्यंत मागून 'आपण कोण? इथे काय करत आहात?" असा आवाज आला म्हणून मी मागे वळून बघितले तर एक साधारण आपल्याच वयाचा मुलगा होता. मी त्याला,"तुम्ही कोण"? असे विचारल्यावर त्याने,"माझ्या घरी येऊन मलाच विचारता" असे म्हणून जवळजवळ खेकसलाच आणि एकदम शांत होऊन त्याने,"तू हेमंत का?" असे विचारून हसत हात पुढे केला आणि स्वतःची ओळख करून दिली. ओम नाव त्याचे. तो आणि अमित त्या घरात एकत्र राहायचे. ओम आणि माझी लगेच मैत्री झाली. आम्ही एकदाही भेटलो नव्हतो तरीही तो मला खुप चांगला ओळखत होता. हेमंतच्या तोंडात नेहमी माझे नाव असायचे म्हणे! आमच्या गप्पा रंगल्याच होत्या तोपर्यंत अमित

आला. आमचे इतके छान जमले आहे हे बघून तो एकदम खुश होऊन,"मला तुमचे दोघांचे जमते की नाही ह्याचेच टेन्शन होते", असे म्हंटल्यावर मला काहीच कळले नाही. पण ओम मात्र त्याच्याकडे हेतुपूर्ण हसून," हेमंतशी न जुळवून घ्यायला मी काही मूर्ख नाहीये. मला ह्या घरात तुझ्याबरोबर राहायचे आहे म्हंटले" असे म्हंटल्यावर दोघांनीही हसायला सुरुवात केली. मला काहीच न कळल्यामुळे मीपण नुसताच हसलो. त्यादिवशी मी रात्री घरी आलो नव्हतो.... "हो आठवते मला! साधा फोनपण करावासा वाटला नाही तुला. आम्ही सगळेमात्र रात्रभर काळजी करत होतो, डोळ्याला डोळा लागला नव्हता" असे म्हणून खेकसलेच. सगळेजण आमच्याकडे बघायला लागले पण मी कश्याला कोणाची पर्वा करू! थोडावेळ शांत बसून त्याने परत बोलायला सुरुवात केली.

आमच्या तिघांचे खूप छान सूत जमले ग! खरेच सांगतो गप्पांमध्ये मी घरी फोन करायलापण विसरलो. त्यादिवशी आम्ही रात्रभर झोपलो नाही. पण जसे घड्याळाकडे लक्ष गेले तसे मी लगेच घरी आलो". मी त्यावर काहीच प्रतिक्रिया न देता मक्खासारखी बसून राहिले. त्याने पुढे बोलायला सुरुवात केली. मग रोज दुपारी स्वादमध्ये जेवून मी त्यांच्या घरी जायला लागलो. मला ओम खूपच आवडला होता. स्वभावाने एकदम मिश्किल आणि छान होता. मला त्याचा सहवास खूप आवडायला लागला होता.

त्याच्याबरोबर बोलताना वेळ कसा जायचा तेच कळायचे नाही. त्याला सोडून कुठे जावेसेच वाटत नव्हते. सकाळी ऑफिसमध्ये गेलो की कधी दुपार होते आणि त्याला भेटायला जातो असे व्हायचे. मग रात्री अमित आला की तो फोर्स करून घरी पाठवायचा म्हणून मग कसेतरी घरी यायचो. घरी आलो की खूप अपराधी वाटायचे ग............ मी इतक्या उशिरा घरी यायचो की तुम्ही सगळे झोपलेले असायचा. निशांत आणि रुचा दोघांच्या खोलीत जाऊन त्यांना बघायचो तेव्हा रोज ठरवायचो की उद्या संध्याकाळी लवकर घरी यायचे आणि ह्या दोघांबरोबर खूप खेळायचे, छान वेळ घालवायचा पण सकाळी घराबाहेर पडलो आणि ओमला भेटलो की हे सगळे विसरायचो!

अमितला बहुतेक माझ्यातला बदल जाणवत होता. मी ओमकडे ओढला जात आहे, त्याच्याबद्दल माझ्या मनात ज्या भावना होत्या त्या मला नाही पण त्याला समजल्या होत्या. त्याने एकदा ओमला काही कामासाठी बाहेर पाठवून माझ्याशी बोलायला सुरुवात केली, "तुझे काय चालले आहे हेमंत? एकदा इकडे आलास की घरदार विसरत आहेस तू! तुझे लग्न होऊन तुला दोन मुलं आहेत, हे विसरत आहेस तू. तू काय करत आहेस कळत आहे का तुला?" त्यावर मी" अरे अमित! असे एकदम तिरसटासारखे का वागत आहेस? काय झाले?" त्यावर तो एकदम खवळलाच,"तू ओमकडे

ओढला जात आहेस हे काही कळत नाही का मला! काय करत आहेस अरे तू? बायको मुलांचा विचार कर जरा". असे म्हंटल्यावर मीपण चिडलो,"हे बघ अमित! मला माहित आहे तूझे आणि ओमचे संबंध आहेत. मी काही त्याला तुझ्याकडून ओढून घेणार नाहीये, काळजी करू नकोस!" हे ऐकले आणि त्याचे डोकेच फिरले,"हे बघ अमित, मी आणि ओम फक्त मित्र आहोत. मला तुझ्याबद्दल सगळी माहिती आहे पण तूला माझ्याबद्दल काहीच माहित नाहीये. माझे ज्याच्याबरोबर संबंध आहेत तो इथे राहत नाही. तो रिसर्च करण्यासाठी जर्मनीला गेला आहे. आता पुढच्या महिन्यात त्याचे शिक्षण पूर्ण करून तो परत येईल. त्याला तिथे खूप चांगला जॉब लागला होता पण मला भारत सोडून कुठेच जायचे नाहीये म्हणून माझ्यासाठी तो परत इकडे येतोय. आम्ही एकमेकांशी खूप प्रामाणिक आहोत. आणि ओमबद्दल सांगायचे तर तो माझा जोडीदार प्रसन्न ह्याचा शालेय मित्र आहे. ओमला जेव्हा त्याच्याविषयी कळाले तेव्हा त्याने घरी आईवडिलांना सांगितले. घरी कोणालाच हे मान्य नव्हते. सगळ्यांनी त्याला लग्न करण्यासाठी फोर्स केला पण त्याला स्वतःबरोबर एका मुलीचे आयुष्य खराब करायचे नव्हते म्हणून त्याने घर सोडले. त्यावेळी ओमला राहायला जागा नव्हती म्हणून प्रसन्नने मला विचारले. मी एकटाच रहात असल्यामुळे त्याला हो म्हणालो. आमचे दोघांचे चांगले पटत असल्यामुळे तो इथेच रहात आहे." हे सगळे ऐकून मला मेल्याहून मेल्यासारखे झाले आणि खाली

मान घालून बसलो. अमितने परत बोलायला सुरुवात केली,"अरे हेमंत, मला मान्य आहे की तुला तुझ्याबद्दल उशिरा माहित पडले. पण आता तू मानसीबरोबर लग्न केले आहेस. दोन मुलांचा बाप आहेस तू. त्यांचा विचार कर. त्यांचे भविष्य काय? त्यांना हे सगळे समजले तर काय होईल? लहानपण, शाळा कशी असते, तिथे असणारी गुंड मुलं कशी असतात, मुलांना कशी त्रास देतात हे तुला आणि मला चांगले माहित आहे. मला माझ्याबद्दल कॉलेजमध्ये गेल्यावरच शोध लागला. त्यानंतर मला काय त्रास झाला आहे तुला काहीच माहित नाही. त्यामुळे तुझे सगळे बिंग फुटल्यावर त्यांना काय आणि कसा त्रास होईल ह्याचा विचार कर." त्यावर मी,"अरे अमित मला सांग ना काय झाले तुझ्याबरोबर". त्यावर अमित,"हे बघ हेमंत, माझ्याबद्दल मी तुला नंतर कधीतरी सांगेन पण आता आपण तुझ्याबद्दल बोलूयात. हे बघ तुला कळत नाहीये पण तू ओमकडे ओढला जात आहेस. तूच काय तर त्याचेपण तुझ्यावर प्रेम जडले आहे पण तुझ्या बायको व मुलांमुळे त्याने त्याच्या भावना दाबून ठेवल्या आहेत. पण हे कुठेतरी थांबले पाहिजेत. त्यामुळे मला असे वाटते की आपण आपली ही मैत्री इथेच थांबवूयात, तू माझ्या घरी येणे बंद कर. ओमशी आणि माझ्याशी बोलणे बंद कर. इतकेच काय तर आता कोणातही गुंतू नकोस." हे असे अनपेक्षित बोलणे ऐकून मी सुन्नच झालो. मी काही बोलणार तोपर्यंत ओम म्हणाला,"अमित तू असे नाही वागू शकत आणि आमचे निर्णय तू नाही

घेऊ शकत". ओम आलेला बघून दोन मिनिटं आम्हाला कोणालाच काय बोलावे सुचले नाही. पण अमितने आम्हा दोघांना बसवून समजावले. मानसी तुला खरेच सांगतो, मला जेव्हा माझ्याबद्दल शोध लागला तेव्हा मलाच कसेतरी होत होते. खूप दिवस मी अक्षरशः वेडा झालो होतो. काय करावे कळत नव्हते. तुला मी फसवत आहे असे वाटून खूपदा तुझ्याशी बोलायला घरी यायचो पण काही बोलायची हिम्मतच होत नव्हती. रेवाला बघितल्यावर तर आणखीन ओशाळायचो. मी तुमचा अक्षम्य गुन्हा केला आहे हे जाणवायचे. पण ह्यावर उपाय काय हेच कळत नव्हते ग. पण त्याबरोबर मी खरेच ओमकडे ओढला गेलो होतो. त्याला भेटल्याशिवाय, त्याच्याशी बोलल्याशिवाय मला राहवतच नव्हते ग. पण अमितने जेव्हा परत एकदा ही जाणीव करून दिली तेव्हामात्र मी त्याला वचन दिले की खरेच मी आता ओममध्येच काय पण कोणामध्येही गुंतणार नाही. अमितने माझ्याबरोबरच ओमकडूनपण वचन घेतले.

हे ऐकून मी आणखीन भडकले,"मग मी बघितले ते काही माझे स्वप्न होते का?" जाम जळफळाट होत होता माझा. इथेच त्याला बुदकलून काढावे असे वाटत होते पण काहीच करू शकत नव्हते.

थोडावेळ शांत बसून त्याने परत बोलायला सुरुवात केली. खरेच सांगतो मानसी, जेव्हा अमितने हे समजावले तेव्हा आम्ही परत कधीही

भेटणार नव्हतो. पण अमितला आम्ही वचन दिल्यावर फक्त आज एकच दिवस आम्ही एकमेकांबरोबर वेळ घालवतो. परत आम्ही एकमेकांना कधीच भेटणार नाही असे त्याला सांगितले. त्याला त्याच्या बहिणीकडे जायचे असल्यामुळे त्याने लगेच आम्हाला परवानगी देऊन तो तिथून निघून गेला.

आम्ही त्यादिवशी दिवसभर एकत्र होतो. मी संध्याकाळी घरी जायला म्हणून उठलो आणि एकमेकांना मिठी मारली. तिथेच आमचा तोल गेला...........

जे दृश्य कितीही प्रयत्न करून माझ्या डोळ्यासमोरून जात नव्हते परत ते चित्र डोळ्यासमोर आल्यावर शिसारी येऊन तिथेच उलटी झाली आणि मी जोरजोरात रडायला सुरुवात केली. सगळी लोक बाजूला जमा झाली. तिथल्या सगळ्यांना काहीतरी वेगळाच प्रकार वाटत होता. कारण आम्ही आल्यापासून आमचा तिथे जवळपास तमाशाच चालला होता. त्यात मला उलटी झाल्यामुळेतर वेगळाच संशय आला होता. मला असे वाटते की सगळ्या लोकांच्या आत एक राग, एक धुसमस होत असते मग ती सगळी आत साचलेली मळमळ बाहेर काढायला अशी संधी मिळाली तर किंवा अशी संधी मिळायची वाट बघत असतात आणि ती मिळाली की लगेच

सगळे आपला हात धुवून घेतात. सगळे हेमंतला मारायला निघाले होते. मी पटकन मध्ये पडले पण तरीही त्याला २-४ फटके पडलेच. त्याने माझ्या उलटीवर माती टाकली आणि आम्ही लगेच तिथून निघालो. मला वाटले की आता तो मला घरीच नेऊन सोडेल पण आम्ही तिथे पायथ्याशी एका रिकाम्या उपहारगृहात जाऊन बसलो. आज सगळे सांगितल्याशिवाय इथून जायचेच नाही असे त्याने ठरवले होते. खरेतर त्याला मार बसला होता. एक गाल चांगलाच सुजला होता. मला त्याला घरी जाऊया असे सांगायचे होते पण तरीही माझी हिम्मत झाली नाही आणि आम्ही तिथे जाऊन बसलो. कांदा भजी, चहाची ऑर्डर देऊन त्याने लगेच बोलायला सुरुवात केली.

मानसी मला तुझ्यासमोर बोलायलाच कसेतरी होत आहे पण खरेच सांगतो. अग आम्ही काहीही केले नाही. तू लगेच आलीस त्यादिवशी. खरेच सांगत आहे. त्यानंतर मी कधीच ओमला भेटलो नाही. अगदी मी स्वादमध्ये जाणेपण सोडून दिले. मी आता सकाळी ऑफिसमध्ये जातो तिथून संध्याकाळीच ऑफिसमधून बाहेर पडतो ते थेट घरीच येतो. कुठेही जात नाही. अमितच ३-४ वेळेला घरी भेटायला आला होता तेवढाच काय तो बाहेरच्या जगाशी संबंध उरला आहे माझा.

हो! श्रीशापण येऊन भेटून गेली. नवऱ्याला आणि मुलाला घेऊन आली होती. तिला बघून राग येण्याऐवजी माझी मलाच लाज वाटत होती. तिचे

म्हणणे मी तेव्हाच ऐकायला पाहिजे होते. तिचे जर ऐकले असते तर हे सगळे झालेच नसते. ती खूप आनंदात होती. तिने तिथलाच नवरा पटकावला होता. दिसायला एकदम उंचपुरा, देखणा, एका नामांकित कंपनीमध्ये CEO म्हणून काम करत होता. मुलगापण अगदी छान होता. नवऱ्याला आणि मुलाला घेऊन ती मला खिजवायलाच आली होती. मी एकदम शांत होतो पण आईचे मात्र डोके फिरले होते. आईनेपण तिला तुझ्याबद्दल आणि मुलांबद्दल खूप काही चढवून चढवून सांगितले अगदी आपले भरपूर फोटोपण दाखवले. ती जे काही मला बोलली होती ते आईला माहित नव्हते. त्यामुळे माझी आणखीन चिडचिड होत होती पण आईला कोण आणि काय सांगणार? कोणीही घरी आले की इतका पाहुणचार करणाऱ्या आईने बाबांनी सांगितले म्हणून फक्त चहा केला. तोसुद्धा ठेवून लगेच आत निघून गेली. बिस्कीटसुद्धा बाबांनीच आणून ठेवली. जाताना सगळे सोडायला म्हणून बाहेर पडलो. तर श्रीशा सॅन्डल नीट बसले नाहीत म्हणून परत आत आली आणि मला म्हणाली,"कश्याला मानसीचे आयुष्य खराब केलेस रे? आणि २ मुलं नक्की तुझीच आहेत ना?" असे म्हंटल्यावर मात्र मी काही बोलण्यापेक्षा माझे त्राणच निघून गेले. मटकन तिथेच खाली बसलो. श्रीशा मात्र मला खिजवून हसत खाली निघून गेली. २ दिवस तापाने फणफणलो होतो. ती येऊन गेल्यावर आम्ही सगळेच हताश झालो होतो. त्यानंतर अमित मला भेटायला आला तेव्हा आईला वाटले की माझे आणि

अमितचे संबंध आहेत म्हणून. वाट्टेल तशी बोलली ग ती त्याला आणि परत ह्या घरी पाऊल टाकायचे नाही हेपण निक्षून सांगितले त्याला. पण त्याने एकही अवाक्षर न काढता सगळे ऐकून घेतले व उठून तसाच काहीही न बोलता परत गेला. तो गेल्यानंतर आईबाबांना त्याचे आणि माझे असे काहीही नाही हे सांगितले..... अगोदर ते ऐकूनच घ्यायला तयार नव्हते. बाबातर आईला खूप बोलले. तिच्या अतिलाडामुळेच मी आळशी, कामचुकार आणि हे सगळे झाले आहे, आणखीन बरेच काही आईला बोलत होते. बाबा आईला असे ओरडताना मी पहिल्यांदाच पाहत होतो आणि आश्चर्य म्हणजे कधीही कोणाचेच ऐकून न घेणारी आई पहिल्यांदा मान खाली घालून रडत बसली होती. पण सगळे शांत झाल्यावर मी त्यांच्याशी सगळे सविस्तरपणे बोललो. त्यांना सांगितले की मला मी कसा आहे हे माहित झाले आहे, त्यामुळे आता आपण काहीही करू शकत नाही. आईबाबांनी माझे सगळे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. बाबा खूपच जास्त चिडले होते. त्यांनी माझा व्यवसाय बंद करायला सांगून आता ह्यापुढे तुझे तू सगळे बघायचे म्हणून सांगितले. गाडीतर नव्हतेच देणार पण घरीसुद्धा राहायचे नाही म्हणून सांगितले. ताप असल्यामुळे आईने मात्र मला जाऊ दिले नाही. ३-४ दिवसानंतर आईबाबा परत माझ्याशी बोलायला आले. तेव्हा त्यांनी मला सांगितले की ते मला एक छोटे घर घेऊन देणार आहेत. माझा व्यवसाय मीच करायचा पण त्याची सगळी जबाबदारी माझी असेल,

काकासुद्धा कुठलीही मदत करणार नाहीत. गाडी ते मला देणार होते. पण ह्या घरी परत यायला मनाई होती. हे जेव्हा बाबांनी सांगितले तेव्हा आईला खूप वाईट वाटले, तिला ही अट मान्य नव्हती पण बहुदा ती काहीच करू शकत नसल्यामुळे शांत होती. नंतर बाबांनी सांगितले की ते तुला आणि मुलांना घरी घेऊन येण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. खरेच सांगतो मानसी हे ऐकून मला खूप आनंद झाला. मी लगेच होकार दिला. पण मला तुझ्याशी सगळे बोलायचे होते ग. तुला सगळे सांगायचे होते. मला अगदी मान्य आहे मी तुझा अक्षम्य गुन्हा केला आहे. मुलांना तर मी कधीच माझे तोंड दाखवू शकत नाही. मी तुझी माफीपण नाही मागणार कारण मी जे केले आहे ते माफी मागण्यायोग्य नाहीये. पण कृपया आईबाबांनी जो पर्याय दिला त्याचा विचार कर. मी तुझ्यामध्ये कधीच अडथळा निर्माण करणार नाही विश्वास ठेव माझ्यावर..

आम्ही दोघे काहीच बोलत नव्हतो. थोड्यावेळाने मी त्याला आपण निघुयात म्हणून सांगितले. बिल देऊन आम्ही लगेच निघालो. गाडीत एकही शब्द न बोलता आम्ही पूर्ण प्रवास केला. मला खूप गळून गेल्यासारखे झाले होते. घरी आल्यावर मी तडक माझ्या खोलीत जाऊन अंग टाकून दिले. रात्री आईने मला चहा बिस्कीट देऊन गोळी घ्यायला लावली. थोड्याच वेळात मी गाढ झोपी गेले. दुपारीच जाग आली. उठून बघितले तर

आईबाबा, तन्मय आणि मधुरा बाहेरच्या खोलीत बसले होते. मी फ्रेश होऊन येईपर्यंत आईने स्वयंपाक गरम केला. आम्ही सगळयांनी एकत्र काहीही न बोलता शांतपणे जेवण संपवले. बहुतेक मी सगळयांबरोबर जेवणार नाही असे सगळ्यांना वाटले होते पण मला इतके शांत बघून आणि सगळयांबरोबर जेवायला तयार झाले हे बघून थोडे आनंदीच झाले. जेवण झाल्यावर सगळे उठायला लागल्यावर मी सगळयांना तिथेच बसायला सांगून माझ्या व हेमंतमध्ये जे बोलणे झाले ते थोडक्यात सांगितले. सगळे ऐकून बाबा म्हणाले,"हे बघ तनू, जे झाले आहे ते खरेच वाईट झाले आहे. अगदी दुष्मनाबरोबर पण जे होऊ नये ते आपल्याबरोबर झाले आहे. पण आता आपल्याला ह्यातून मार्ग काढावाच लागेल. मला तर असे वाटत आहे की आता तू त्याला घटस्फोट द्यावा आणि इथेच राहावे. आम्ही जोपर्यंत आहोत तोपर्यंत तुला कुठलीही काळजी करायची गरज नाहीये. अगदी आम्ही नसलो तरीही तन्मय तुझ्याबरोबर कायम असेलच. आमचे आत्ताच बोलणे झाले आहे की ह्या घरामधला त्याचा हिस्सा पूर्ण तुला देणार आहे. हे तनूनेच स्वतःहून सांगितले आहे, तो त्याची NOC आत्ताच करून देणार आहे. त्यामुळे तुला पैशाचा कुठेच, कधीच प्रश्न येणार नाही बेटा!" २ मिनिट शांतता होती, नंतर वाहिनी म्हणाली,"आपण आता बोलत आहोत म्हणून आम्ही आमची मतं तुला सांगत आहोत पण सगळा निर्णय तुझा तू घ्यायचा आहे". ह्यावर त्या तिघांनीही होकार दिला. त्यावर मी,"मला विचार

करायला वेळ पाहिजे". असे सांगितल्यावर सगळयांनीच ‘हो’ म्हणून आम्ही तिथून उठलो. परत खोलीत गेल्यावर मात्र मी ठरवले की आता मला माझ्या मुलांसाठी जगायचे आहे. त्यासाठी माझे दुःख, मी सगळे विसरून फक्त त्या दोघांकडे बघायचे. दुपारी दोघे शाळेतून यायच्या वेळी मी उठून तयार होऊन एकदम हसतखेळत बाहेर गेले. मला इतके खुश आणि सामान्य बघून ते दोघे खूपच खुश होऊन 'आई' म्हणून गळयात पडले. आम्ही सगळयांनीच मस्त हसतखेळत नाश्ता केला. अभ्यास करून नंतर संध्याकाळी फिरायला जायचे ठरले. पण तनू आणि वाहिनी परत मुंबईला जाणार होते. तेपण मुलांना तिकडे सोडून आले होते. मग त्यांना सोडून नंतर आपण मस्त बागेत जाऊ असे म्हंटल्यावर दोघे एकदम खुश झाले. आम्ही सगळेचजण म्हणजे अगदी आज्जीआजोबा सुद्धा आमच्याबरोबर आले होते. खूप मज्जा केली आम्ही बागेत. सगळयांनीमिळून मस्त भेळ खाल्ली आणि मग घरी आलो. रात्रीसुद्धा आम्ही सगळे एकत्र झोपलो. खूप मस्ती केली आणि नंतरच झोपलो. सकाळी उठून मी दोघांचा त्यांना आवडणारा पदार्थ करून नंतर त्या दोघांना उठवले. तोपर्यंत माधुरीपण आली. मला असे बघून तर ती रडूच लागली,"आमच्या ताईंना कोणाकोणाची नजर लागू नये रे देवा" असे म्हणून माझ्या गळयात पडून रडली. हे बघून रेवा आणि निशांत पण आम्हा दोघींना बिलगले. आता आमचा रोजचा नित्यक्रम अगदी

नेहमीप्रमाणे सुरु झाला. रेवा-निशांतची मस्ती परत सुरु झाली. दोघेजण मोठी झाली होती पण त्यांच्यातले बाल्य थोडेसेतरी परत येत होते.

जवळपास ह्या सगळ्या गोष्टीला सहा महिने होत आले होते. आता आमचे सगळे छान चालू होते. आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला जायचो. आईबाबा, आम्ही तिघे आणि आमची माधुरी ताई असे एक कुटुंब तयार झाले होते. पण सुट्टी असली घरी कोणी राहायला आले की रेवा-निशांत दोघेजण थोडे हिरमुसले व्हायचे. एकदा मी त्यांना हळूहळू कुजबुजताना ऐकले. निशांत रेवाला विचारत होता,"बघ ना रेवा, हे सगळेजण त्यांच्या आईबाबांबरोबर, आजीआजोबांबरोबर राहतात. सुट्टीसाठी थोडेच दिवस इथे राहायला येतात. आपले सगळे लाड करतात पण त्यांचे जास्त लाड होतात ना ग. आपल्याला मात्र काही चुकले तर सगळे ओरडतात, शिस्त लागली पाहिजे म्हणतात. ते कधीतरीच येतात म्हणून त्यांना कोणी शिस्त लावत नाही ना. आपण का नाही राहत आपल्या बाबांबरोबर. मलापण असे सुट्टीसाठी इथे यायचे आहे". रेवाने त्याला जवळ घेतले,"अरे मलापण वाईट वाटते हे सगळे बघून. पण आपल्या बाबांनी खूप मोठी चूक केली आहे म्हणून आपण इथे राहत आहोत. आपली आई किती रडत होती लक्षात आहे ना. आपण कोणाला काहीच बोलायचे नाही, आपली आई आपल्याला खुश हवी ना मग आपण शांत बसायचे". हे ऐकून

मात्र माझ्या पायाखालची जमीन हलली. खरेच मी ह्या दोघांच्या बाजूने कधी विचारच केला नाही. किती लवकर ह्या दोघांचे बालपण आपण हिरावून घेतले आहे. काहीच सुचेनासे झाले. त्यादिवशी मी पुन्हा एकदा माझ्या कोशात गेले. त्यादिवशी सगळेच घाबरले. मी परत अशीच होणार का अशीच भीती वाटत होती सगळयांना. पण सकाळी उठून मी परत पूर्ववत झाले तेव्हा आईबाबांच्या जीवात जीव आला. सगळे सुरळीत चालले होते पण माझ्या मनातून हा विचार काही केल्या जात नव्हता. ह्यातून काय मार्ग काढता येईल ह्याचाच मी विचार करत होते.

साधारण महिनाभराने आम्ही एका वाढदिवसाला गेलो होतो. तिथे नेमके काकाकाकूपण आले होते. सुरुवातीला काय बोलावे तेच कळले नाही. काकाकाकूंनी पटकन त्या दोघांना जवळ घेतले. एरवी निशांत कोणाकडे जाताना कुरकुरतो पण काकांनी उचलल्यावर उलट त्यांच्याकडे बघून छान हसला. तेव्हा आपले रक्त ते आपलेच असते ही जाणीव मात्र झाली. दोघे त्यांच्या मित्रमैत्रिणींबरोबर खेळायला गेल्यावर काका माझ्या बाजूला येऊन बसले. काय कशी आहे चौकशी केली. मीपण त्यांच्याशी एकदम छान, मला काहीही फरक पडला नसल्याचे दाखवून व्यवस्थित बोलत होते. माझी एकदम प्रेमाने चौकशी केली. बोलता बोलता त्यांनी हेमंत आता दुसरीकडे राहायला गेला आहे, महिन्यातून एकदा हीच त्याला भेटायला जाते वगैरे सांगितले. मला त्यावेळी खरेच काकूंचे वाईट वाटले.

शेवटी कितीही झाले तरी आई होती ती. जेवण वगैरे झाल्यानंतर मला घरी कशी जाणार विचारल्यावर बाबा घ्यायला येणार आहेत सांगीतल्यावर,"ही इथून तिच्या बहिणीकडे राहायला जाणार आहे, तेव्हा मी सोडतो तुला", असे सांगितल्यावर निशांत, रेवापण खुश झाले. ते बघून मी बाबांना मला घ्यायला येऊ नका म्हणून सांगितले. घरी जाताना रेवा निशांतने आनंदाने आजीला मिठी मारली आणि"आजी आम्हाला भेटायला ये ना" म्हणून सांगितल्यावर माझ्या काळजात परत एकदा कळ आली. त्यावर आजीने फक्त त्यांना गोंजारून पप्पी घेतली व निघून गेल्या. काकांनी मध्ये गाडी थांबवून दोघांना आवडतात म्हणून बडीशेपच्या गोळया आणि गोष्टीची पुस्तके घेऊन दिली. दोघेतर उड्याच मारायला लागले. घरी आल्यावर दोघे सगळया घरी फिरून त्यांना मिळालेली पुस्तके आणि गोळया(इतके आवडत असूनही तोपर्यंत एकही खाल्ली नाही) सगळयांना दाखवून आम्हालापण आमच्या आजोबांनी गिफ्ट दिले असे सांगितल्यावर तर मी एकदमच शांत झाले. आणि माझ्या मनात दबलेला विचार परत उफाळून आला.

साधारण ४-५ दिवसांनी ऑफिसमधूनच काकांना फोन लावला आणि भेटायला यायला जमेल का म्हणून विचारले. त्यांनी लगेच होकार दिला. माझे ऑफिस सुटून मी खाली आले तर माझी वाट बघत उभे होते. आम्ही

दोघे जवळच्याच उपहारगृहात गेलो. काकांनीच बोलायला सुरुवात केली. मुलांबद्दल, आईबाबांबद्दल चौकशी करून मला मोकळे केले. गप्पा मारता मारता मी त्यांना माझ्या मनातला विचार सांगितला. खूप खुश झाले ते ऐकून. मला लगेच म्हणाले,"हे बघ मानसी, मी तुला एक सांगतो. तुला हिचा काहीच त्रास होणार नाही. आईला आता काही काम होत नाहीये, खूप दमलीये पण तरीही तिने इथे येऊन रहायला नकार दिला आहे. पण तू येणार म्हंटल्यावर ती लगेच येईल. हेमंत अजून एकदाही घरी आला नाहीये. त्याला बरे नव्हते तेव्हा हीच त्याच्या घरी राहायला गेली होती. त्यामुळे तू त्याचीपण काळजी करू नकोस. तुला हे सांगणे गरजेचे नाहीये पण तरीही सांगतो की हेमंत एकटाच राहतो, तो अजून कोणातही गुंतला नाहीये आणि त्याची इच्छापण नाहीये. अर्थात मला हे हिच्याकडून समजले आहे". काका अजून बरेच काही बोलत होते. ते आता थकले आहेत ह्याची जाणीव त्यांच्या बोलण्यातून जाणवत होती. ते एकटेच जवळपास अर्धा तास बोलत होते आणि मी ऐकत होते. नंतर त्यांनी माझ्या हातावर हात ठेवून,"मानसी खरे सांगतो, हेमंतचे हे सगळे ऐकल्यानंतर माझे बोलणेच बंद झाले होते. आज खूप दिवसांनी इतके बोललो आहे". त्यावर मी,"काका मी अजून विचार करत आहे. मी आई बाबा, तन्मय, मधुरा कोणालाच काहीही बोलले नाहीये". ह्यावर ते,"हो मानसी! तू तुझा वेळ घे. पूर्ण विचार करून सगळ्यांशी बोलून मग ठरव. तू स्वतःहून जोपर्यंत कोणाला काही सांगत

नाहीस तोपर्यंत हे गुपितच राहील, मी कोणाला काहीच सांगणार नाही. खरे सांगू मी तुला भेटायला येणार आहे हे फक्त आईला माहित आहे. बाकी मी कोणालाच सांगितले नाहीये". त्यावर मी,"माझे आजींशी बोलणे होत असते (हे आजींनी बहुतेक त्यांनापण सांगितले नव्हते, त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसत होते). माझ्या मनात हे सगळे तुम्हाला पार्टीमध्ये भेटल्यानंतरच चालू होते. तेव्हाच मी त्यांना हे सांगितले होते. पण त्यांनी त्यांचे मत कधीच दिले नाही. उलट मी जेव्हा दोन्ही बाजू सांगायचे तेव्हा त्या फक्त हो हो म्हणायच्या. त्यांनी मला पहिल्यांदाच सांगितले होते की मलाच ठरवायला लागणार आहे पण त्या मला मी काहीही ठरवले तरीही त्यात साथ देणार आहेत". त्यावर काका अगदी विश्वासपूर्वक माझ्याकडे बघून हसले. त्यांनी बिल देऊन मुलांना आवडतात म्हणून सुरळीच्या वड्या, बुंदी लाडू आणि रसमलाई घेतली. जाताना मी त्यांना फोन करते म्हणून सांगून निघाले. त्या दिवशी शुक्रवार होता त्यामुळे तन्मय फॅमिलीपण घरी आली होती. तेपण खूप महिन्यांनी घरी आले होते. मला त्यांच्याशी बोलायचे आहे हे जसे काही त्यांना कळले होते म्हणूनच आले की काय असे वाटून गेले मला. आईने इतका उशीर का झाला विचारल्यावर बाहेर गेले होते इतकेच सांगितले व सगळे तिच्या हातात दिले. मला जसे काही हे येणार आहेत हे कळले म्हणून सगळे घेऊन आले असे मला सगळे चिडवायला लागले. हसतखेळत जेवणं करून सगळी मुलं झोपल्यावर

आम्ही गप्पा मारताना मी विषय काढला आणि माझा विचार सांगितला. त्यावर सगळयांनाच ह्याची कल्पना आली होती हे जाणवले. कोणी काहीच बोलले नाही पण बाबा थोडे नाराज दिसत होते. मी पुढच्या शुक्रवारी तिकडे राहायला जाणार हे सांगितल्यावर स्तब्धच झाले. त्यांच्या मताने इतकी घाई करून न जाता सावकाश जावे किंवा मुलांच्या सुट्टीत राहायला जावे म्हणजे मग तिथे रुळला नाही तर परत येणे सोप्पे जाईल असे मत व्यक्त केले. विशेष म्हणजे वाहिनीसुद्धा ह्यावेळी त्यांच्याबरोबर होती. पण तरीही मी ठाम होते त्यामुळे कोणी काहीच बोलले नाही. आईच्या डोळयाला धारा लागल्या, बाबातर उठून निघूनच गेले. मी खोलीत जाऊन आजींना माझा निर्णय कळवून मी येईन तेव्हा मला तुम्ही तिथे हव्यात असे सांगितल्यावर त्या लगेच हो म्हणाल्या आणि काकांना कळवायचीपण जबाबदारी घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सगळे आजीआजोबांकडे नाश्त्याला भेटणार होतोच तेव्हा आईने सगळयांना माझा निर्णय सांगितला. सगळयांना खूप आश्चर्य वाटले पण त्यांनी मी जेव्हा आले होते तेव्हा काही विचारले नाही आणि आत्तापण काही विचारले नाही. पण आजोबांनी मात्र 'हे घर तुझेच आहे' हे सांगितल्यावर मात्र सगळयांच्याच डोळयात पाणी आले. सगळया धावपळीत एक आठवडा कसा गेला तेच कळाले नाही. रेवा-निशांत आजीआजोबांकडे जाणार म्हणून खूप खुश होते पण सगळेजण

रेवा-निशांतचे न ओरडता, शिस्त न लावता खूप लाड करत होते त्यामुळे जोडी अजूनच खुश होती.

शुक्रवारी मी सुट्टी घेतल्यामुळे सकाळीच निघायचे ठरले होते. सकाळी नऊच्या ठोक्याला काका गाडी घेऊन आले होते. ह्यावेळी सगळयांनी त्यांचे छान स्वागत केले. बाबामात्र त्यांच्याशी बोलले नाहीत. आई माझ्याबरोबर ८ दिवस राहायला येणार होती. आजीआजोबांकडे सगळयांनी एकत्र नाश्ता करून आम्ही निघाल्यावर परत आमचा रडण्याचा प्रोग्रॅम झाला. लग्न झाल्यानंतर मी पहिल्यांदाच माहेरी जात असल्यासारखी माझी ओटी वगैरे भरून सगळयांनी मला निरोप दिला. रेवा-निशांतमात्र खूप खुश होते. सगळयांनी त्यांचे ८ दिवस खूप लाड केले होते. त्यामुळे आपण चाललो आहोत हे खूप छान आहे हे त्यांना चांगले वाटत होते. सगळेजण त्यांना भरपूर गिफ्ट्स देऊन मिठी मारून रडत होते. तेव्हा हे दोघे "रडू नको मी शाळेच्या सुट्टीत नक्की राहायला येईन" म्हणून सांगत होते.

काका येताना मोठी गाडी घेऊन आले होते. त्यामुळे सगळे सामान त्यात मावले शिवाय दोन्ही मुले आणि माधुरी पण गाडीत बसले. सगळयांना रडू आवरत नव्हते पण हे दोघे सगळयांना आनंदाने टाटा करत होते. बाबातर बाहेरच आले नाहीत. मी आणि आई गाडीवरून घरी जायला निघालो.

गाडी चालवताना आपण बरोबर करत आहोत ना. अजूनही इथून माघारी वळू शकतो हा विचार करत असतानाच घर आले. गाडी थांबवूनही मी खाली उतरत नव्हते, आईपण काहीही न बोलता तशीच उभी होती. सगळे सामान वर गेले होते. मुलांनापण वर जायचे होते पण माधुरी त्या दोघांना घेऊन तिथेच उभी होती आणि तीपण शहाण्या बाळासारखी गुपचूप उभी होती. खूप वेळ असाच गेल्यावर आजी माझ्याजवळ आल्या तेव्हामात्र मी गाडी सोडून त्यांच्या गळयात पडले. त्यांच्याबरोबरच घरी गेले तर काकूंनी बाहेरच उभे करून आमची दृष्ट काढून औक्षण करून घरी घेतले. मला वाटले होते गेल्या गेल्या मुलांना नवीन घरी जुळवून घ्यायला वेळ लागेल पण तीतर घर अगदी ओळखीचे असल्यासारखी माधुरीला घेऊन आत गेली. कबूल करायला मन धजावत नव्हते पण मलापण इथे अगदी आपलेपणा जाणवत होता. काकूंनी अगदी छान स्वागत केले. आल्याआल्या सगळ्यांना चहा केला. थोडावेळ गप्पा मारून मला आणि आईला खोलीत जाऊन फ्रेश व्हायला सांगितले. आम्ही आमच्या खोलीत जायला निघालो तर काकांनी मला दुसरी खोली दाखवली. ती त्यांची खोली होती. मी खूपच क्वचित त्या खोलीत गेले होते. बहुतेक म्हणूनच मला त्यांनी त्यांची खोली दिली होती. आईला खूप कसेतरी होत होते पण तरीही ती सगळे व्यवस्थित असल्याचे दाखवत होती. आत गेल्यावर तिला थोडे हुश्श झाल्यासारखे वाटले. खोली खूप मोठी होती. पूर्ण खोलीचा

चेहरामोहरा बदलला होता. अगदी नवीन खोली वाटत होती. तिथे मधोमध आमचा तिघांचा फोटो फ्रेम करून लावला होता. ८ दिवसात त्यांनी ही खोली तयार केली होती आणि विशेष म्हणजे काकू ही खोली सोडायला तयार झाल्या त्यामुळे तर मला खूप आश्चर्य वाटले. थोडावेळ आम्ही नुसत्याच बसून होतो नंतर मात्र आईने माझे सगळे सामान कपाटात व्यवस्थित लावले. खोली बदलली असली तरीही त्या घरात माझा भूतकाळ होता, कसा विसरायचा मी तो. रेवा-निशांत मात्र चांगलेच रमले होते. त्यांचा हसण्याखिदळण्याचा आवाज येत होता. आई खोलीमध्येच टीव्ही बघत बसली होती आणि मी डोळे बंद करून....

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

**9987737237**